# इंग्रज लोकांचा संक्षिप्त इतिहास.

लेखकः

**केशव मंगेश रांगणेकर, बी. ए.**

सुप्रिंटेंडेंट, लेंडिंग लायब्ररी, सेंट्रल लायब्ररी डिपार्टमेंट–बडोदें.

प्रकाशकः

**एम्. सी. कोठारी.**

कापडीपोळ, रावपुरा–बडोदें.

No 20 of 1926/27

श्री.

बडोदें राज्यांतील दुय्यम शिक्षणाच्या शाळांसाठीं मंजूर झालेला

# इंग्रज लोकांचा संक्षिप्त इतिहास.

( इंग्रजी चौथ्या यत्तेसाठीं )


लेखकः

**केशव मंगेश रांगणेकर, बी. ए.**

सुपिंटेंडंट, लेंडिंग लायब्ररी,

सेंट्रल लायब्ररी डिपार्टमेंट–बडोदें.



प्रकाशकः

**एम्. सी. कोठारी.**

कापडीपोळ, रावपुरा–बडोदें.

हें पुस्तक ठक्कर परभुलाल शीवलाल यांनीं श्री भारतविजय छापखान्यांत प्रकाशकाकरितां छापिलें. ता. १४–९–१९२२.


किंमत बारा आणे.

इ॰ १९९

# प्रस्तावना.

हल्लींच्या महागाईच्या काळांत मध्यम स्थितींतील लोकांस नोकरी करून मिळणाऱ्या वेतनांत जीवन चालविणें बरेंच अशक्य झाल्यानें, जो तो फावल्या वेळांत कांहींतरी व्यवसाय करून आपलें उत्पन्न वाढविण्याच्या खटपटींत असतो. त्याप्रमाणें मींही थोडासा लेखनव्यवसाय करावा असें ठरविलें. परंतु त्या धंद्यास—विशेषत: स्वतंत्र लेखनकलेस—लागणाऱ्या गुणांचा माझ्यामध्यें पूर्ण अभाव असल्यानें एखाद्या इंग्रजी अगर गुजराथी शालोपयोगी पुस्तकाचें भाषांतर करण्याचा मीं बेत केला.

त्याच सुमारास म्हणजे इ. स. १९२० सालीं बडोदें राज्यांतील दुय्यम शिक्षणाच्या शाळांसाठीं अभ्यासक्रम ठरविण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. या कमिटीनें चौथ्या व पांचव्या यत्तांतील मुलांस कांहीं विषय देशी भाषांतून शिकविण्याचें ठरवून, नवलराम लक्ष्मीराम पंड्या कृत " इंग्रेज लोकनो संक्षिप्त इतिहास " हें पुस्तक त्या यत्तांतील गुजराथी जाणणाऱ्या मुलांसाठीं क्रमिक पुस्तक म्हणून ठरविलें; व याच पुस्तकाचें मराठी भाषांतर करवून तें मराठी जाणणाऱ्या मुलांसाठीं नेमण्याचें ठरविलें. ही बातमी माझे सन्मान्य हितचिंतक रा. रा. **हिरालाल व्ही. श्रॉफ,** श्री सयाजी हायस्कूलचे प्रिन्सिपाल, यांनीं मला कळवून भाषांतराचें

काम हातीं घेण्यास प्रोत्साहन दिलें. त्याप्रमाणें मी कमिटीच्या इतर सभासदांस भेटून तें काम पत्करलें, व त्याचेंच फळ हें प्रस्तुत पुस्तक होय.

हें पुस्तक म्हणजे मूळ पुस्तकाचें निव्वळ भाषांतर नसून त्याचा अनुवाद आहे हें वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल. प्रस्तुत पुस्तकांतील भाषा मुलांस सहज समजण्याइतकी सोपी आहे, आणि ती तशी लिहिण्याच्या कामीं रा. रा. आर. के. नूलकर, महाराणी चिमणाबाई हायस्कूलचे हेडमास्तर, यांनीं मला फार सहाय्य केलें त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

मुलांस स्वभावतःच इतिहासाची गोडी नसते. पुस्तकांत दिलेल्या लढाया, सनावळी वगैरे गोष्टी पाठ करून कसेंबसें परीक्षेंतून उत्तीर्ण होण्याकडेच मुलांचें लक्ष्य असतें, व यामुळें शिकलेला विषय ते मागाहून लवकरच विसरून जातात. त्याऐवजीं इतिहास गोष्टीच्या रूपानें मुलांस शिकविल्यास तो सोपा वाटून त्यांच्या लक्ष्यांत सहज राहील असें ठरवूनच मूळ ग्रंथकारानें आपला ग्रंथ रचिला, व त्या ग्रंथाची हें पुस्तक जवळ जवळ प्रतिकृतीच असल्यानें या पुस्तकांतही इतिहास गोष्टीच्या रूपानेंच लिहिलेला वाचकांच्या दृष्टीस पडेल.

प्रस्तुत पुस्तकाची हस्तलिखित प्रत तयार झाल्यानंतर छापखान्यांत पडेपर्यंत हजारों विघ्नें उपस्थित झालीं. परंतु तीं सर्व

दूर करून बडोदें राज्याचे शिक्षणमंत्री मे. रा. रा. एन्. के. **दिक्षित** यांनीं मला पुस्तक छापविण्याचा हुकुम देऊन मला अत्यंत ऋणी करून ठेवलें आहे. तसेंच तीं विघ्नें बऱ्याच अंशीं दूर करण्याच्या बाबतींत मला रा. रा. **नूलकर**, बडोदा हायस्कूलचे हेड-मास्तर रा. रा. **जी. एस्. आपटे** व तेथील असिस्टंट हेडमास्तर रा. रा. **एम्. एन्. वाडिया** यांनीं मला अमूल्य सहाय्य केलें त्याबद्दल त्यांचा, आणि पुस्तक छापवून देण्याच्या बाबतींत केलेल्या मदतीबद्दल रा. रा. **एम्. सी. कोठारी** यांचा मी अत्यंत आभारी आहे.

पुस्तकांत कित्येक ठिकाणीं विराम चिन्हांच्या, एकादें अक्षर राहून गेल्याच्या अगर ऱ्हस्वदीर्घांच्या चुका प्रूफ तपासण्याच्या घाईमुळें राहिलेल्या आढळतील, तरी वाचक त्याबद्दल क्षमा करतील अशी आशा आहे.

**सिद्धनाथ-बडोदें.**
ता. ६ सप्टेंबर १९२२.

**केशव मंगेश रांगणेकर.**

श्री.

# इंग्रज लोकांचा संक्षिप्त इतिहास

## भाग १ ला.

( इ. स. १०६६ पर्यंत. )

## प्रकरण १ लें.

### प्रवेशक.

काय, आतां तुम्हांस इंग्रज लोकांचा इतिहास ऐकावयाचा आहे ! बरें आहे. मी तो तुम्हांस सांगतों.

तुमची ही इच्छा स्वाभाविक व वाखाणण्याजोगी आहे. इंग्र आपल्या देशांत एकछत्री राज्य करीत आहेत, आणि शिवा त्यांचें चातुर्य दरेक बाबतींत असामान्य आहे; म्हणून अ लोकांच्या इतिहासाचा आपणांस अवश्य परिचय हवा.

बरें, पण प्रथम विलायत कोठें आहे तें तुम्हांस माहीत आ काय ? हा पूर्वगोलार्धाचा नकाशा आहे तो पहा. या हिंदुस्थान तून विलायतेस जावयाचें असल्यास किती दिवस लागतील

आगबोटीस जाण्यास १४–१५ दिवस लागतात. तेंही टपाल नेणारी बोट असली तर; नाहींतर जास्त दिवस देखील लागतात. पूर्वीं ज्यावेळीं केप् ऑफ् गुडहोप्च्याच रस्त्यानें आगबोटींतून जावें लागत असे, त्यावेळीं सहा सहा महिनेसुद्धां लागत असत. बरें. चला आपण विलायतेस जाण्यासाठीं मुंबईस जाऊन आगबोटींत बसूं या. तेथून पूर्व दिशेनें प्रवास करतां करतां अरबस्तानांतील हें एडन बंदर येईल. तें सोडून आपण उत्तरेकडे निघालों कीं, तांबडा समुद्र येईल. याच्या थेट उत्तरेस हा जो कालवा दिसतो त्याचें नांव काय ? सुवेझचा कालवा. येथें पूर्वीं तर नुसती जमीन होती, परंतु कित्येक वर्षांपूर्वीं जमीन खोदून काढून तेथें कालवा बनविला आहे. हा कालवा ओलांडला कीं आपण मोठ्या भूमध्य-समुद्रांत येतों. या समुद्राच्या उत्तरेस हा जो सर्व मुलूख आहे त्यास यूरोपखंड असें म्हणतात. या खंडांत ( फक्त या तुर्कस्थानाशिवाय ) सगळीकडे टोपीवालेच रहातात, व तेथें ख्रिस्ती धर्मच प्रचलित आहे. यांत पुष्कळ देश आहेत, पण त्यांतील सर्व लोक युरोपिअन म्हणविले जातात. हल्लीं जगांत युरोपिअनच सर्वांत पुढें आलेले लोक आहेत. या यूरोपच्या थेट पश्चिमेस हे जे दोन छोटे प्रदेश दिसतात ते पाहिलेत का ? या बेटास आयर्लंड म्हणतात आणि याचें नांव ग्रेटब्रिटन म्हणजे "मोठें ब्रिटन" असें आहे. या प्रदेशांत तर अजून तीन भाग आहेत. उत्तरेच्या बाजूच्या भागाचें नांव स्कॉटलंड व पश्चिमेकडील भागाचें नांव वेल्स. आतां

अग्नयेकडे हा जो त्रिकोणाकृती भाग राहिला आहे; तोच इंग्लंड देश, अगर इंग्रजलोकांची मूळ विलायत-( जिचा हल्लीं जगांत डंका वाजून राहिला आहे ).

हें पाहून तुम्ही इतके आश्चर्यचकित कां झाला ? इतक्या मोठ्या बलवान् लोकांचा मुलूख एवढासा लहान ! असें तुम्हांस वाटतें काय ? जर तुम्ही एवढ्यानेंच आश्चर्यचकित झालांत, तर जेव्हां तुम्ही वाचाल कीं, येथल्या मूळच्या लोकांची स्थिति पूर्णपणें जंगली होती, तेव्हां तर तुम्हांस केवढें आश्चर्य वाटेल ! पण तुम्ही लक्षांत ठेवलें पाहीजे कीं, कोणत्याही देशाचा उत्कर्ष हा त्याच्या विस्तारापेक्षां त्यांत रहाणाऱ्या लोकांच्या गुणांवर व बुद्धीवर जास्त अवलंबून असतो. आतां तुम्ही विचाराल कीं, इंग्रजांमध्यें असे कोणते गुण होते कीं, ज्यांमुळें ते थोडया वेळांत पुढें येऊन असे विद्वान्, श्रीमंत व वीर्यशाली झाले ? हेंच समजण्यासाठीं हा इतिहास आहे. एखाद्या देशाची उन्नति कशा रीतीनें होऊं शकते हें जाणण्याची इच्छा असल्यास इंग्रजलोकांचा इतिहास लक्ष्यपूर्वक शिकावा. या कामीं जगांत याच्यासारखा एकही इतिहास नाहीं; आणि युरोपखंडांतील दुसरे लोकही एवढ्याचसाठीं या इतिहासाचा काळजीपूर्वक अभ्यास करतात; कारण तो पुष्कळ उपदेशकारक व मनोरंजक आहे.

हा इतिहास तुम्हांस नवा आहे, म्हणून कदाचित् त्यांतील नांवें तुम्हांस चमत्कारिक वाटतील; तरी तीं पाहून भिऊं नका.

तसेंच दुसऱ्या इतिहासांप्रमाणें मी राजांच्या वंशावळी किंवा लढाया यांनींच तुमचा वेळ अडविणार नाहीं. माझा विचार तर असा आहे कीं, इंग्रजलोकांचा उत्कर्ष कशा रीतीनें झाला याचेंच थोडक्यांत वर्णन करावें. या कारणासाठींच मी त्यास इंग्लंडचा इतिहास न म्हणतां इंग्रज लोकांचा इतिहास म्हणतों. तुम्हांस वाचतांना त्यांत मौज वाटावी व त्यापासून सदुपदेशही व्हावा हाच माझा हेतु आहे. म्हणून तुम्ही लक्ष्यपूर्वक वाचा आणि जें वाचाल त्यावर मनन करा. वाचतेवेळीं नकाशा नेहमीं जवळ ठेवा, कारण भूगोलाच्या ज्ञानाशिवाय इतिहास बरोबर समजणें शक्य नाहीं.

प्रथमतः हें लक्ष्यांत ठेवा कीं, इंग्रजांचा उदय व वृद्धि ही अवघ्या सातशें वर्षांतच झाली. त्यापूर्वी या देशाची विशेष हकीकत इतकीच आहे कीं, कित्येक रानटी लोकांच्या टोळ्यांनीं येथें येऊन येथल्या पहिल्या लोकांस मारून टाकून तेथें वसाहत केली. त्यावेळीं या देशांत जुलूम व खून यांची रेलचेल चालली होती. पण मागाहून हळूहळू हें हाडवैर कमी होत गेलें, व त्यांनीं आपापसांत सर्व व्यवहारसंबंध सुरू केले. यामुळें परस्परांचा सलोखा वाढून जो समाज बनला त्याचेंच नांव इंग्रज. हें नांव इसवीसनाच्या तेराव्या शतकांत प्रथम प्रचारांत आलें.

ब्रिटन, सॅक्सन, डेन व नॉर्मन या चार जातींच्या लोकांचा इंग्रजांत समावेश होतो. इंग्रजलोकांच्या रक्तांत पुष्कळ अंश सॅक्सन अथवा अँग्लोसॅक्सनचाच आहे, तरी पण त्यांच्यांतील सर्वांत जुना भाग ब्रिटन हा होय. म्हणून प्रथम त्याचीच हकीकत पाहूं.

---

# प्रकरण २ रें.

( इ. स. ४४९ पर्यंत )

## ब्रिटनलोक आणि रोमनांचें राज्य.

ब्रिटनलोक कोठून व कधीं इकडे आले याची माहिती उपलब्ध नाहीं. रोमनलोकांनीं त्यांस जिंकिलें, तेव्हांपासून त्यांचा इतिहासांत नामनिर्देश होऊं लागला. त्यावेळीं जिकडे पहावें तिकडे मोठमोठीं जंगलें व जनावरें दिसत. माणसांची वस्ती फारच विरळ होती, पण हीं माणसें ह्मणजे त्या जनावरांपेक्षांही अधिक भयंकर होतीं. ताबुतांतील वाघांप्रमाणें अंगावर लाल, पिंवळे असे पट्टे ओढून व हातांत तीरकमठे घेऊन हे लोक जनावरांच्या शिकारींत गुंतलेले असत. शिकार मिळाली तर भोजन, नाहींतर उपास; आणि रात्र झाली ह्मणजे, पर्वतांच्या गुहेमध्यें अगर झाडांवर पडून राहणें हा त्यांचा परिपाठ असे. घरदार व अंगावर कपडे घालणें हें त्यांस माहीतच नव्हतें. थंडी लागली तर ते कातडीं पांघरीत, नाहीं-तर तसेच फिरत.

दक्षिणेकडील समुद्रकिनाऱ्यावरील लोक इतक्या रानटी स्थितींत नव्हते. ते झापड्यातून रहात व थोडी बहुत शेती पण करीत. हातांतूनही सहज नेतां येतील इतक्या लहान होड्या त्यांस करतां येत असत. त्यांचे धर्मोपदेशक ड्रुइड नांवाचे होते

व ते थोडे जास्त समजूतदार होते. त्यांच्यामध्यें माणसांचा बळी देण्याचा प्रघात असे.

ब्रिटन व केल्ट या एकच जाती होत असें ह्मणतात, आणि आयर्लंडांत सुद्धां त्यांचीच वस्ती होती. ते लोक रानटी, पण चंचल व शूर होते.

**रोमनशाही**—या वेळीं रोमनलोक जगांत सर्वांत बलवान्, सुधारलेले व प्रतापी होते. जगभर तेच अधिकारारूढ होते. परंतु लोभास सीमा अशी नाहीं. दुसरे सर्व मुलूख जिंकून झाल्यावर हा कंगाल प्रदेशसुद्धां त्यांनीं आपल्या तोंडांत टाकला. अगदीं पहिली स्वारी रोमचा जगप्रसिद्ध सेनापति ज्यूलिअस सीझर यानें इसवीसनापूर्वीं ५५ व्या वर्षीं केली. त्यानंतर सुमारें शंभर वर्षेंपर्यंत ब्रिटनांचें नांव कोणीहि काढलें नाहीं; परंतु त्यानंतर रोमनलोकांनीं त्यांचा एकसारखा पिच्छा पुरविला, त्यांच्यावर त्यांनीं मोठमोठीं लष्करें पाठविलीं, तरी पण ब्रिटनलोकांनीं नमती बाजू मुळींच घेतली नाहीं. रोमनलोकांनीं पाहिलें कीं, यांस ड्रुइड लोकांचा जोराचा पाठिंबा आहे. त्यावरून त्यांनीं ड्रुइडलोकांस मारून टाकण्याचा सपाटा लाविला, व त्यांच्यांतील एक लहान मूलसुद्धां जिवंत राहूं दिलें नाहीं (इ. स. ६१). या दुष्ट कर्माचा धारल्याप्रमाणें परिणाम झाला. सुमारें चाळीस वर्षें जेव्हां रोमनलोक अशा तऱ्हेनें मथले, तेव्हां कोठें रोमचें राज्य या प्रदेशांत स्थापलें गेलें, तथापि उत्तरेकडील भाग ते जिंकूं शकले नाहींत. तेथें पिक्ट व स्कॉट या

नांवाचे लोक रहात असत व ते उलट रोमच्या राज्यास हैराण करीत असत. त्यांना अडविण्यासाठीं रोमनलोकांनीं सॉल्वेफर्थ-पासून टाइन नदीपर्यंत कोट बांधला. ( इ. स. १२१ ) येथूनच त्यांच्या राज्याची हद्द झाली. ही हद्द मागाहून थोडी वाढविण्यांत आली होती, परंतु ती कायम राखतां आली नाहीं.

स्वतंत्रता गमाविली, तरी अन्य रीतीनें या प्रदेशास रोमच्या हातांत गेल्यामुळें पुष्कळ फायदे झाले. रोमनलोक तेथें येऊन राहूं लागले, व त्याच्याबरोबर विद्या व कला इकडे आल्या. आतां देशांत शेती पुष्कळ चालू झाली व निरनिराळ्या गांवांची वसाहत होऊं लागली. शहरें बांधलीं गेलीं. हुन्नर वाढला. ह्या वेळीं राजधानी यॉर्क येथें होती. लंडन शहर याच वेळीं प्रथम वसविलें गेलें. देशांत जाण्यायेण्यासाठीं चार मोठे राजमार्ग बांधले गेले. प्रत्येक शहरानें आपआपला अंमल चालवावा व कर वसूल करावा. ही जी पद्धत हल्लीं इंग्लंडांत ठिकठिकाणच्या म्युनिसिपालिट्यांमध्यें आहे, तिचा पाया याचवेळीं घातला गेला. अशा तऱ्हेनें रोमचें राज्य तीनशें वर्षें चाललें, व एवढ्या मुदतींत या मुलुखाचें स्वरूप पार बदलून जाऊन तो सुधारला.

इतकें झालें तरी एक मोठें नुकसान असें झालें कीं, त्याच्या योगानें बाकीच्या झालेल्या सर्व फायद्यांवर बोळा फिरला. रोमन-राज्याची पद्धत अशी होती कीं, त्यामुळें त्यांच्या ताब्यांतील लोकांचें क्षत्रियत्व नष्ट होऊन ते वैश्य बनले. त्या योगानें ब्रिटन-

लोकांचा रोजगार धंद्यांत उत्कर्ष झाला, पण ते स्वतःचें शौर्य गमावून बसले. कोणत्याही लोकांमध्यें शौर्य ही किती अमूल्य वस्तु आहे, तें ब्रिटनलोकांचें त्याच्या अभावीं जे हाल झाले, त्यावरून लक्ष्यांत येईल. त्यांची दौलत लुटली गेली, मुलूख दुसऱ्यांच्या हातीं गेला, आणि त्यांचें बीमूळ सुद्धां तेथें राहिलें नाही.

**रोमनशाहीचा अस्त**–तुम्ही कदाचित् ह्मणाल कीं, रोमचें राज्य होतें तर त्यांनीं बिचाऱ्या ब्रिटनांचें रक्षण कां केलें नाहीं? पण बिचारें रोमच मरावयास पडलें होतें, तर तें दुसऱ्यास काय वांचविणार? चढती व पडती ही सर्वांसच आहे. या जगांत कोणाचें राज्य अमर आहे? त्याचप्रमाणें रोमचें झालें. भरभराट बरीच झाल्यामुळें रोमचे लोक ऐषारामांत गर्क होऊन गेले, दुराचार वाढले, राज्याची सर्व शिस्त मोडली व त्यावेळीं दैवयोगानें त्यांच्या राज्यावर चाऱ्ही बाजूंनीं रानटी लोकांनीं उचल केली. इसवीसनाच्या चौथ्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत सर्व यूरोपच्या उत्तरेस माणसांचें मोठें पेंव फुटलें व तेथें त्यांचा समावेश न झाल्यानें ते दक्षिण व पश्चिमेकडील भागांवर तुटून पडूं लागले. त्या लोकांनीं येऊन यूरोपांतील सगळीं राज्यें तोडून टाकलीं, जुन्या सुधारणेचा नाश केला व एकंदर रहाणीचें स्वरूप बदलून टाकलें.

अशा लोकांचे हल्ले थेट रोमपर्यंत जेव्हां भिडले, तेव्हां ब्रिटनमधून सर्व लष्कर स्वतःच्या बचावासाठीं परत बोलावून

ेणें रोमला भाग पडलें ( इ. स. ४१० ). ब्रिटनांस याप्रमाणें री स्वातंत्र्य पुन्हा मिळालें, तरी त्यांस तें रुचलें नाहीं. त्या ोकांचे सर्व शौर्यादि गुण नष्ट झाले होते व म्हणून पिक्ट लोकांस स्कॉट लुटारूंसमोर स्वतःचें रक्षण करण्याची मुळीं देखील शक्ति नव्हती. ते शत्रू तर रोमचें लष्कर जाण्याचीच वाट पहात बसले होते. त्यांच्या टोळ्या एकामागून एक खालीं उतरून आल्या व त्यांनीं ब्रिटनांस अगदीं जेरीस आणलें. यावेळीं त्यांनीं " ब्रिटनचे रुदनालाप " या नांवाचा रोमकडे अर्ज पाठविला होता. तो वाचून आपणांस देखील दया येईल. जे लोक रोमन लोकांशींही टक्कर देण्यास डरले नाहींत, तेच लोक या लुटारूंपासून आपलें रक्षण करूं शकले नाहींत. रोमनलोकांनीं जातेवेळीं त्यांस हत्यारें परत दिलीं होतीं व त्यांस कवाईत शिकविण्याचीहि कांहीं कोशीस घेतली होती. परंतु जेथें मुळांतच हिंमत नाहीं तेथें नुसत्या हत्यारांचा काय उपयोग ?

**ब्रिटनांचा नाश**—परंतु रोमकडून कांहीं देखील मदत मिळणें शक्य नव्हतें. त्यामुळें ब्रिटनलोक विचारांत पडलें कीं, आतां काय करावें. आपापसांत भांडणें वाढलीं व दुफळी झाली. अशा बिकट वेळीं जर्मनींतून हेन्जिस्ट व होर्सा या नांवाच्या दोघां सरदारांस त्यांनीं आपल्या मदतीस बोलावून आणलें ( इ. स. ४४९ ). त्यांनीं येऊन पिक्ट व स्कॉट यांची पीडा तात्पुरती टाळली, परंतु जे मित्र म्हणून बोलाविले ते शत्रू होऊन बसले. या जर्मनलोकांनीं

लुटारूंस तर काढलें, पण त्यांस स्वतंःस कोणी काढावें ? ते परत तर गेले नाहींतच, पण मुलूख मात्र बळकावून बसले. त्यांस सहज राज्य मिळालें असें ऐकून जर्मनींतून एकामागून एक दुसऱ्या टोळ्या येऊं लागल्या. आतां ब्रिटनांचे पुरे हाल आले. हे जंगली परदेशी लोक महादुष्ट, लोभी व तामसी होते. रोमनलोकांप्रमाणें राज्य मिळवूनच ते राहिले नाहींत, तर ब्रिटनांचें सर्वस्व हिरावून त्यांचा बींमोड करण्याचा त्यांनीं सपाटा लाविला. असें ह्मणतात कीं, ब्रिटनलोकांतील सगळ्या पुरुषांना या राक्षसांनीं टिपून काढून त्यांची कत्तल करून टाकली, आणि बायकांस पकडून त्यांनीं घरांतच ठेविलें, कारण कीं त्यांच्यापैकीं बहुतेक इकडे सडेच आले होते. ब्रिटनलोकांतील जे लोक वतनवाडी सोडून पळून गेले तेच वांचले व सर्व देश या परदेशी लोकांनीं वसविला.

ब्रिटनलोकांतील जे थोडे पळून गेले ते वेल्स, स्कॉटलंड, आयर्लंड, व फ्रान्स वगैरे देशांत राहिले.

---

## प्रकरण ३ रें.

(इ. स. ४४९ पासून इ. स. १०६६ पर्यंत).

### ॲंग्लोसॅक्सन व डेन लोकांचें राज्य.

मागल्या प्रकरणांत आपण पाहिलें कीं, इंग्लंडांतून ब्रिटनलोकांचा बींमोड झाला, परंतु तसें होण्यास सुमारें दीडशें वर्षें लागलीं,

व यादरम्यान परदेशी लोकांचीं निरनिराळीं सात राज्यें स्थापिलीं गेलीं. त्या लोकांनीं या देशाचा जो सुपीक भाग आपल्या ताब्यांत घेतला त्याचें यापुढें इंग्लंड, म्हणजे आंग्ललोकांची भूमी, असें नांव पडलें; कारण कीं जर्मनींतून जे लोक आले होते, त्यांत आंग्ल जात जास्त बलवान् होती. आंग्लशिवाय दुसऱ्या मुख्य जाती सॅक्सन व ज्यूट या होत्या. त्यांपैकीं सॅक्सनलोक मागाहून पुष्कळ पुढें आले व त्यांचा राजा एग्बर्ट यानें सर्वांस जिंकून एकछत्री राज्य केलें ( इ. स. ८२७ ). या वेळेपासून या मुलुखांतील सर्व लोक अँग्लो-सॅक्सन म्हणजे इंग्लंडांतील सॅक्सन या नांवानें ओळखले जाऊं लागले.

याप्रमाणें इंग्लंडचें एकछत्री राज्य होण्यास सुमारें चारशें वर्षें लागलीं. यादरम्यान असल्या तामसी व लोभी लोकांनीं आपापसांत हजारों वेळां कलह व लढाया केल्या हें वेगळें सांगणें नकोच. तशांत दुसऱ्या जंगली लोकांचे यावेळीं समुद्राचे बाजूनें हल्ले होऊं लागले. डेन्मार्कांतील चांचे लोक सप्तराजाच्या वेळीं सुद्धां येऊन, त्यांस हैराण करीतच होते, पण यावेळीं ते एकजुटीनें व येथें रहाण्याच्या हेतूनें येऊं लागले.

डेन व सॅक्सन हे दोन्ही मूळचे एका जातीचे खरे, तरी सॅक्सनलोक इंग्लंडांत येऊन राहिल्यापासून पुष्कळ सुधारले व त्यांना खिस्ती धर्म ( इ. स. ५९७ पासून ) स्वीकारला. डेनलोक तर मूळचा जंगलीधर्म पाळीत होते व त्यामुळें सॅक्सनलोकांस

ते आपले ज्ञातिबंधु समजत नसत. ते लोक अनेक तामसी देवतांस मानीत व परलोकासंबंधानें त्यांचे विचारसुद्धां असेच असुरी व रानबट असत. लढाईंत मरणारा स्वर्गांत जातो, व स्वर्गांत मोठ्यांत मोठें सुख हें कीं, शत्रूच्या कवचींत दारू भरून प्यावयास मिळते, अशी त्यांची समजूत असे. असले लोक जेथें जातील तेथें ते दैत्यासारखे भासले तर त्यांत कांहीं नवल नाहीं.

**महान् आल्फ्रेड ( आल्फ्रेड धि ग्रेट ).**–डेनलोकांचे हल्ले बरेच जोरावर आले,त्यावेळीं इंग्लंडच्या सुदैवानें त्यांच्या गादीवर फारच शहाणा व पराक्रमी राजा होता. आल्फ्रेडचें नांव अजून देखील लोकप्रिय आहे. या वेळीं जर कोणी दुसरा राजा असता, तर निःसंशय सगळें राज्य डेनलोकांच्याच हातांत गेलें असतें. आल्फ्रेड व डेनलोकांचे सरदार यांच्यामध्यें पुष्कळ लढाया व करारमदार झाले. एक वेळ आल्फ्रेडचा जय होई. व दुसऱ्या वेळीं डेनलोकांचा होई. कित्येक वेळां तर आल्फ्रेडास वस्ती सोडून रानोमाळ रखडावें लागत असे. परंतु तो महत्वाकांक्षी व शूर होता. शेवटीं त्यानें त्या लोकांस नरम आणलें व त्यांस पूर्वेकडील कांहीं मुलूख देऊन तंटा मिटविला. अशा रीतीनें डेनलोकांस ह्या देशांत रहावयास मिळालें, व हळूहळू त्यांची संख्या वाढत गेली.

आल्फ्रेडनें याप्रमाणें राज्याचें रक्षण करून नवीन काय करून राज्याचा नीट बंदोबस्त ठेविला. तो स्वतः उद्योगी, देशा-

भिमानी, विद्याभिलाषी व उदार होता. त्याला महान् (धि ग्रेट) असें जें टोपणनांव दिलें आहे तें सर्व प्रकारें योग्यच आहे. तो मोठ्या वयांत लिहिणें वाचणें शिकला, तरीसुद्धां तो इतका हुशार झाला होता कीं, त्यानें अनेक पुस्तकें लिहिलीं आहेत. त्यानें १२० गलबतें बांधवून इंग्रजी आरमाराचा पाया घातला हा प्रतापी राजा इ. स. ९०१ त मरण पावला.

**वेडा एथलरेड**—आल्फ्रेडच्या मरणानंतर कांहीं वर्षेंपर्यंत राज्य ठीक चाललें, पण मागाहून पुन्हां मारामारी सुरू झाली. गादीसाठीं पुष्कळ भांडणें सुरू झालीं, विषप्रयोग होऊं लागले, खून होऊं लागले व लढाया चालू झाल्या. राजपुत्रांच्या खटपटी बरोबरच धर्मगुरूंच्या खटपटी सुरू झाल्यामुळें राज्याची खराबी होऊं लागली, कारण यावेळीं लोक धर्मवेडे झाल्यामुळें धर्मगुरूंचें वर्चस्व दरबारांत बरेंच वाढूं लागलें. डेनलोकांची वस्ती वाढत गेली व ते दंगे करूं लागले. देशाची अशी स्थिति असतां एथलरेड या नांवाचा एक राजा झाला. त्याला वेडा एथलरेड ह्मणत व तो खरोखर तसाच होता. त्यानें विरुद्ध पक्षास खूष करण्यासाठीं नॉर्मंडीचा ड्यूक रॉबर्ट याची मुलगी एमा हिच्याशीं लग्न केलें. याच्या कारकीर्दींत डेनलोक पुन्हा समुद्रापलीकडून येऊं लागले. त्यांस लांच देऊन तो त्यांची मनधरणी करूं लागला. त्यामुळें त्यांचा लोभ जास्त वाढला. मागाहून त्यास असा विचार सुचला कीं, यावेळीं इंग्लंडांत असलेल्या डेनलोकांकडून फार भय आ

व ह्मणून त्या सर्वांची एका रात्रीं त्यानें कत्तल करण्याचा हुकूम केला. अशा दुष्ट कृत्यामुळें सॅक्सन गादीचा शेवट झाला. या कत्तलींत डेन्मार्कच्या राजाची एक बहीण मारली गेली. या गोष्टीची बातमी लागतांच त्या राजानें एकदम चढाई करून याच्या हातून इंग्लंडचें राज्य घेतलें, परंतु तो राजा मरून गेल्यामुळें पुन्हां गादीवर बसण्याची एथलरेड यास संधि मिळाली डेन्मार्कच्या राजाचा मुलगा कॅन्यूट हा फार शूर होता व तो स्वारी करून आला तेव्हां हा भित्रा राजा लंडन शहरांत लपून राहिला व तेथें थोड्या दिवसांत मरण पावला. सरदारांनीं मध्यस्थी करून असा ठराव केला कीं एथलरेडच्या मुलानें व कॅन्युटनें इंग्लंडचें राज्य वांटून घ्यावें. पण हा करार अमलांत येण्यापूर्वींच सॅक्सन राजपुत्राचा खून झाला व कॅन्यूट लांचखाऊ सरदारांच्या संमतीनें सगळ्या राज्याचा मालक झाला ( इ. स. १०३६ ).

कॅन्यूट फारच चांगला राजा निघाला. कोणाचाही पक्षपात न करतां तो चोख निवाडा करी व कायद्याप्रमाणें वागे. त्यानें स्कॉटलंडवर स्वारी करून आपला पराक्रम गाजविला. तो मेल्यानंतर त्याच्या तिघां मुलांनीं इंग्लंड, नॉर्वे व डेन्मार्कचीं राज्यें वांटून घेतलीं. ज्याला इंग्लंडची गादी मिळाली होती तो मरून गेला तेव्हां डेन्मार्कवाल्यास तीही गादी मिळाली. तो फार दुराचारी निघाला व त्याचा शेवट दारूच्या व्यसनांत झाला.

या वेळीं गॉडविन नांवाच्या एका पाताळयंत्री सरदाराचें बरेंच प्रस्थ माजलें होतें. त्यानें एथलरेडचा एक मुलगा एडवर्ड

यास गादीवर बसवून स्वतःच्या मुलीचें त्याच्याशीं लग्न लावून दिलें. हा राजा " फकीर एडवर्ड " या नांवानें ओळखला जातो, कारण त्यास राजवैभवाबद्दल कांहींच प्रेम वाटत नसे. तो नॉर्मंडींत स्वतःच्या मामाच्या घरीं वाढला होता, त्यामुळें त्यानें गादीवर बसल्यानंतर पुष्कळ नॉर्मनांस आपल्या दरबारीं बोलावून घेतलें. नॉर्मनलोक विशेष शिकलेले, चतुर व रसिक असल्यामुळें मोठ्या पदव्यांस लायक असे होते. परंतु यामुळें मूळच्या रहिवाशांस स्वाभाविकच दुःख वाटलें. या असंतोषाचा लाभ घेऊन गॉडविनानें बंड उभारलें. त्यांत तो हरला, परंतु त्याची सत्ता एवढी होती कीं, राजासही त्याचें कांहीं करतां आलें नाहीं. गॉडविन नंतर थोड्या वेळानें मरून गेला व त्याची सर्व सरदारी त्याचा मुलगा हॅरोल्ड यास मिळाली. हॅरोल्ड बापापेक्षांही अधिक बलवान निघाला. त्यानें राज्यांत मोठी सत्ता गाजविली व राजा मेला तेव्हां लोकांकडून गादी मिळविण्यास त्यास कांहीं हरकत पडली नाहीं (इ. स. १०६६).

हॅरोल्ड महापराक्रमी, हुशार व गुणवान् होता, परंतु त्याच्या नशिबीं हें राज्य नव्हतें. राज्याभिषेक झाला नाहीं तोंच त्याचा स्वतःचाच भाऊ नॉर्वेच्या राजासह त्याच्यावर स्वारी करून आला. तें सैन्य पुष्कळ भारी होतें. तरी हॅरोल्डच्या पराक्रमापुढें त्याचें काहीं चाललें नाहीं; पण मोठें नुकसान हें झालें कीं, हॅरोल्ड इकडे गुंतल्यामुळें दुसरा एक मोठा शत्रू इंग्लंडांत येऊन उभा राहिला, व हा

शत्रू म्हणजे नॉर्मंडीचा ड्यूक उइल्यम होय. या शत्रूपासून ज्यास्ती भीति बाळगण्याचें कारण असें होतें कीं, त्याची बाजु सत्य आहे अशी लोकांची समजूत होती. वास्तविक इंग्लंडच्या गादीवर त्याचा कांहींही हक्क नव्हता. तो फकीर एडवर्डच्या मामाच्या मुलाचा दासीपुत्र होता. पण त्याचें म्हणणें असें होतें कीं, एडवर्ड हा स्वःतचें राज्य आपणास देऊन गेला होता अशा विचार एडवर्डच्या हयातींत चालला होता खरा व ए प्रसंगीं हॅरोल्ड नॉर्मंडींत गेला होता तेव्हां त्यानें असा ले करून घेतला होता कीं, इंग्लंडचें राज्य मिळण्यासाठीं मी तुम्ह सहाय्य करीन. हॅरोल्ड म्हणतो कीं, हा लेख मजपासून जबरदस्ती करून घेतला होता. ही तक्रार पोपकडे गेली व त्यानें उइल्यमः म्हणणें मान्य केलें व हॅरोल्डास शपथ मोडणारा ठरविला. य कारणामुळें यूरोपांतील दुसरेसुद्धां पुष्कळ लोक हें धर्मयुद्ध आ असें समजून उइल्यमास येऊन मिळाले, व हॅरोल्डचें स्वःताचें लष्कर त्याच्यातर्फेनें लढावयास कांकूं करूं लागलें.

**हेस्टिंग्जचें युद्ध.**—तरी पण हॅरोल्ड भ्याला नाहीं. उइल्य आल्याची बातमी ऐकतांच तो त्याच्यासमोर चालून गेला. रस्त्यांत त्याचें लष्कर कमी कमी होऊं लागलें, परंतु त्याची त्यानें प केली नाहीं. त्यानें हिंमत धरून वखबरदारीनें हेस्टिंग्ज जव मोठें युद्ध केलें. उइल्यमचे सर्व हल्ले फुकट गेले. हॅरोल्ड चातुर्यानें मोर्चे असे बांधले होते कीं, त्यास उइल्यमचा श

बसणें शक्य नव्हतें. उइल्यमनें यावेळीं एक युक्ति केली. जसें कांहीं पळून जात आहों अशी हूल दाखविण्याचा आपल्या लष्करास त्यानें हुकूम केला. या हुलीस फसून इंग्रज सैन्य पाठलाग करीत पुढें येतांच या लष्करानें एकदम तोंड फिरवून त्यांच्याशीं युद्ध केलें. याप्रमाणें इंग्रज दोनवेळ फसले व त्यामुळें त्यांचें फार नुकसान झालें. तरी पण हॅरोल्ड खऱ्या रजपुताप्रमाणें प्रतिज्ञाच करून आला होता कीं, मारीन नाहींतर मरेन. त्याचे शिपाई फार कामीं आले. दोन भाऊ डोळ्यांदेखत पडले, व स्वतः तो जखमी झाला; तरीपण हॅरोल्ड तसाच लढतां लढतां मारला गेला. हॅरोल्डबरोबरच सॅक्सनराज्य लयास गेलें व इंग्लंडांत परदेशी अमलाची बिकट स्थिति पुन्हां सुरू झाली (इ. स. १०६६).

यामुळें इंग्रज लोक दुसऱ्या एखाद्या सॅक्सन राजपुत्रास गादी देण्याचा विचार करीत होते. परंतु इतक्यांत उइल्यम तेथें अचूक जाऊन पोंचला व त्याला बघून सर्व भिऊन गेले. देशांतील सर्व जुने कायदे मी पाळीन अशी शपथ घेऊन तो इंग्लंडच्या गादीवर बसून आपणास राजा म्हणवूं लागला (इ. स. १०६६), व लोकही बिनतक्रार त्यास मानूं लागले.

# प्रकरण ४ थें.

## स्वभाववर्णन.

नॉर्मनलोक येण्यापूर्वी पहिल्या तीन वर्णांचें संमिश्रण चालू होतेंच, त्यांत नॉर्मनलोक कसे मिसळले त्याचें वर्णन पुढें करण्यांत येईल. त्यापूर्वी नॉर्मन व मूळच्या तीन जातींचे स्वभाव व आचारविचार कसे होते त्याचा यावेळीं कांहीं विचार केल्यास बरें.

**ब्रिटन लोक**-हे बिचारे येथून बहुतेक निर्मूळच होऊन गेले होते, ह्मणून त्यांच्याविषयीं कांहीं विशेष सांगण्याची जरूर नाहीं.

हे लोक स्वभावानें आवेशी, सत्यनिष्ठ व तिखट असून त्यांची बुद्धि चपळ व तीक्ष्ण होती. आपण त्यांस प्रथमतः रानटी स्थितींत पाहिलें. परंतु त्यांच्यांत कलह नव्हते. लढाईचा प्रसंग आल्यास ते किती धैर्यानें लढत तें आपण मागें पाहिलेंच आहे. युद्धकला विसरून गेल्यामुळें जंगली सॅक्सनांसमोर त्यांचा टिकाव लागला नाहीं. तरी पण ते शरण न जातां लढून मरून गेले. इंग्रजांत जो उत्साह व चलाख बुद्धि आहे त्यांच्या मुळाशीं ब्रिटनलोक आहेत असें समजण्यांत येतें.

**अँग्लो सॅक्सन लोक**-या लोकांचा मूळ स्वभाव धाडशी होता हें पूर्वी सांगितलेंच आहे. परंतु हें धाडस वेडसर नसून

ते खरोखरच धीट व बुद्धिमान लोक होते. त्यामुळें ते नेहमीं मदोन्मत्त असत, परंतु कधींहीं मदांध न होतां ते प्रसंग पाहून वागत असत. कोणतेंही काम विचार करूनच ते हातीं घेत, व त्यांत दृढनिश्चयानें कार्यसिद्धि मिळवीत. हल्लीं इंग्रजांत जो दृढनिश्चयाचा अमूल्य सद्गुण आहे, तो त्यांस त्यांच्या या रानटी पूर्वजांपासूनच पिढीजाद मिळालेला आहे.

अशा स्वभावाच्या लोकांस व्यवहारांत देखील यश आल्याशिवाय कधींहीं रहावयाचें नाहीं. ते जेव्हां जर्मनीच्या जंगलांत रहात होते, तेव्हां युद्ध हाच त्यांचा धंदा होता. तेथें त्यांची थोडी शेतीभाती होती खरी, पण तींत खपण्याचें काम त्यानीं गुलामांसच सोंपविलें होतें. रोमनांनीं पुष्कळ जंगली लोकांस जिंकलें होतें, परंतु जर्मन लोक कधींहि जिंकले गेले नाहींत; उलट हे लोक त्यांच्या मुलुखावर हल्ले करून नेहमीं लुटालूट करीत, व शेवटीं ह्या जातीच्याच कांहीं लोकांनीं त्या बादशाही साम्राज्याचा नाश केला.

त्या लोकांस स्वातंत्र्य अत्यंत प्रीय असे, व ह्मणून ते आपापसांत देखील तुटकपणानें वागत असत. खुद्द जर्मनींत ते शहर अगर गांव वसवून न रहातां एकमेकांपासून मैला मैलाच्या अंतरावर रहात असत. निष्कारण बंधन कोणत्याही तऱ्हेचें सुद्धां पतकरूं नये हाच त्या लोकांचा सिद्धांत होता.

त्यांच्या स्त्रिया देखील अशाच शूर व स्वतंत्र बुद्धीच्या होत्या. लढाईंत त्यांस ते आपणाबरोबर नेत व नेहमीं मित्रां-

प्रमाणें वागवीत. पडद्याची अगर दोन बायका करण्याची चाल त्यांच्यांत बिलकुल नव्हती. स्त्रियांस पुरुषांप्रमाणें सर्व सूट होती, व त्यामुळें त्या शूर व सद्गुणी उपजत.

त्यांच्या मूळ वतनांत राज्यव्यवस्था देखील या त्यांच्या स्वभावास साजेशीच होती. लढाईस जाते वेळीं आपणांपैकीं कोणासही ते आपला सरदार ठरवीत. त्यांच्यांत राजगादी वंशपरंपरेनें चालणारी नसून राजकुटुंबांतील लोक ज्यास पसंत करीत तोच राजा होई. राजाची सत्ता मर्यादित केलेली होती. मोठमोठीं कामें लोकांस गोळा करून त्यांस विचारून जेव्हां तो करी तेव्हांच तीं त्याच्यानें होत. आपापसांत शांतता ठेवण्यासाठीं शंभर शंभर माणसांचे संघ तयार केले जात, व तंटा भांडण न होऊं देण्यासाठीं ते स्वतःच खबरदारी घेत. मोठ्या गुन्ह्यांसाठीं निराळे न्यायाधीश होते. परंतु तेही लोकांनींच निवडलेले असत.

यावरून तुमच्या लक्षांत येईल कीं या लोकांस स्वातंत्र्य खरोखर अत्यंत प्रिय होतें. कदाचित् तुह्मी ह्मणाल कीं, स्वातंत्र्य कोणास प्रिय नसतें ? तें सर्वांस आवडतें, पण प्रत्येकाच्या आवडींत फरक असतो. या लोकांस तर स्वातंत्र्य ह्मणजे जीव कीं प्राण होतें. त्याशिवाय सर्व सुखें त्यांस कडू विषाप्रमाणें लागत. स्वतंत्रतेशिवाय त्यांस जिवंत रहाणें अशक्य वाटे. परस्वाधीन असण्यापेक्षां मरणें बरें असें त्यांस वाटत असल्यामुळें ते स्वतंत्रतेसाठीं सुखसंपत्तीचा एकदम त्याग करून प्राण देत, परंतु पारतंत्र्य कधींही पतकरीत नसत.

इंग्लंडांत आल्यानंतर या लोकांचा उच्छृंखलपणा जाऊन ते शांत झाले व सुधरूं लागले. तेथें त्यांनीं कायदे केले व राजास अमर्याद होऊं न देण्यासाठीं त्यांनीं "विटन" नांवाची मोठी सभा स्थापली. न्याय वगैरेचें काम सुद्धां मूळच्या धोरणाप्रमाणें असें ठेविलें कीं, स्वातंत्र्य राहील व लोकांवर जुलूम होणार नाहीं. पण ही वेळ लढाया व तंट्याची होती, म्हणून सर्वांचें रक्षण व समाधान व्हावें म्हणून सरदारांस जास्त अधिकार देणें त्यांस भाग पडलें. यामुळें ते सरदार हळुहळु फार बलवान् होऊन शेवटीं त्यांचा एक मोठा सरदारवर्ग तयार झाला.

जेव्हां इंग्लंडचें राज्य एक झालें, तेव्हां राजाची सत्ता सुद्धां जास्त वाढली व कधीं कधीं तो मर्जीस येईल तसा वागूं लागला. तरी पण राजावर सरदारांचा जबरदस्त दाब होता. विटन सभेंत ते जे कायदे मंजूर करीत त्याप्रमाणें चालणें राजास भाग पडे. वंशपरंपरेची चाल अजून त्यांस माहीत नव्हती. त्यामुळें राजपुत्रांमध्यें वरचेवर लढाया होत व देशांत नेहमीं भानगडी उपस्थित होत. ज्याच्या बाजूस पुष्कळ सरदार असत, त्यास राज्य मिळे. यामुळें सरदारांची सत्ता होती त्याहूनही वाढली, साधारण लोकांचें स्वातंत्र्य कमी झालें व राज्यांतील फेरफारींत त्यांस कांहीं लाभ राहिला नाहीं. सरदारांत मत्सरी, भांडखोर, खुशामत करणारे व आपापला स्वार्थ पाहणारे लोक वाढले, व त्यामुळें शेवटीं सर्व देश परक्यांच्या हातीं झपाट्यानें जाऊं लागला.

यावरून असें दिसतें कीं अँग्लो सॅक्सन लोकांनीं इंग्लंडांत एका अपूर्व राज्यव्यवस्थेची सुरवात तर केली, परंतु त्यांच्यानें पाहिजे तितका मजबूत पाया घालवला नाहीं, व त्यामुळें ती अर्ध्यावरच मोडून पडली. त्यांच्या स्वतःच्या अंतःकरणानें उत्तम राजनीतीचीं तत्वें ओळखलीं तर खरीं, परंतु त्यांची त्यांच्यानें जरूर ती व्यवस्था करविली नाहीं. या कामासाठीं जास्त सूक्ष्म, दीर्घ व विशाल बुद्धीची जरूर होती. ती ह्या लोकांस नव्हती. पण या भाग्यशाली देशास ईश्वरानें तसे लोक सुद्धां मिळवून दिले व त्यांनीं येऊन हळुहळु राज्यव्यवस्था अशी केली कीं, तिच्याकडे जगांतील सर्व लोक आज सानंदाश्चर्यानें पहात राहिले आहेत.

या वर्णनावरून तुमच्या ध्यानांत आलें असेलच कीं हे लोक म्हणजे नॉर्मन लोकच होत. त्यांचें सविस्तर वर्णन करण्यापूर्वीं डेन लोक कोण व कसे होते तें सांगितलें पाहिजे.

इंग्लंडची लोकस्थिति सुधरण्यासाठीं सुद्धां भिन्न स्वभावाच्या लोकांची बरीच जरूर होती. सॅक्सन लोक इंग्लंडांत आल्यावर सुधरले होते, व त्यांच्या बरोबर कित्येक हुन्नर कला आल्या होत्या. तरी देखील त्या मुलुखांतील सर्व जंगलें अजून कापलीं गेलीं नव्हतीं, व शेती पूर्णपणें चालली नव्हती. ते पुष्कळ डुकर पाळीत व तीच त्यांची मोठी दौलत समजली जाई. ते घरें बांधीत त्यांत कांहीं जोर व शोभा नसे गृहसाहित्याचें नांवच नसे व सर्व घर उकिरड्यासारखें दिसत असे.

डुकराचें मांस पुष्कळ खावें, दारू प्यावी व कैफाच्या धुंदींत प्रेतासारखें पडून रहावें यांतच त्यांस चैन वाटत असे. त्यांनीं सर्व यूरोपांत खलाशीपणाबद्दल मोठें नांव मिळविलें होतें. त्यांच्यांत स्वच्छता बिलकुल नव्हती, व म्हणून सर्वजण त्यांचा तिरस्कार करीत. स्वच्छ व रसिक लोकांची खरोखरच इंग्लंडांत जरूर होती, व ती सुद्धां रोमन लोकांच्या येण्यानें पुष्कळ अंशीं दूर झाली.

**डेन लोक**—नॉर्वे, डेन्मार्क व स्वीडनकडून हे प्रथम चांचे लोक म्हणून आले. ते सॅक्सनांपेक्षां ज्यास्त धाडशी व उच्छृंखळ व स्वातंत्र्यप्रीय होते. त्या लोकांत राजे नांवाचेच असत. एखादा राजा नापसंत वाटल्यास त्यास पदच्यूत करण्यास ते वेळ लावीत नसत. ते लोक शूर, साहसी, धीट व निर्दय होते. समुद्रावरील लढाईंत ते फार हुशार होते. चांचेपणासाठींच ते गलबतें ठेवीत असें नव्हे. यूरोपच्या उत्तर भागांत ते पुष्कळ व्यापार चालवीत, व व्यापारी गलबतांस ते लुटत नसत. त्यांस खाणी खोदण्याची माहिती असून ते धातु काढून त्यांस निरनिराळे आकार देत. त्यांस कविता व गायनाचा विशेष शोक होता. ते स्त्रियांस मान देत व त्यांस सहानुभूतीनें वागवीत.

अशाप्रकारें सॅक्सनांपेक्षां कित्येक बाबतींनीं हे लोक वरचढ होते असें वाटतें, तरी पण मूळ जात तर एकच होती व कांहींशा रजोगुणी स्वभावाबरोबरच त्यांच्यांत निर्दयता विशेष होती. इंग्लंडांत व फ्रान्समध्यें या लोकांचा फार त्रास होता. त्यांचे मचवे

दूरवर दिसूं लागले कीं कांठावर रडारडीस सुरवात होते असे. कारण त्यांच्या मनास एखादी माशी मारणें व मनुष्य मारणें सारखेंच वाटत असे.

समुद्रांत गलबतें चालविण्याचीं संवय, साहसी स्वभाव व व्यापारी बुद्धि हीं जीं इंग्रजांत विशेष दिसतात तीं या लोकांतुनच आलीं असें मानलें तरी वाजवी होईल.

अँग्लो सॅक्सन लोकांनीं जी राज्यरचना केली त्यांत या लोकांची सुद्धां कांहीं मदत असेलच, कारण जरी ते थोडथोडे आले तरी एकंदरींत त्यांची संख्या देशांत कांहीं कमी नव्हती. इंग्लंडच्या ईशान्य भागांतील लोक डेनवंशांतले आहेत असें मानण्यांत येतें. नेलसन हें नांव डेन लोकांत फार प्रचारांत होतें.

**नॉर्मन लोकः**—हे सुद्धां पहिल्यानें नॉर्वेकडील व डेन जातीचे होते, पण सुमारें दीडशें वर्षांपासून फ्रान्सांत येऊन तेथील उत्तर भागाचा बराच मुलुख ते बळकावून बसले होते. फ्रान्सच्या सुधारलेल्या मुलुखांत ते आले तेव्हां ते जंगलीच होते, परंतु त्यांचा स्वभाव सुधरण्यास अनुकूल असा होता. चांगलें त्यांस स्वाभाविकपणेंच आवडे, व तें जेथें दिसेल तेथून ते हौसेनें घेत असत. फ्रान्समध्यें येऊन राहिले नाहींत तोंच त्यांनीं आपोआप तेथील भाषा, धर्म व रितीभाती स्वीकारल्या व थोड्याच काळांत ते सर्वांपेक्षां हुशार झाले.

जेरूसलेम व आसपासचा ख्रिस्ताच्या जन्मभूमीचा प्रदेश मुसलमान लोकांच्या ताब्यांतून सोडविण्याबद्दल यूरोपांतील सर्व राजेरजवाडे व सरदारमंडळ या सुमारास एकत्र होऊन प्रयत्न करीत होते. हे ख्रिस्ताचे सैनिक प्रेम, शौर्य व भक्ति यांनीं प्रेरित होऊन उत्तम कामगिरी करीत. शरणाला अभय, सत्य, व भक्ति, हे त्यांचेमध्यें उत्तम गुण होते. क्षत्रीयांस शोभाणाऱ्या या गुणांच्या समुच्चयास शिव्हलरी (Chivalry) असें ह्मणत. हा क्षात्रधर्म त्यावेळीं यूरोपांत प्रचलित असून त्यांत नॉर्मन लोकांस अग्रेसरत्वानें स्थान दिलें पाहिजे. ह्या शिवाय बुद्धिबलासही ते अग्रस्थान देत असत व त्या शिवाय क्षात्रधर्मास तेज नाहीं ह्मणून त्याची वाखाणणी करीत.

सर्व फ्रान्सांत यांचें राज्य यावेळीं फार जबरदस्त होतें; कारण हे लोक धीट व शूर होते. ते रणांत जसे धाडशी, तसेच मसलतींत शहाणे होते. चलाख बुद्धि त्यांच्यांत विशेष होती, परस्परांच्या लाभासाठीं कायद्याच्या बंधनाची जरूरी आहे असें त्यांस वाटत असल्यामुळें त्यांच्या राज्यांत स्वातंत्र्य व बंदोबस्त दोन्हीं सारखींच होतीं.

अशा सद्गुणांच्या जोडीस कित्येक दुर्गुण देखील त्यांच्यांत फार मोठ्या प्रमाणांत होते. ते अतिशय अभिमानी व जुलमी लोक होते. ते आपल्यापेक्षां हलक्या जातींच्या लोकांस पशूसारखेंच मानीत, व त्यांच्या बाबतींत दया किंवा न्याय ह्मणजे काय हें ते जाणत नसत. बोलतां बोलतां एखाद्या नीच मनुष्याचा खून करण्यास

देखील ते मार्गे पुढें पहात नसत. त्यांच्या राज्यांत शेतकरी वगैरे लोक गुलामांच्याच स्थितींत होते, इतकेंच नव्हे, तर त्यांच्यावर दररोज मोठमोठे जुलूम होत, व उद्यां आपण जिवंत राहूं कीं नाहीं याचा त्या बिचाऱ्यांस जरासुद्धां भरंवसा नसे.

नॉर्मनांचे हे सर्व गुण त्यांचा ड्यूक उइल्यम यांत पूर्णपणें होते. त्या काळचा तो खराखरा वीर होता व त्या बरोबरच तो फार शहाणा हुशार व दूरदृष्टीवान् पुरुष होता. तो स्वभावानें निर्दय नव्हता, परंतु कार्यसिद्धीसाठीं वाटतील तीं क्रूर कर्मे करावयासहि तो मार्गेपुढें पाहात नसे.

सध्यां इंग्लंडांत जे सरदार आहेत ते विशेषेंकरून या नॉर्मनांचे वंशज आहेत. तसेंच सर्व इंग्रजांच्या अंगांत जी बादशाही मिजास, विशालबुद्धि व सुधारणेचा शोक दृष्टीस पडतो त्या सर्वांचें मूळ नॉर्मन लोकच होत हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

# भाग २ रा.

इ. स. १०६६ पासून इ. स. १३९९ पर्यंत.

## प्रकरण ५ वें.

### नॉर्मन कुलांतील राजे.

इ. स. १०६६ पासून ११५४ पर्यंत.

नॉर्मनांच्या येण्यानें गरज भागली व इंग्लंडास पुष्कळ फायदा झाला असें आपण मागच्या प्रकरणांत पाहिलें खरें, परंतु तो फायदा ताबडतोब झाला असेल असें समजूं नका. प्रथम तर त्यांच्या येण्यानें देशांत जुलमाचा वर्षाव होऊन अंग्लो-सॅक्सनांचा समूळ नाश झाला.

**विजयी उइल्यमः**—हा राजा गादीवर बसल्यानंतर थोडे महिनेपर्यंत न्यायानें व नरमपणानें वागला. परंतु कोणतेही लोक विदेशी राजाच्या ताब्यांत एकदम कसे जातील ? त्याच सुमारास एक बंड उद्भवलें व या बंडाची बातमी ऐकतांच त्यानें स्वतःचा विक्राळपणा प्रगट केला. या बंडखोरांस त्यानें तरवारीच्या झटक्या-सरशीं उडविलें इतकेंच नव्हे तर या पुढें तद्देशीय लोकांस मारून टाकण्याचाच त्यानें निश्चय केला.

यानंतर उइल्यमनें दया व न्याय यांस एकीकडे ठेऊन इंग्लंडांत ठिकठिकाणीं गवताप्रमाणें माणसांची कापणी चालविली. एके प्रसंगीं हंबर व टे या नद्यांमधील प्रदेशांत एक लहानसें बंड उद्भवलें त्यावरून त्यानें तेथील सगळा शंभर मैलांचा प्रदेशच उध्वस्त करून टाकला. एकही माणूस तेथें राहूं दिलें नाहीं, एवढेंच नव्हे तर गुरांढोरांस देखील शोधून काढून कापून टाकलें, लोकांचीं घरेंदारें तोडून टाकलीं, धान्याचे ढीगचे ढीग करून जाळून टाकले व शेतें व झाडें देखील कापून टाकलीं. त्याचा हेतु या मुलुखांत वस्ती उठवावयाची असा होता. बंडाचें नुसतें निमित्त होतें परंतु असें करण्याचें खास कारण हें होतें कीं, डेन लोक इंग्लंडवर हल्ला करण्यास त्या रस्त्यानें आल्यास त्यांस तेथें कोणत्याही प्रकारचा आश्रय मिळूं नये. या क्रूर कर्मानें एक लाख माणसांचा जीव गेला असेल असा अंदाज आहे. यापुढें अँग्लो सॅक्सनांबरोबर तो मदोन्मत्तपणानेंच वागूं लागला. एके वेळीं स्वतः शिकार करण्यासाठीं एक रान तयार करण्याचें मनांत येतांच त्यानें त्यासाठीं कित्येक गांवें व देवळें मोडून टाकविलीं. दुसऱ्या नॉर्मनांनीं देखील अशींच लहान लहान रानें बनविलीं होतीं व त्यांतील एक जनावर जरी तद्देशीय लोकांपैकीं कोणी मारलें तर त्याचा एकदम हात कापून टाकावा असा सक्त कायदा त्यावेळीं तेथें चालत होता.

याप्रमाणें ज्या राजानें आपल्या तद्देशीय प्रजेची बोकडांप्रमाणें कत्तल करण्याचें चालविलें होतें, त्या राजानें लुटालूट किती

चालविली असेल तें तर तुम्हांस आपोआपच समजेल. त्यानें त्या लोकांपासून सर्व जमीन लुटवून ती नॉर्मन सरदारांस दिली व सॅक्सनांस भिकारी बनवून सोडलें. आतां बिचाऱ्या सॅक्सनांच्या दुर्दैवांत कांहीं बाकी राहिलें नाहीं. त्यांच्यावर नॉर्मन लोक मर्जीस येईल तसा जुलूम करीत, व त्याची दाद कीं फिर्याद कोणी ऐकत नसे. त्यांचा जाणूनबुजून उघड उघड ते तिरस्कार करीत व तें सर्व त्यांस गुपचूप सहन करावें लागे. सारांश, सर्व अँग्लो सॅक्सनांस जबरदस्त दास्यत्व आलें व त्यांत त्यांस जरासुद्धां हूं कीं चूं करण्यास मार्ग राहिला नाहीं.

अशा तऱ्हेच्या क्रूर कृत्यांनीं अवघ्या पांच वर्षांत उइल्यमनें सर्व मुलूख जर्जर करून टाकला; व नंतर इंग्लंडांत नॉर्मन राज्याचा असा भक्कम पाया घातला कीं पुन्हा सॅक्सनांकडून एकही बंड किंवा तंटा झाला नाहीं, व देशी राज्याची कल्पना त्यांच्या स्वप्नांतही येईनाशी झाली. आतांपर्यंत सुद्धां इंग्लंडची गादी त्यांच्याच वंशांत चालत आली आहे. म्हणून उइल्यमास इतिहासांत जें “ विजयी ” असें म्हटलें आहे त्यास तो पूर्णपणें लायक होता. जर त्यानें स्वतःचें राज्य स्थापन करण्यास राक्षसी उपायांचा उपयोग केला नसता तर तो ‘ चांगला राजा ’ सुद्धां म्हटला गेला असता. कारण त्याच्या शहाणपणांत कोणतेंही व्यंग नव्हतें. त्यानें राज्याचा बंदोबस्त ठेविण्यास ज्या ज्या पद्धतीचा उपयोग केला त्यांत त्यानें अतिशय चातुर्य वापरलें. त्याच्या सर्व कायद्यांत

फ्यूडल् सिस्टिम ( Feudal System ) नांवाची जी " सरंजामी पद्धत" होती ती फार महत्वाची आहे व त्यावरून त्याची अपूर्व दूरदृष्टि पूर्णपणें निदर्शनास येते.

**फ्यूडल् सिस्टिम**—हा कायदा यूरोपांत यावेळीं पुष्कळ ठिकाणीं अमलांत होता. उइल्यमनें कित्येक फेरफारांसह तो इंग्लंडांत दाखल केला; व त्याचें राज्य जें भक्कम पायावर स्थापलें गेलें व पुढें हळुहळु त्यांतून जी सध्यांची उत्तम राज्यरचना झाली आहे त्या सगळ्याचें कारण हा कायदाच होय.

ह्यास लष्करी जहागिरीचा कायदा म्हटलें तरी चालेल. ज्यावेळीं कोणताही राजा नवा मुलूख जिंकी, तेव्हां तेथील जमिनीचा चांगलासा भाग स्वतःसाठीं ठेवून बाकीचा तो आपल्या सरदारांस अशा अटींवर वांटून देई कीं, जरूर पडेल त्यावेळीं त्यांनीं लष्कर घेऊन आपल्या मदतीस लढण्यास यावें. हे सरदार पुन्हा ही जमीन अशाच अटींवर आपल्या हाताखालील नायकांस वांटून देत व ते पुन्हां दुसऱ्यांस देत. अशा रीतीनें या मुलुखाची सर्व जमीन लष्करी माणसांच्या हातांत रहात असे व राजास जरूर पडे तेव्हां त्यास पाहिजे तेवढें लष्कर मिळे. अशा प्रकारें परकी लोक जेव्हां एखादा मुलूख जिंकीत, तेव्हां तेथील मूळच्या लोकांस शांत ठेविण्याचा हा एक सोपा मार्ग असे. आपल्या देशांत रजपूत लोक बहुतेक असेंच करीत, व यूरोपांत जेथें जेथें नवीं नवीं राज्यें स्थापिलीं जात तेथें तेथें अशाच रीतीची व्यवस्था असे.

परंतु या व्यवस्थेंत एक अडचण होती ती ही कीं, ते सरदार हळुहळु स्वतंत्र होऊं लागत, व राजास जुमानीत नसत; कारण त्यांच्या हातांत राज्याचा कांहीं भाग असे, एवढेंच नव्हे तर ते आपापल्या प्रांतांत पूर्णपणें राजाप्रमाणें वागत. लढाईच्यावेळीं राजास मदत करण्याशिवाय कोणत्याही बाबतींत राजाची त्यांच्यावर सत्ता नसे. हिंदुस्थानांत जे मांडलीक राजे होते त्यांच्यापेक्षां हे सरदार कोणत्याही रीतीनें कमी दर्जाचे होते असें वाटत नाहीं. ते किल्ले बांधून रहात, लष्कर बाळगीत, दिवाणी व फौजदारी न्याय देत, व स्वतःच्या शेजारी सरदाराबरोबर कांहीं तक्रार झाल्यास राजास न कळवितां आपापसांत ते लढाया पण चालवीत. असल्या बलवान् सरदारांनीं राजाची आज्ञा मानली नाहीं व त्याच्याबरोबर लढण्यास जरी ते तयार झाले तरी त्यांत कांहीं नवल नाहीं. फ्रान्स-मधील पुष्कळ सरदार या स्थितीस पोंचले होते व अँग्लो-सॅक्स-नांत फ्यूडल् सिस्टिमचा कायदा पूर्णपणें अमलांत नव्हता. तरी आपण मागें पाहिलें कीं त्यांच्यांतील सरदार राज्यांत बरीच सत्ता बळकावून बसले होते.

उइल्यमनें फ्रान्समध्यें हें सर्व पाहिले होतें व त्यामुळें हा कायदा इंग्लंडांत दाखल करते वेळीं जरूर ती खबरदारी त्यानें घेतली. त्यानें एतद्देशीय लोकांच्या ज्या जहागिरी घेतल्या त्या-पैकीं बराच भाग त्यानें स्वतःसाठींच ठेविला. नंतर आपल्या सरदारांस मोठमोठ्या जहागिरी देऊन त्यांस खूष तर केलें,

परंतु त्यांत व्यवस्था अशी ठेविली कीं, एकाही सरदारास स्वतंत्र राजा होतां येऊं नये. त्यामुळें एक जहागीर उत्तरेस, तर दुसरी दक्षिणेस, व तिसरी पूर्वेस, तर चौथी पश्चिमेस याप्रमाणें त्यानें जमीनींचे वांटे केले. म्हणून प्रत्येक सरदाराजवळ जहागीर मोठी परंतु दूर दूर अशी झाली. शिवाय फ्रान्समध्यें सरदार ज्यांस जमीनी वांटून देत ते लोक त्या सरदाराशींच एकनिष्ठतेनें वागण्याची प्रतिज्ञा करीत, पण उइल्यमनें मोठ्या सरदारापासून तों एखाद्या लहान पाटलापर्यंत सर्वांस राजाशीं एकनिष्ठतेनें वागण्याविषयीं शपथा घेवविल्या. त्याप्रमाणें कित्येक मोठ्या गुन्ह्यांचा न्याय देणें देखील त्यानें स्वतःच्याच हातांत ठेविलें. यामुळें इंग्लंडांत नॉर्मन सरदार फ्रान्स अगर इटालींतील सरदारांप्रमाणें कधींही स्वतंत्र होऊं शकले नाहींत; तरी देखील त्यांच्या हातीं एवढी सत्ता होती कीं, जर ते सर्व एक झाले तर राजा गैररीतीनें वागूं लागल्यास त्यास ते पूर्णपणें अडवीत.

फ्यूडल् सिस्टिमचा कायदा त्यावेळीं फार अनुकूळ झाला, त्यामुळें यूरोपास पुष्कळ फायदे झाले आहेत. हें जरी खरें, तरी त्याचा एक अत्यंत वाईट परिणाम आजपर्यंत सर्व लोकांस सोसावा लागत आहे व तो टाळण्याचा आतां एकही कायदेशीर उपाय राहिला नाहीं. या कायद्यामुळें जे खरे शेतकरी होते त्यांच्या हातीं काहीं देखील जमीन राहिली नाहीं. ते बिचारे मजुरांच्याच स्थितीस येऊन पोंचले आहेत. सध्यां इंग्लंडची सर्व जमीन

थोड्याच माणसांची ( सरदारांची ) खास मिळकत होऊन राहिली आहे, व ह्मणून पुष्कळ लोकांस सृष्टीच्या या एका सामान्य वस्तुचा कांहींसुद्धां लाभ मिळूं शकला नाहीं. शिवाय त्या कारणामुळें सरकारास जमिनीचें एक कवडी देखील उत्पन्न नाहीं व स्वतःचा खर्च चालविण्यासाठीं लोकांवर दुसरे कर लादावे लागत आहेत.

**उइल्यमचें मरण**—उइल्यम जितका शूर होता, तितक्याच क्रूरपणाचें दैवयोगानें त्यास मरण आलें. फ्रान्सच्या राजाबरोबर भांडण उपस्थित झाल्यामुळें तेथें तो लढण्यास गेला होता. त्यावेळीं स्वतःच्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें एक शहर त्यानें जाळून टाकलें, व तें पुरें जळालें कीं नाहीं हें पहाण्यास तो मोठ्या अभिमानानें व आनंदानें स्वतः तेथें गेला. तेथें त्याच्या घोड्याच्या पायाखालीं जळता निखारा आल्यामुळें तो भडकला, व शरीरानें लठ्ठ असलेला उइल्यम स्वतःच्याच घोड्याखालीं आपटला. या जखमेनेंच त्याचा शेवट झाला. मरतेवेळीं स्वतःच्या दुष्टकर्माबद्दल त्यास फार पश्चात्ताप झाला. स्वतःच्या आत्म्याच्या शांततेसाठीं त्यानें अतोनात दानधर्म केला. त्याचें प्रेत पुरण्यासाठीं नेलें असतां एक धीट गांवढळ मनुष्य ह्मणाला कीं, " मी ईश्वरास स्मरून सांगतों कीं राजाला या जमिनींत पुरतां येणार नाहीं. तो मोठा चोर होता. ही जमीन माझ्या आजापणजापासून माझी आहे व ती तो बळकावून बसला आहे." अशा प्रसंगीं हें बोलणें

ऐकून सर्व जण नुसते पहातच राहिले. शेवटीं कांहीं पैसे देऊन जेव्हां त्यास शांत केलें तेव्हांच उइल्यमास पुरण्यांत आलें.

**राजगादीसाठीं भांडणें**—नॉर्मन लोकांत देखील अजून वडील राजपुत्रास गादी मिळावी अशी वहिवाट होती असें वाटत नाहीं. मरणारे राजे वाटेल त्या राजपुत्रास गादी देऊन जात. ही वहिवाट नेहमीं लढाईस कारण होत असे. उइल्यमच्या मरणानंतर असेंच झालें. वडील राजपुत्र रॉबर्ट यानें बापाच्या हयातींतच बंड उभारलें होतें, त्यामुळें अगर दुसऱ्या कांहीं कारणामुळें त्यास नॉर्मंडी व मेनचा ड्यूक बनवून, मरतेवेळीं उइल्यमनें इंग्लंडची गादी स्वतःचा दुसरा मुलगा उइल्यम " रक्तकेशी " यास दिली. त्यावरून या भावांमध्यें लढाई जुंपली, परंतु सरदारांनीं त्याची समजूत करून असा तह करविला कीं, सध्यां ज्याच्याजवळ जो मुलुख असेल तो त्यानें तसाच ठेवावा, व दोघांपैकीं एक मेल्यावर दुसऱ्यानें तीं दोन्हीं राज्यें घ्यावीं.

परंतु रक्तकेशी मेला तेव्हां रॉबर्ट क्रूझेड लढण्यास पॅलेस्टाइन येथें गेला होता, त्यामुळें त्याचा धाकटा भाऊ हेन्री दोन्ही राज्यें बळकावून बसला. रॉबर्ट आल्यानंतर लढाईस सुरवात झाली, परंतु सरदारांनीं त्यास समजावून पहिल्याप्रमाणेंच तह करविला. मागाहून हेन्रीनें करार मोडून अचानक नॉर्मंडीवर हल्ला केला व शूर परंतु भोळ्या रॉबर्टास पकडून इंग्लंडांत आणून त्यानें त्यास मरेपर्यंत सक्तकैदेंत ठेविलें.

हे दोघेही राजे सर्व बाबतींत बापासारखेच होते. त्यांनीं इंग्लंडांत नॉर्मन राज्य मजबूत केलें. हेन्री सुशिक्षित होता. त्यानें सॅक्सन प्रजेचें प्रेम संपादन करण्यासाठीं बरीच खटपट केली. सॅक्सन राजकुळांतील मटिल्डा नामक राजकन्येबरोबर त्यानें स्वतः लग्न केलें व लोकांस वचन दिलें कीं एडवर्ड धी कनफेसरच्या कायद्याप्रमाणेंच मी वागेन. तरी पण तो आपल्या बापासारखाच लुच्चा व मतलबी मनुष्य होता. यामुळें अजून सॅक्सनांचीं दुःखें थोडीं देखील कमी झालीं नाहींत.

हेन्री मेल्यानंतर इंग्लंडांत गादीसाठीं पुष्कळ तंटे उपस्थित झाले. त्याचा मुलगा तर त्याच्या हयातींतच मेला होता व म्हणून त्यानें स्वतःची मुलगी मटिल्डा हिला गादी मिळावी अशी पक्की व्यवस्था करून तो गेला होता. परंतु ज्यास त्यानें फ्रान्समधून बोलावून आणून मुलासारखें पाळलें होतें तो त्याचा भाचा स्टिफन खटपट करून स्वतःच गादीवर बसला. त्यावरून त्या दोघांत मोठी लढाई उपस्थित झाली. एकदां एक जिंके तर दुसऱ्या वेळीं दुसरा, व इंग्लंडची गादी परस्परांच्या हातांत वारंवार जाऊं लागली. याप्रमाणें पंधरा वर्षें चाललें व त्यामुळें सर्व मुलुखाची नासाडी झाली, व सरदार लोक किल्ले बांधून जिकडे तिकडे लुटालूट व जुलूम चालवूं लागले. ह्या अंदाधुंदीच्या वेळीं शेतीभाती किंवा रोजगार धंदा कोणाच्यानें होणार? दुष्काळ पडले व हजारों माणसें ठिकठिकाणीं मरूं लागलीं. या वेळीं

सॅक्सनांस जीं दुःखें भोगावीं लागलीं तशीं त्यांस कधींही लागलीं नव्हतीं. देशांतील वस्ती देखील कमी होऊन गेली.

याप्रमाणें लोक व शेवटीं सरदार देखील मेटाकुटीस आले होते; इतक्यांत मटिल्डाचा मुलगा हेन्री पुष्कळ लष्कर घेऊन इंग्लंडांत आला. सरदारांनीं पाहिलें कीं आतां जर अधिक वेळ लढाई चालली तर सर्वांचा नाश होणार. म्हणून त्यांनीं पूर्वीप्रमाणेंच निकाल करून, दोघांची लढाई थांबविली व एका वर्षांत स्टिफन मरून जातांच दुसरा हेन्री या नावानें तो इंग्लंडच्या गादीवर बसला. ( इ. स. ११५४ ). त्यावेळीं लोकांनीं आनंदानें जयघोष केला.

सॅक्सन लोकांस खुष होण्यास विशेष कारण हें होतें कीं, या राजाची आई सॅक्सन कुळांतील होती. आपला राजा परदेशी आहे असें मनांत येऊन जें त्यांस कांहीं वाईट वाटत असे तें आतां दूर झालें, व ते राजा आपल्यापैकींच आहे असें समजूं लागले.

नॉर्मन लोक अजून तेथील लोकांशीं प्रेमभावानें वागण्यास शिकले नव्हते तरी पण त्यांस इकडे येऊन राहिल्यास शंभर वर्षें होऊन गेलीं होतीं. म्हणून स्वभाविकच त्यांचें प्रेम फ्रान्सवरून कमी होऊन इंग्लंडवर जडूं लागलें होतें. फ्रान्समध्यें ते अँग्लो-नॉर्मन या नांवानें ओळखले जात होते.

---

## प्रकरण ६ वें.

### प्लॅन्टॅजिनेट वंशाचे राजे.

### दुसरा हेन्री व पहिला रिचर्ड.

**इ. स. ११५४ पासून इ. स. ११९९ पर्यंत.**

**राज्यव्यवस्था**—लोकांस वाटलें होतें त्याप्रमाणेंच गादीवर बसल्यावर हेन्रीनें राज्य चांगल्या प्रकारें चालविलें. त्यानें पहिल्या हेन्रीचा करारनामा मंजूर केला, व गेल्या कारकिर्दींतील सर्व गैरकायदेशीर कामें रद्द केलीं. नवे बांधलेले किल्ले तोडविले, शिक्क्यांत भेळसेळ करण्याची रीत बंद पाडली, मारामारी व लुटालूट यांचा बंदोबस्त केला, व स्वतः निःपक्षपातीपणानें न्याय देऊं लागला. न्यायाधिशांनीं फिर्याद ऐकण्यासाठीं परगण्यांतून फिरण्याचा वहिवाट या राजाच्या वेळेपासूनच सुरू झाली. पंचाकडून न्याय ( ट्रायल बाय् ज्यूरी—Trial by jury ) देण्याच्या पद्धतीचें बीं देखील या राज्यांतच रोपलें गेलें असें वाटतें.

**राज्यवृद्धि**—नॉर्मन राजांची मूळ जहागीर फ्रान्समध्यें असल्यामुळें त्या देशांत त्यांचें थोडेंफार राज्य प्रथमपासूनच होतें. परंतु या राजाच्या वेळीं तें इतकें वाढलें कीं खुद्द तेथील राजाच्या हातांत देखील याच्या इतका मुलुख राहिला नाहीं.

नॉर्मन्डी व मेन हे प्रांत आईकडून व टचुरेन व अँजू हे प्रांत बापाकडून हेन्रीस मिळाले. बापानें तर अँजू हा प्रांत त्याच्या धाकट्या भावास दिला होता. परंतु हेन्रीनें तो त्याच्याकडून हिसकावून घेतला. काडी मोडून हांकून दिलेल्या फ्रान्सच्या राणीशीं लग्न करून त्यानें पोइटौ, गीयेन वगैरे सात परगणे मिळविले. बापाची जहागीर गमाविल्यानंतर नॉन्टूझमध्यें जाऊन राहिलेला व ज्यास तेथील लोकांनीं आपला ठाकूर बनविला होता तो हेन्रीचा धाकटा भाऊ थोड्या वर्षांनीं मरण पावला. त्यामुळें तो मुलुख वारस या नात्यानें घेण्यासाठीं हेन्री फ्रान्समध्यें गेला. परंतु इतक्यांत त्या परगण्याचा कबजा ब्रिटनी प्रांताचा ठाकूर यानें घेतला, व जेव्हां हेन्री तेथें जाऊन त्यास त्रास देऊं लागला तेव्हां फ्रान्सचा राजा त्याच्या मदतीस आला. यावरून सर्वांस असें वाटलें कीं आतां मोठी लढाई होईल. परंतु हेन्री सामदाम वगैरे गोष्टींत निष्णात होता. तो स्वतः फ्रान्सच्या राजाच्या भेटीस गेला, व त्यास समजावून स्वतःस लाभदायक असा तह करून आला. त्यानें आपल्या पांच वर्षांच्या मुलाचें लग्न अजून पाळण्यांत झोंके घेत असलेल्या फ्रान्सच्या राजकन्येबरोबर केलें, व ब्रिटनीच्या राजकन्येबरोबर आपल्या दुसऱ्या मुलाचें लग्न केलें. या दुसऱ्या सोयरिकीच्या जोरावर सात वर्षांनंतर तेथील ठाकूर मरतांच तो प्रांत त्याच्या हातीं आला, व फ्रान्सच्या राजाचें कांहीं कमीजास्ती झाल्यास ती गादी सुद्धां यास मिळेल असें वाटूं लागलें.

परंतु हेन्रीची राज्यतृष्णा एवढ्यानेंहि पुरी झाली नाहीं. इंग्लंडच्या गादीवर बसल्यापासूनच राज्याची हद्द चोहोंबाजूंनीं वाढविण्यासाठीं तो प्रयास करूं लागला होता. स्कॉटलंडवर त्यानें हल्ले केले, परंतु त्याचें तिकडे फारसें चाललें नाहीं. मात्र एकदां तेथील राजा पकडला गेला असतां जेव्हां त्यानें हेन्रीचें आधिपत्य कबूल केलें, तेव्हांच यानें त्यास सोडलें. पूर्वी देखील विजयी उइल्यमचें व पहिल्या हेन्रीचें आधिपत्य त्या त्या वेळच्या स्कॉटलंडच्या राजांस कबूल करावें लागलें होतें. वेल्स जिंकण्याची तर त्यास जबर इच्छा होती. एके प्रसंगीं क्रोधायमान होऊन त्यानें वेल्सच्या सरहद्दीवरील पुरुषांचे डोळे फोडले व स्त्रियांचे नाक कान कापले. परंतु ते शूर लोक डगमगले नाहींत व हेन्रीसही मोठासा जय तेथें मिळाला नाहीं.

आयर्लंड जिंकण्यासाठीं पोपची परवानगी त्यानें गादीवर बसतांच मिळवून ठेविली होती. यावेळीं धर्मांधपणा इतका होता कीं, पोपनें कोणत्याहि राजास कोणताहि देश जिंकण्यास जाण्यास सांगितलें कीं त्या देशावर स्वारी करण्यास त्या राजास पूर्ण हक्क आहे असें समजलें जात असे. ही परवानगी देण्यांत पोपचाही स्वार्थ होता. आयर्लंडांत ख्रिस्ती धर्म चालत होता खरा, परंतु त्याचा अधिकार पोपच्या हातीं नव्हता. त्यामुळें त्यास अशी लालुच होती कीं, हेन्री यशस्वी झाल्यास त्या सर्व मुलुखाचें धर्माधिपत्य आपणास मिळेल. याप्रमाणें परवानगी मिळाली होती खरी, परंतु

दुसऱ्या लढायांमुळें हा हेतु पार पाडण्यास हेन्रीस आतांपर्यंत सवड झाली नव्हती. इतक्यांत त्यास एक चांगली संधि मिळाली. आयर्लंडांत यावेळीं कित्येक निरनिराळीं राज्यें होतीं. त्यांपैकीं एका राजानें एका सरदाराची बायको पळवून नेली. परंतु नंतर त्या पाप्यास स्वतःसच तेथून पळून जावें लागलें. तो हेन्रीस शरण आला, व ह्मणाला कीं, जर तुह्मी माझी गादी मला परत मिळवून द्याल तर मी तुमचें कायमचें स्वामित्व मान्य करीन. हेन्रीस हेंच पाहिजे होतें, व ह्मणून जरी तो स्वतः फ्रान्समधील लढायांत गुंतला होता, तरी इंग्लंडांतील सरदारांस त्यानें त्याच्याबरोबर पाठविलें. एका सरदारानें पुष्कळ शूर लोक गोळा करून आयर्लंडवर हल्ला केला, व एक दोन वर्षांत त्या टपूचा मोठा भाग जिंकला. आतां हेन्रीनें पाहिलें कीं जर मी आतां मध्यें पडलों नाहीं, तर तो सरदार स्वतःचेंच स्वतंत्र राज्य तेथें स्थापील. यासाठीं हेन्रीनें त्या सरदाराच्या लष्करांतील स्वतःच्या सर्व प्रजेस इंग्लंडांत परत बोलाविलें. नंतर त्या व दुसऱ्या सरदारांनीं मोठमोठीं शहरें त्याच्या हवालीं केलीं व त्याचें सार्वभौमत्व सर्वप्रकारें कबूल केलें. तेव्हां त्यानें खूष होऊन त्यांनीं मिळविलेल्या मुलुखांचे त्यांस ठाकूर केलें. पुढल्या वर्षी तो स्वतः तेथें गेला, व सर्वांचें स्वामित्व त्यानें स्वीकारलें ( इ. स. ११७१ ). यावेळीं आयर्लंडचा सुमारें अर्धा भाग अजून स्वतंत्र राहिला होता खरा, परंतु हळूहळू तो इंग्रजी राज्यांत थोड्याच वेळांत सामील झाला.

**धर्मगुरूंची सत्ताः**—यावेळीं यूरोपांत ख्रिस्ती धर्मगुरूंची सत्ता केवढी होती हें खालील हकीगतीवरून समजेल. हेन्री एवढा प्रतापी होता, तरी सुद्धां त्यास धर्मगुरूंपुढें नाकदुऱ्या काढाव्या लागल्या. नॉर्मनांचें राज्य आल्यानंतर इंग्लंडांत धर्मखात्याची सत्ता पूर्णपणें स्वतंत्र करण्यांत आली होती, म्हणजे पाद्र्यां-विरुद्ध फौजदारी किंवा दिवाणी काम सरकारांत चालूं शकत नसे. त्यांचा न्याय त्यांच्या खात्यांतच होई. यामुळें पाद्री फार बहकले होते. त्यांच्या विरुद्ध बऱ्याच तक्रारी होऊं लागल्या होत्या. यावेळीं पाद्री खरोखरच भूदेव झाले होते. त्यांस कांहीं विचारण्याची कोणाचीही ताकत नव्हती. धर्मगुरू सरकारांतून मिळालेल्या जहागिरी भोगीत होते, परंतु सरदार जसें राजाचें स्वामित्व कबूल करीत, तसें न करतां ते पोपासच आपला अधि-राज मानीत. पाद्री इतके बेताल होऊन गेले होते कीं, हेन्रीस गादीवर बसून दोन वर्षें झालीं नाहींत तोंच तेवढ्या वेळांत त्यांनीं १०० खून केले होते. हेन्रीनें पाहिलें कीं हें बरोबर नव्हे. मी राजा म्हणविला जातों व माझ्या देखत असा उन्मत्तपणा व असलीं दुष्ट कृत्यें होऊं लागल्यास तीं कशीं सोसावीं? परंतु लोकांत धर्मोधपणा फार होता. म्हणून धर्मखात्याची सत्ता हळुहळु कमी करण्याचा त्यानें निश्चय केला. यासाठीं कॅन्टरबेरीच्या आचार्याची जागा रिकामी झाली तेव्हां त्यानें टॉमस-ए-बेकेट नांवाच्या स्वतःच्या माणसास ती जागा दिली; परंतु बेकेट पाद्र्यांचा इतका पक्षपाती

निघाला की, त्यानें राजास हैराण करून त्याचे सगळे हेतु धुळीस मिळविले.

बेकेट लहानपणीं कॅन्टरबरीच्या आचार्याच्या घरीं नोकर होता. त्यानें याची हुशारी व मेहनतीपणा पाहून त्यास धर्मखात्याचें कांहीं काम सोंपलें या कामामुळें दोन पैसे मिळतांच तो स्वतःचा अभ्यास वाढविण्यासाठीं पॅरीस व बोलोना येथें गेला व तेथें कित्येक वर्षे राहून मोठा नामांकित विद्वान् होऊन आला. नंतर त्या गुणज्ञ आचार्यानें त्यास मोठी जागा दिली, व थोड्या दिवसांनीं त्याच्याच शिफारशीवरून राजानें त्यास आपला दिवाण ( चॅन्सेलर ) नेमिलें. तेथें देखील त्यानें अशीच खबरदारी, मेहनत व प्रामाणिकपणा दाखविल्यावरून राजा त्याच्यावर अत्यंत खुष झाला. यावेळीं त्याच्या इतका महत्त्वाचा व सामान्य मनुष्य देशांत कोणीही नव्हता. त्याचे जवळ मोठमोठे सरदार बसूनच बसून रहात, व त्याची जेव्हां स्वारी निघे तेव्हां सर्व लोक त्याचेकडे पहात रहात. परंतु आचार्याची पदवी मिळतांच त्यानें या बाबतींस फांटा दिला. कारण धर्मखात्याविरुद्ध राजाचे जे विचार होते ते त्यास पूर्णपणें माहीत होते, व त्या विचारांविरुद्ध वागण्याचा निश्चय त्यानें पहिल्यापासूनच केला असावा असें वाटतें. आपली नोकरी सोडली ह्मणून राजास वाईट तर वाटलें, पण करणार काय ? बेकेटास आतां सर्व वैभवाबद्दल फार वैराग्य वाटूं लागलें. त्याच्या तपस्वीपणाबद्दल लोकांत बरीच वाखाणणी

होऊं लागली. तरी पण ज्या कामासंबंधानें राजा व तो भांडले त्या कामाचें स्वरूप पाहतां त्यांत या धर्माध्यक्षाचाच अपराध दिसून येतो.

एका पाद्यानें एका स्त्रीस बिघडवून तिच्या बापास मारून टाकलें. राजानें सांगितलें कीं त्या पाप्यास आमच्या स्वाधीन करा म्हणजे त्यास योग्य शिक्षा करूं. परंतु या अभिमानी आचार्यानें सांगितलें कीं तुह्मांस त्या बाबतींत कांहीं अधिकार नाहीं. आम्हींच त्याचा न्याय करूं. न्यायाचे वेळीं मात्र बेकेटनें त्यास बडतर्फ केलें. राजानें सांगितलें कीं आतां तो पाद्री खात्यांतून बडतर्फ झाला आहे व म्हणून आम्हीं त्याचा साधारण रयतेप्रमाणें न्याय करूं शकूं. बेकेटनें सांगितलें कीं तसें करतां येणार नाहीं;एकाच गुन्ह्यासाठीं त्यास दोनदां शिक्षा करणें बरोबर नव्हे.

यावरून राजास पुष्कळ राग आला व त्यानें महद्गुरूंची सभा भरवून प्रश्न विचारला कीं, तुह्मी देशाच्या चालीरिती पाळतां कीं नाहीं ? त्यांनीं खुबीनें जबाब दिला कीं आमच्या आश्रमाविरूद्ध नसतील असे सर्व रिवाज आह्मीं पाळतों. या खुबीदार उत्तरानें जो मुद्दा होता तो तर बाजूसच राहिला; परंतु हेन्री तेवढ्यानें फसण्या इतका भोळा नव्हता. त्यानें दुसरी सभा भरविली व त्यांत सरदारांसही बोलविलें, व त्यांस सांगितलें कीं, तुह्मी या महंतांबरोबर विचार करून जुन्या रिवाजांप्रमाणें धर्मखात्याचे अधिकार काय आहेत ते सांगा. या सभेनें राजाच्या

भितीनें म्हणा, अगर सदसद्विवेक बुद्धीनें किंवा जुन्या रिवाजांस अनुसरून म्हणा, परंतु एक मोठा लेख तयार केला. त्याचें मुख्य सार असें होतें कीं, पाद्र्यांवर कोणत्याही गुन्ह्याचा आळ आला तर त्याचा निवाडा करण्याचा अधिकार राजास आहे. या लेखांत दुसरे सुद्धां कित्येक राजाच्या लाभाचे ठराव होते. या लेखास "क्लॅरेन्डन धारा" असें ह्मणतात, कारण ही सभा त्या नांवाच्या गांवांत भरली होती. (इ. स. ११६४).

या लेखावर दुसऱ्या धर्मगुरूंनीं सह्या केल्या, त्यामुळें बेकेटासही सही करणें भाग पडलें. त्यानें "आश्रमाविरुद्ध नसेल तर" ही अट त्यांत लिहिण्याची खटपट केली, परंतु तें कोणास मान्य झालें नाहीं. मी अंतःकरणपूर्वक त्याप्रमाणें वागेन अशी प्रतिज्ञा करणें त्यास भाग पडलें. पोपनें हा लेख नामंजूर केला. स्वतःच्या अधिकाराविरुद्ध असलेला तो लेख त्यानें नामंजूर केला यांत नवल कसलें? सदर लेखास पोपची नापसंती आहे एवढ्या जोरावर बेकेटनें आपले शब्द परत घेतले, व दुसऱ्यांस तसें करण्याबद्दल तो उत्तेजन देऊं लागला. आतां राजा त्याच्यावर बळजबरी करूं लागला. कोणी एकानें बेकेटवर कर्जासंबंधानें फिर्याद केली, व बेकेट त्याचा जबाब देण्यास न्यायसभेंत हजर झाला नाहीं, ह्मणून हेन्रीनें त्यास मोठा दंड केला. त्यानें राजनिष्ठेची प्रतिज्ञा मोडली असा त्याच्यावर आरोप ठेवून त्याच्या सगळ्या जहागिरी जप्त करण्यांत आल्या. धर्मखात्याची व्यवस्था त्यानें कशी काय

चालविली होती याबद्दल त्याच्याकडून जबाब मागितला हिशोब पाहून ४४००० मार्क त्याकडे घेणें काढलें. सर्व धर्मगुरूंनीं मिळून बेकेट यास सांगितलें कीं, तूं प्रतिज्ञाभंगाचें पाप केलें आहेस व ह्मणून आह्मी तुला आचार्य मानीत नाहीं. बेकेटनें परगांवीं जाण्याची परवानगी मागितली, तीहि नाकारण्यांत आली. यावरून आतां जिवावर बेतली आहे हें त्यानें पक्कें जाणलें व ह्मणून संधी साधून तेथून तो फ्रान्समध्यें पळून गेला.

फ्रान्सच्या राजानें त्याचा पक्ष उचलला व त्यामुळें फ्रान्स व इंग्लंड यांमध्यें बराच वेळ लढाई चालली. शेवटीं फ्रान्सच्या राजानें बेकेटची हेन्रीबरोबर पुन्हा मैत्री करून दिली. नंतर बेकेट परत आपल्या वतनांत गेला. परंतु तेथें जाऊन तो स्वस्थ बसला नाहीं. रस्त्यानें जातां जातांच जे धर्मगुरू राजाच्या पक्षास मिळाले होते त्यांस त्यानें धर्माबाहेर टाकलें. त्यामुळें ते भिऊन फ्रान्समध्यें जाऊन हेन्रीस आपलें दुःख सांगून रडूं लागले. तें ऐकून राजास फारच राग आला. तो म्हणाला, "अरे हा दुष्ट माझा किती अपमान करीत आहे. काय, माझ्या माणसांत कोणी सुद्धां असा नाहीं कीं जो तिकडे जाऊन माझा सूड उगवील?" हे शब्द कदाचित् तो रागाच्या भरांतच बोलला असेल, परंतु ते ऐकून चार योद्धे बेकेटास मारावयास तावडतोब बाहेर पडले. मागाहून ही बातमी लागतांच त्यांचें मन वळविण्यासाठीं त्यांच्यामागून हेन्रीनें माणसें पाठविलीं, परंतु दरम्यान ते इंग्लंडास पोंचून त्यांनीं आपलें काम

पार पाडलें होतें. त्यांनीं मरदिवसा देवळांत घुसून त्याचा खून केला. बेकेटनें मरतेवेळीं देखील धैर्य व मोठेपणा सोडला नाहीं. या दुष्ट प्रकारानें चोहोंकडे हाहाःकार झाला.

ते चार योद्धे तर आपलें काम होतांच तावडतोब इंग्लंडांतून पळून गेले व आपलें पाप धुऊन टाकण्यासाठीं जेरुसलेमच्या यात्रेस जाऊन तेथें हाल होऊन मरून गेले. हेन्रीनें ही बातमी ऐकतांच —मनापासून असार ढोंगीपणानें—पुष्कळ दुःख दर्शविलें. तीन दिवस अन्न पाण्याशिवाय राहिला व पोपास त्यानें अत्यंत नम्रतेनें सांगितलें कीं या ब्रह्महत्येच्या बाबतींत मला कांहीं माहीत नाहीं, तरी पण जें झालें त्याबद्दल मला अत्यंत दुःख होत आहे. यावेळीं हेन्रीस विशेष त्रास देण्यांत अर्थ नाहीं असा विचार करून पोप कांहीं जास्त बोलला नाहीं. फक्त मेलेल्या बेकेटास साधू ( Saint ) चें पद दिलें. यापुढें या कारणास्तव त्याच्या थडग्याजवळ शेंकडों वर्षें जत्रा भरूं लागली, व यूरोपांतील निरनिराळ्या देशाचे लोक नवस करून तेथें येऊं लागले.

हेन्रीनें आयर्लंड जिंकल्यानंतर तेथील धर्माधिपत्य पोपला देण्यासाठीं तो त्याच्या दूतांस नॉर्मंडींत जाऊन भेटला, व पवित्र अस्थींवर हात ठेवून त्यानें शपथ घेतली कीं, बेकेटची हत्या मीं करविली नाहीं व तसें करण्याची माझी इच्छा पण नव्हती. तेव्हां रोमच्या गुरुमहाराजानें त्यास माफी दिली. तरी सुद्धां हेन्रीस वाटलें कीं लोकांच्या मनांतील शंका अजून गेली नाहीं; म्हणून

जेव्हां त्याच्या मुलांनींच बंड उभारलें तेव्हां लोकांची प्रीति मिळविण्यासाठीं त्यानें पुन्हां जाहीर प्रायश्चित्त घेतलें. तो कॅन्टर्बरीच्या जत्रेस गेला. अनवाणी गांवांत शिरला, बेकेटच्या थडग्याची पूजा केली, व नंतर त्या ठिकाणीं पाद्र्यांची सभा भरवून त्यांच्या समक्ष आपल्या पाठीवर त्यानें कोरडे मारवून घेतले. दुसऱ्या दिवशीं धर्मगुरूनें सांगितलें कीं आतां तूं पापांतून पूर्णपणें मुक्त झालास.

**कुटुंबक्लेश व मरण:**—यापेक्षांही त्याच्या भांडखोर मुलांमुळें हेन्री पुष्कळ हैराण झाला. चाऱ्ही मुलांस त्यानें फ्रान्समध्यें मोठमोठ्या जहागिरी दिल्या होत्या. परंतु तेवढ्यानें त्यांचें समाधान न होऊन ते आपापसांत भांडूं लागले. व शेवटीं तिघां भावांनीं एकत्र होऊन बापाच्या विरुद्ध बंड उभारलें, या दुष्ट कामांत त्यांस त्यांच्या नीच आईचें उत्तेजन होतें, व फ्रान्सच्या राजानें त्यांस आश्रय दिला तर त्यांत नवल कसलें? तरी पण हेन्रीनें फ्रान्समध्यें जाऊन हें भयंकर अस्वाभाविक बंड मोडलें, व आपल्या मुलांस व त्यांच्या पक्षाच्या लोकांस माफी केली. माफीसाठीं आलेल्या बंडखोरांच्या यादींत तो आपला आवडता कनिष्ठ मुलगा जॉन-ज्यास तो आपल्याच पक्षाचा असें समजत असे—याचें नांव जेव्हां त्यानें पाहिलें तेव्हां त्याच्या काळजास असा धक्का बसला कीं त्यांतून तो शेवटीं बरा झाला नाहीं. कुपुत्रांमुळें दुःखित झालेला हेन्री त्यांस वारंवार शाप देत, व आपल्या दुर्दैवास दोष देत मोठ्या दुःखांत इ. स. ११८९ त मरण पावला.

असें सांगतात कीं त्यावेळीं त्याचा मोठा मुलगा आपल्या बापाची नजरभेट घेण्यासाठीं लांबून गुपचुप आला होता, व तो उभा असलेल्या बाजूस त्या प्रेताच्या नाकपुडींतून रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या, आणि त्यामुळें तो आपल्या दुष्ट कृत्याबद्दल पश्चाताप करीत व रडत तेथून एकदम पळून गेला.

## रिचर्ड १ ला.

रिचर्ड हा हेन्रीचा मोठा मुलगा होता. तो इतिहासांत "सिंह-छातीचा" या नांवानें ओळखला जातो. नांवाप्रमाणेंच तो शूर व साहसी होता खरा, परंतु त्याच्या पराक्रमाचा देशास कांहीं फायदा झाला नाहीं.

तो गादीवर बसल्या नंतर लौकरच क्रूझेड नांवाची धर्मासाठीं चाललेली लढाई लढण्यास गेला, व तेथून आल्यानंतर तो थोडेच दिवस जिवंत होता. तो इ. स. ११९९ त मरण पावला व त्याच्या बरोबर बारावें शतक पुरें झालें.

---

# प्रकरण ७ वें.

## प्लॅन्टॅजिनेट वंशाचे राजे.

### जॉन व मॅग्नाकार्टा, इ. स. ११९९ पासून १२१६ पर्यंत.

आपण प्रथमच सांगितलें कीं इंग्रजांचा उदय तेराव्या शतकांत झाला. आतां त्या शतकापर्यंत आपण येऊन पोंहोचलों. या

मुदतींत सॅक्सन व नॉर्मन लोकांचें बहुतेक संमिश्रण होऊन गेलें, व जें बाकी राहिलें होतें तें रिचर्ड नंतर त्याचा भाऊ जॉन गादीवर बसला तेव्हां त्याच्या कारकिर्दींत विद्युद्वेगानें पुरें होऊन गेलें. यापुढें सॅक्सन व नॉर्मन हीं नांवें जाऊन सर्व लोकास इंग्रज हेंच नांव पडलें, व ते एकमेकांस देशबंधू समजूं लागले. विजयी उइल्यमनें नॉर्मन भाषा इंग्लंडांत दाखल करण्यासाठीं पुष्कळ खटपट केली होती. त्यानें ती राजभाषा केली होती, इतकेंच नव्हे, तर शाळेंत देखील तीच शिकविण्याचा त्यानें हुकूम केला होता. नॉर्मन सरदार तीच भाषा बोलत यांत नवल नाहीं; पण सॅक्सन लोक ती बढाईसाठीं बोलूं लागले होते; कारण त्यावेळीं इंग्लंडांत नॉर्मन भाषा बोलणें ह्मणजे सुशिक्षितपणाचें व खानदानीपणाचें लक्षण समजलें जात असे. याप्रमाणें कांहीं काळ चाललें. नॉर्मन लोक अँग्लो सॅक्सन भाषा निर्जीव करण्यासाठीं पुष्कळ झटले. परंतु अशा रितीनें देश-भाषेचा नाश न होतां उलट असें झालें कीं, हळुहळु नॉर्मन लोक देखील देशभाषा बोलूं लागले, व कालांतरानें अँग्लो सॅक्सन व नॉर्मन भाषांचें मिश्रण होऊन एक नवीनच भाषा उत्पन्न झाली. ज्याप्रमाणें त्या मिश्र जातींचें नांव इंग्रज असें पडलें, त्याचप्राणें त्यांच्या या मिश्र भाषेचें नांव इंग्रजी असें पडलें. हें भाषा-मिश्रण देखील बहुतांशीं तेराव्या शतकांत पुरें झालें, व त्याचें फळ चौदाव्या शतकांत दिसलें.

"मुलाचीं लक्षणें पाळण्यांतच दिसतात" या म्हणीप्रमाणें इंग्रजांची जात तेराव्या शतकांत उत्पन्न झाली, व त्याबरोबर तिनें लगेच एक पराक्रम केला. जगांत पुष्कळ जातीचीं राज्यतंत्रें होऊन गेलीं. परंतु आपणांस माहीत आहेच कीं सध्यां ज्या रितीचें राज्यतंत्र इंग्लंडांत प्रचलित आहे त्याची खुबी कांहीं निराळीच आहे. या राज्यतंत्राचा मूळ पाया या शतकांतच घातला गेला, व मागाहून इंग्रजांची उन्नति झाली. तिचें कारण हेंच होय. तें कारण पूर्णपणें जाणण्याची जर तुम्हांस इच्छा असेल, तर जॉन राजाच्या हकीगतीकडे लक्ष्य नीट द्या.

**जॉन राजाचा स्वभाव.**—जॉन राजा मोठा मिजासी, जुलमी, निर्दय व त्याबरोबरच भित्रा व बिनअकली होता. तो वेळेची किंमत मुळींच जाणत नसे, व विचार केल्याशिवाय सर्वांबरोबर शत्रुत्व जोडीत असे. शत्रुत्व जोडून दोन हात करण्याचा तर त्याच्यांत दम नव्हता, म्हणून त्याचें सर्व आयुष्य लज्जास्पद अशी हार खाण्यांतच गेलें, व शेवटीं तो चिंताग्नीनें त्रस्त होऊन मेला. परंतु जीं थोडीं वर्षें त्यानें राज्य केलें तेवढ्या मुदतींत त्यानें सर्व देशास त्राहि त्राहि करून सोडलें. त्याच्यासारखा जुलूम पूर्वीं कोणत्याही राजानें केला नव्हता, परंतु ज्या देशांतील लोक शूर व ऐक्यानें वागणारे असतात, त्या देशास दुष्ट राजापासून उलट फायदाच होतो. जुलुम पाहून त्यांचें रक्त तापून जातें, व राजा भित्रा असला म्हणजे तर ते आपले हेतु लढून झटपट पार

पाडतात. इंग्रज लोकांच्या सुदैवानें आरंभासच त्यांचे हे दोन्ही योग जुळून आले.

**राज्यहानि.**— जॉन गादीवर बसल्यानंतर त्याच्या मोठ्या भावाच्या अज्ञान मुलातर्फे बंड उभारलें गेलें, परंतु त्यांत तो पकडला गेला; व असें सांगतात कीं ज्या तुरुंगांत त्यास ठेविलें होतें तेथून त्यास गुपचुप नेऊन त्याच्या दुष्ट काकानें त्यास आपल्या हातानें मारून टाकलें. ज्यावेळीं ही खुनाची गोष्ट उघडकीस आली त्या वेळीं त्याचा जबाब देण्यासाठीं फ्रान्सचा राजा फिलिप यानें जॉनला आपल्या दरबारांत बोलाविलें. जॉन फ्रान्सचा एक तालुकदार होता व त्या नात्यानें फिलिपचा त्याच्यावर अंमल होता ही गोष्ट खरी, परंतु इंग्लंडसारख्या स्वतंत्र देशाचा राजा अशा हुकुमास मान देईल ही गोष्ट संभवनीय नव्हती. पण फिलिपनें जाणून बुजून लढाईस निमित्त होईल ह्मणूनच असा हुकुम पाठविला होता. पुढें जॉन खरोखरच हजर झाला नाहीं. त्यावरून फिलिपनें त्याच्या जहागिरी जप्त करण्यास सुरवात केली. जॉन लष्कर घेऊन त्याच्याशीं लढाई करण्यास गेला, परंतु तींत त्यास यश न येतां लायर नदीच्या उत्तरेकडील सर्व मुलुखावरील आपला ताबा सोडून त्यास तह करणें भाग पडलें. (इ. स. १२०६) अशा रितीनें त्याचें फ्रान्समधील नॉर्मंडी वगैरे सर्व राज्य गेलें, व फक्त गियेनसारखे एक दोन दूरचेच तालुके राहिले.

हे प्रांत गेल्यामुळें इंग्रज लोकांच्या हक्कांस फायदा झाला. नॉर्मनांस इंग्लंडांत येऊन दीडशें वर्षे होऊन गेलीं होतीं, म्हणून

ते सध्यां सॅक्सनांबरोबर मिळूनमिसळून गेले होते खरे; तरीपण स्वदेश म्हणून ते नार्मंडीवरच प्रीति ठेवीत होते, व वरचेवर इकडील मिळकत ते तिकडे जाऊन उपभोगीत असत. परंतु आतां जेव्हां नार्मंडी प्रांत इंग्लंडच्या राजाच्या हातून गेला, तेव्हां त्यांस इंग्लंड हाच स्वदेश असें समजणें भाग पडलें.

फ्रान्सांत जे एक दोन तालुके राहिले त्यांचा परिणाम देखील या नॉर्मन सरदारांची इंग्लंडबद्दल देशभक्ति दृढ करील असाच झाला. त्या तालुक्यांतून जॉन भाडोत्री लष्कर आणी, व त्याच्या जोरावर इंग्लंडांत तो आपल्या मर्जीस येईल तसें वागे. हें पाहून नॉर्मन सरदारांच्या लक्षांत आलें कीं, वास्तवीक आपण इंग्रज आहों, फ्रान्सचे लोक परदेशी आहेत, व या परदेशी लोकांस आपल्या राज्यांतून काढून टाकणें यांतच आपलें हित आहे.

**पोपबरोबर विरोध**.—फ्रान्सबरोबर लढून त्याचा वर सांगितल्याप्रमाणें निकाल लागल्यानंतर इंग्लंडांत येऊन जॉननें पोपशीं मोठा तंटा उपस्थित केला. कॅन्टर्बरीच्या धर्माध्यक्षाची जागा खाली पडल्यानें तेथील साधूंनीं आपल्यापैकीं एकास ती गादी दिली, व वहिवाटीप्रमाणें महंताचें मत घेणें व राजाची मंजुरी मागणें वगैरे गोष्टी कांहीं केल्या नाहींत. राजास जेव्हां ही गोष्ट समजली तेव्हां त्यानें दुसऱ्याच एका इसमाला धर्माध्यक्ष नेमिलें. या तंट्याचा फायदा घेऊन पोपनें हुकुम केला कीं त्या दोन्ही नेमणुका रद्द आहेत, व मी स्टिफन लँग्टन नांवाच्या इंग्रज पंडितास

पाठवीत आहें, त्यासच तुम्ही धर्माध्यक्ष करावें. साधूंनीं हा हुकूम मान्य केला. वास्तवीक पोपची ही मध्यस्थी अन्यायाची होती, तरी पण जॉन जर विचारपूर्वक त्यास विरुद्ध गेला असता, तर त्यांत त्यास दोष देतां आला नसता. परंतु तो आपल्या अविचारी व बढाईखोर स्वभावाप्रमाणेंच वागला. त्यानें त्या साधूस एकदम बड-तर्फ केलें, व पोपच्या रागाची बिलकुल पर्वा केली नाहीं. त्यास एवढा विचार सुचला नाहीं कीं, दुसऱ्या हेन्रीसारख्या आपल्या बापाचें देखील ज्या पोपपुढें कांहीं चाललें नाहीं त्याच्यापुढें मी कसा टिकणार? दुसरा हेन्री कसाहि असला तरी बाहेरून तो पोपशीं नमूनच वागे. जॉननें तर त्याच्या उलट मार्ग पतकरला.

पोपास राग येऊन त्यानें इंग्लंडास धर्माबाहेर टाकलें. "धर्मा-बाहेर" हा शब्द दिसावयास लहान दिसतो. पण त्यानें दर्शविलेलें संकट सांगतां येण्याजोगें नाहीं. या शिक्षेनें इंग्लंडांतील सर्व शुभ व अशुभ कृत्यें एकदम बंद पडलीं. स्मशानांत प्रेतें पुरतां येईनात, एकमेकांस नमस्कार करण्याची देखील मनाई झाली, व कोणीही कपडे बदलूं नये असें झालें. आपल्या देशांत सुतक्यांस ज्या अडचणी पडतात त्यापेक्षां शंभरपट यावेळेस इंग्लंडच्या लोकांस अडचणी पडूं लागल्या. ही पोपची शिक्षा अशी होती कीं लोक हैराण होऊन आपोआप राजाशीं सामन्यास उभे राहतील. तरी देखील जॉन उमजला नाहीं व उलट जास्त उन्मत्त झाला. बळजबरीनें पाद्र्यांस धर्म-कृत्यें करावयास भाग पाडून त्यांस फार त्रास देऊं लागला. पाद्री

भिऊन बरेचसे फ्रान्समध्यें पळून गेले; जिकडे तिकडे हाहाःकार झाला, व पोप वरचेवर जॉनला जास्त धर्मशिक्षा करूं लागला. शेवटीं ख्रिस्ती जगद्गुरूनें शेवटचें अस्त्र सोडलें. पोपनें जॉनला पतित ठरवून पदभ्रष्ट केलें व सर्व ख्रिस्ती राजांस इंग्लंडवर स्वारी करून तो हुकूम अमलांत आणण्यासाठीं लिहून पाठविलें.

फ्रान्सच्या फिलिपास एवढेंच पाहिजे होतें. मोठें सैन्य तयार करून इंग्लंड घेण्यासाठीं तो एकदम निघाला. इंग्लंडचे सरदार त्यास मिळतील असें जॉनला वाटलें; कारण त्याच्या जुलुमास ते केव्हांचे त्रासले होते. हें पाहून भित्रा जॉन प्रथम जितका जोर दाखवीत होता तितकाच या वेळीं दीन झाला. तो पायां पडत पोपच्या दूतांकडे गेला. इंग्लंडचा मुकुट पोपच्या पायांवर त्यानें ठेविला, व पोपनें तो त्यास आपल्या मांडलिकासारखा परत दिला, तो त्यानें घेतला; व दर वर्षी पोपास मोठी खंडणी देण्याचें त्यानें कबूल केलें. ( इ. स. १२१३ ). स्वतःच्या देशास खालीं पहावयास लावणाऱ्या या तहाची हकीगत ऐकून इंग्लंडचे सरदार लज्जेनें अगदीं खजील झाले, व ते आपल्या राजाचा पुष्कळ धिक्कार करूं लागले. तरीपण जॉनवरचें हें अरिष्ट तूर्त तरी या उपायानें टळलें खरें. फिलिपास पोपचा असा हुकूम झाला कीं, आतां हा मुलुख आमचा झाला आहे यासाठीं तुम्ही एकदम मागें फिरावें. हें ऐकून फिलिप पुष्कळ चिडला. कारण त्यास वाटलें कीं रोमच्या या बुवांनीं आपल्या स्वार्थासाठीं मला

निरर्थक खर्चांत घालून फसविलें, व मला माझा हेतु पार पाडूं दिला नाहीं. तरीपण फिलिप प्रसंग जाणणारा असल्यानें, मनास कितीही वाईट वाटलें तरी आपली समजूत करून घेऊन तो मागें फिरला.

**प्रजेची ओरड व संप.**—अशा रीतीनें पोपबरोबरचा तंटा मिटल्यावर जॉनला मोठ्या संकटांतून पार पडल्यासारखें वाटलें. त्यास अजून माहीत नव्हतें कीं आचार्यांच्या क्रोधाग्निपेक्षां देखील पिडलेल्या प्रजेचा क्रोधाग्नि किती बळवान् आहे. आतां तर तो फारच बहकला, व लोकांनीं कधीं ऐकलीं नसतील अशीं जुलमाचीं कामें करूं लागला. मर्जीस येईल त्यास तो दंड करी, कैद करी, लुटी अगर मारून सुद्धां टाकी. एका यहुद्यास अपराधा-शिवाय पकडवून त्याची त्यानें लूट आरंभिली, व पुरलेलें धन दाखव असें म्हणून त्या हालहाल करून त्याचा रोज एक एक दांत त्यानें खेंचून काढविला. असें सात दिवस केलें, तेव्हां त्या बिचाऱ्यानें शरण जाऊन आपलें सर्व धन त्यास दाखवून दिलें. या शिवाय जॉन अतिशय बदचालीचा मनुष्य होता. मोठ्या कुळांतील स्त्रियांची देखील तो बलात्कारानें अब्रू घेई. एका सरदाराची मुलगी त्यास वश झाली नाहीं. तेव्हां तिला त्यानें विष देववून मारून टाकविलें. असला जुलुम आपल्या देशांत देखील कोणत्याही राजानें केला असता, तरी त्याचा नाश झाल्याशिवाय राहिला नसता, मग नॉर्मन व सॅक्सन रक्ताचे लोक अशा जुलुमाविरुद्ध

कंबर बांधून उठले त्यांत नवल नाहीं. पण त्यांत त्यांनीं जो संप, धैर्य व चातुर्य दाखविलें तें खरोखरच आशियाच्या सर्व लोकांस बोधदायक आहे. आपल्या इकडे जेव्हां राजा असा निघतो तेव्हां सर्व लोक त्राहि त्राहि अशी ओरड करतात, पण ज्याच्यावर प्रसंग येतो तोच त्यास तोंड देतो. एकादेवेळीं ज्याच्यानें हें सहन होत नाहीं, तो शौर्यानें पुढें होऊन राजास मारून टाकतो, व दुसरा कोणी गादीवर बसतो. नंतर थोड्या वेळांत दुसरा राजा देखील असाच निघतो, व फार झालें म्हणजे त्याची देखील तीच स्थिति होते. अशा रीतीनें आशियाखंडांतील देशांत निरंतर जुलूम व बंडें एकामागून एक चालूच रहातात व लोकांस कधींही शांत-पणानें रहातां येत नाहीं.

शूर व शहाणे इंग्रज लोक तर या बिकट प्रसंगीं निराळ्याच रितीनें वागले. त्यांस माहीत होतें कीं, ज्याच्यावर संकट येईल त्यानें तें भोगवें ही समजूतच जंगली आहे, व त्यानेंच सर्व बिघाड होतो. ते जाणत होते कीं, देशांतील एखाद्या मनुष्यावर जुलुम झाला तर तो सर्वांवर झाला असें दरेकानें समजलें पाहिजे. कारण ज्याला थोडीतरी अक्कल असेल तो सहज समजेल कीं आज त्याची पाळी आहे, उद्यां आपली सुद्धां येणार खरी. जेव्हांपासून जॉन राजाचा जुलुम वाढूं लागला, तेव्हांपासूनच नॉर्मन व सॅक्सन लोक एकमेकांस समदुःखी समजून स्वतःचें जुनें वैर विसरून गेले होते. तालुकदार समजून चुकले कीं या लोकांस आपल्या पक्षास घेऊन

राजाविरुद्ध उठणें यांतच आपला फायदा आहे. पाद्री तर या दुष्ट राजाची रग जिरविण्यासाठीं मूळपासूनच तयार होऊन राहिले होते.

आतां इतकेंच बाकी होतें कीं थोड्या माणसांनीं पुढाकार घेऊन बाकीच्यांस गोळा करावें. हें काम कॅन्टरबेरीचा धर्माध्यक्ष स्टिफन लँग्टन् यानें बऱ्याच धैर्यानें व चातुर्यानें आपल्या हातांत घेतलें. तो महाविद्वान्, बुद्धिमान्, चांगला व खरोखरच देशभक्त होता. राज्यव्यवस्था कशा तऱ्हेची असल्यास रयतेस दुःख पडणार नाहीं या गोष्टीचा तो बरेच दिवस विचारच करीत होता, व जसजसा देशांत राजाचा जुलुम वाढत गेला तसतसा स्वतःचे विचार अमलांत आणण्यासाठीं तो धैर्यानें व व्यवस्थित रितीनें पुढें पडत चालला.

पोपबरोबर जरी शांतता झाली, तरी पण प्रायश्चित देण्यापूर्वीं या देशहितेच्छु साधूनें राजाकडून अशी शपथ घेवविली कीं यापुढें मी एडवर्ड राजाच्या कायद्यांप्रमाणें वागेन. सरदारांनीं राजाबरोबर फ्रान्सांत लढाईस जाण्याचें नाकबूल केलें होतें. यामुळें जेव्हां तो तेथून मागें वळला, तेव्हां जणूं काय परक्याचाच मुलुख अशा तऱ्हेनें जॉन सरदारांचे गांव लुटीत व जाळीत इंग्लंडांत शिरला. हें ऐकून हा धर्मगुरू त्याच्याकडे गेला, व त्यानें त्यास बजावून सांगितलें कीं हा राजाचा धर्म नव्हे. जॉननें तें सामोपचारानें न ऐकल्यामुळें त्यानें त्याच्या सैन्यांतील दरेक शिपायास

धर्माबाहेर टाकण्याची धमकी दिली, तेव्हांच जॉन कांहींसा वठणीवर आला.

परंतु लँग्टनला माहीत होतें कीं एवढ्यानें जॉन पुरा ठिकाणावर येणार नाहीं, व म्हणून त्यानें लंडन येथें मोठमोठ्या सरदार व पाद्र्यांची एक सभा कांहीं निमित्तानें भरविली, व त्यांच्या समोर जी गोष्ट सगळ्यांच्या मनांत घोळत होती तीच काढून त्यानें विचारलें कीं, राजा फार चढून गेला आहे, त्याला कांहीं उपाय करावयाचा आहे कीं नाहीं? या अनुभवी पंडितास माहीत होतें कीं एखादी नवीन गोष्ट, मग ती कितीही चांगली असली तरी, जोंपर्यंत तिला जुन्या रिवाजाचा आधार मिळत नाहीं तोंपर्यंत पुष्कळ लोक त्यांत सामील होतांना दचकतात. म्हणून त्यानें मोठ्या मेहनतीनें पहिल्या हेन्रीनें दिलेल्या करारनाम्याची नक्कल शोधून काढली होती, ती सर्वांपुढें रुजू करून तो म्हणाला कीं, राजास याप्रमाणें चालण्यास आपण भाग पाडलें पाहिजे. हा ठराव सर्वानुमतें मंजूर झाला; व प्रत्येकानें धर्माध्यक्षाजवळ जाऊन बायबलवर हात ठेवून अशी शपथ घेतली कीं देशाच्या स्वातंत्र्यासाठीं जरूर पडल्यास मी प्राण देण्यास देखील तयार आहें.

**प्रजेचें जाहीर बंड**:—अशा रितीनें संप झाल्यावर थोड्याच दिवसांनीं सगळे तालुकदार सज्ज होऊन दरबारांत गेले. जॉननें त्यांस उडवाउडवीचीं उत्तरें देण्यास सुरुवात केली, परंतु त्या हत्यारबंद सरदारांचे विक्राळ डोळे पाहून तर यावेळीं माघार

घेतल्याशिवाय सुटका नाहीं असें तो समजून चुकला; ह्मणून त्यानें मुदत मागून वचन दिलें कीं, मी तुमच्या मनाप्रमाणें वागेन व त्या बाबतींत लँग्टन् वगैरे दोन चार धर्मगुरु जामीन दिले. ही गोष्ट त्यांनीं कबूल केली. कारण एकदम उडी मारून पाय मोडून घेऊं नये अशी लँग्टनची सल्ला होती. दरम्यान कित्येक हक्क देऊन पाद्र्यांस त्या पक्षांतून फोडण्याची राजानें तजवीज केली. त्याचप्रमाणें साधारण लोकांसही त्यानें कांहीं हक्क दिले. पण राजाच्या या नीच तजविजीनें त्या उच्च प्रजेचा संप जरा सुद्धां डगमगला नाहीं. तेव्हां त्यानें पोपची समजूत करून त्याच्याकडून अशी आज्ञा करविली कीं, सरदारांनीं राजाविरुद्ध उठूं नये, व धर्माध्यक्षानें राजास मदत करावी. परंतु या देशहितेच्छु साधूनें व त्या सरदारांनीं त्या लोभी जगद्गुरुच्या या आज्ञेची बिलकुल पर्वा न करतां आपलाच उद्योग पुढें चालू ठेविला.

मुदत पुरी होतांच सर्व तालुकदार २००० योद्धे घेऊन ऑक्सफर्ड मुक्कामीं राजा होता तेथें गेले. त्यांच्या मागण्या ऐकून राजा तर आश्चर्यचकित झाला. कारण या वेळीं पहिल्या हेन्रीचा करारनामा पुढें ठेवून ते एक निराळाच लेख लिहून मागत होते, व त्यांत प्रजेंतील सर्व वर्गाच्या लोकांचें स्वातंत्र्य राहील अशी शहाणपणाचीं व दूरदृष्टियुक्त पुष्कळ नवीन कलमें लँग्टननें घातलीं होतीं.

जॉननें जबाब दिला कीं, तुह्मीं माझा धनी जो पोप त्यास अर्ज करावा, व तो जें फरमावील तें करण्यास मी कबूल आहे. सरदारांनीं सांगितलें कीं, आह्मीं पोपबीप कोणी जाणत नाहीं. तूं आह्मांस सरळ जबाब दे. तेव्हां जॉननें पोपच्या दूतांमार्फत लँग्टनास सांगविलें कीं हे सरदार जगद्गुरूविरुद्ध बंड करितात तर तुह्मीं या लोकांस धर्माबाहेर टाकलें पाहिजे. त्यानें पोपची इच्छा काय आहे तें तुमच्यापेक्षां मला जास्त माहीत आहे असा त्या दूतांस जबाब दिला व त्याबरोबरच त्यानें राजास सांगून पाठविलें कीं तुह्मी जर तुमच्या भाडोत्री शिपायांस रजा दिली नाहीं तर मीं त्या सर्वांस धर्माबाहेर टाकीन.

यामुळें जॉन घाबरून पळून गेला, व लंडनच्या किल्ल्यांत लपून बसला. तालुकदारांनीं उघडरीतीनें बंडाचें निशाण उभारलें व आपल्या सैन्याचें नांव “ धर्मसैन्य ” असें ठेविलें, व त्याचें नायकत्व एका हुशार सरदारास दिलें. जसजसे ते पुढें जाऊं लागले तसतसे लोकांचे थवेच्या थवे घरेंदारें सोडून व हत्यारबंद होऊन त्यांस येऊन मिळूं लागले. त्यावरून सगळा देश स्वातंत्र्यासाठीं कळकळीनें उभा राहिला आहे हें सिद्ध झालें. यावेळीं राजानें सरदारांस जे हक्क पाहिजे होते ते देण्यास कबूल असल्याबद्दल सांगून पाठविलें, परंतु त्यांनीं उदार बुद्धीनें जबाब दिला कीं आह्मीं आमच्याच स्वार्थासाठीं नव्हे तर सर्व प्रजेसाठीं उभे राहिलों आहों. हें ऐकून राजा लंडनांतून पळून गेला. धर्मसेना तेथें येऊन

पोंचतांच तेथील नगरशेठ ( मेअर mayor ) त्यांस प्रेमानें सामोरा जाऊन स्वतः त्यांच्या पक्षांत सामील झाला. जुलमी जॉनच्या तर्फेस आतां कोणी राहिलें नाहीं. त्यानें हार खाऊन सांगून पाठविलें कीं, तुह्मीं ज्या दिवशीं व ज्या ठिकाणीं भेटून एकी करावयास कबूल असाल त्या ठिकाणीं व त्या दिवशीं येऊन तुमच्या अटी मान्य करण्यास मी कबूल आहें. त्यांनीं जबाब पाठविला कीं असें आहे तर ता. ९ जून रोजीं रनीमीडच्या मैदानांत भेटावें. पुढें तेथें सर्व भेटलें, व थोडी ओढाताण केल्यानंतर ता. १५ जून १२१५ रोजीं या जुलमी व मिजासी राजानें स्वतःच्या हातानें एका लेखावर मोहोर केली. या लेखास " मॅग्ना कार्टा " अगर " मोठा करारनामा " असें ह्मणतात.

करारनाम्याप्रमाणें राजानें चालावें यासाठीं तालुकदारांनीं स्वतःच्या हातांत लंडनचा कबजा ठेविला, किल्ला धर्माध्यक्षाच्या स्वाधीन केला व पंचवीस सरदारांस प्रजेच्या स्वातंत्र्याचे रक्षक ठरवून त्यांस सर्व अधिकार दिले. परंतु लवकरच जॉननें आपलें वचन मोडण्याची तयारी केली. त्यानें करारनामा रद्द करविण्याविषयीं पोपकडून हुकूम मागवून स्वतः भाडोत्री शिपायांस गोळा करून चाऱ्ही बाजूचा मुलुख उजाड करण्यास सुरुवात केली. पण तालुकदार भ्याले नाहींत. त्यांनीं याला पदभ्रष्ट ठरविला व राजगादी फिलिपचा मुलगा लुई यास दिली. तो लष्कर घेऊन धांवत आला, व लंडनचे सर्व सरदार त्यास आपला राजा समजूं लागले. आतां

लढाई खूब पेटली, व दोन्ही पक्षांस एकामागून एकास जयापजय मिळूं लागले. इतक्यांत दैवयोगानें वॉशची खाडी ओलांडून जातांना तींत जॉनचा सगळा खजिना, घासदाणा, व राजचिन्हें बुडून गेलीं, त्याचें शरीर काळजीनें वाळतच होतें, त्यांत या मोठ्या आपत्तीनें भर घातली, व शेजारच्या किल्ल्यांत जेमतेम जाऊन पोंचतांच त्यानें देह सोडला. ( इ. स. १२१६ ). याप्रमाणें जॉनच्या जुलमाचा बढाईचा शेवट झाला.

**मॅग्ना कार्टा.**—जॉनच्या कारकिर्दींत सर्वांत विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे हा करारनामा होय. तो लांबलचक आहे, पण त्यांतील हीं तीन कलमें तर अमूल्यच आहेत.

१. कोणाहि स्वतंत्र माणसास आह्मी दंड, कैद किंवा हद्दपार करणार नाहीं;

२. कोणाहि स्वतंत्र माणसास त्याच्या विरुद्ध पक्षाच्या परवानगीशिवाय आह्मी गुन्हेगार ठरवूं शकणार नाहीं.

३. देशाच्या महाजनांच्या मंजुरी शिवाय कोणताहि कर आह्मी बसविणार नाहीं;

दुसऱ्या कलमाशिवाय खरोखर पहिलें कलम निरर्थकच आहे, कारण गुन्हेगार ठरविण्याचें राजाच्या हातांत असल्यास त्यास मर्जीस येईल त्यास शिक्षा करतां आली असती. पण या कलमानें गुन्हेगार ठरविण्याचें काम तर फिर्यादी पक्षाच्याच ताब्यांत राहिलें व त्यामुळें जर ते त्यास निर्दोषी म्हणाले तर राजाची

कितीही इतराजी असली तरी पण त्यास मनगटें चावीत गुपचुप बसावें लागे.

तिसरें कलम पुष्कळच शहाणपणाचें आहे. यानें लोकांवर भलतच कर बसविण्याचें बंद पाडलें, इतकेंच नव्हे तर कर्ज काढतेवेळीं महाजनांची नेहमी जरूर पडत असल्यानें राजास नेहमीं विचार पडे कीं, जर मी गैरकायद्यानें चालून रयतेस नाराज करीन तर ते कर बसवितेवेळीं माझ्या विरुद्ध जातील. या तिसऱ्या कलमामुळें वारंवार बंड करण्याची जरूरी राहिली नाहीं व राजा आपोआपच सरळ चालूं लागला.

म्हणून, या करारनान्याबद्दल इंग्रजांस जो अभिमान वाटत आहे तो वाजवी आहे. असलें शहाणपणाचें काम पूर्वीं कोणत्याहि देशाच्या कोणत्याहि लोकांनीं केलें नव्हतें. हा करारनामा पूर्णपणें अमलांत येण्यास अर्थातच पुष्कळ वेळ लागला, पण त्यांत प्रजेच्या स्वातंत्र्याच्या सर्व तत्वांचा समावेश केला आहे. म्हणून या करारनाम्याची जगांत सर्व ठिकाणीं वाखाणणी होत आहे, व त्याचें नांव ऐकतांच इंग्रजांचीं अंतःकरणें भरून येतात यांत कांहीं नवल नाहीं. तो लेख, त्याची तारीख व स्थळ हीं स्वातंत्र्याच्या सर्व चहात्यांस पुष्कळ प्रिय आहेत.

# प्रकरण ८ वें.

## प्लँन्टेजिनेट वंशाचे राजे.

## हेन्री ३ रा, एडवर्ड १ ला व एडवर्ड २ रा.

### इ. स. १२१६ पासून इ. स. १३२७ पर्यंत.

जॉनच्या अकाली मृत्युमुळें इंग्लंड फ्रान्सच्या हातांत जातां जातां वांचलें. प्रजेच्या हक्काच्या दृष्टीनें पहातां जॉनचें मरण योग्य काळीं झालें असें ह्मणावयास हरकत नाहीं. तो मरतांच सरदार विचार करूं लागले कीं आतां आपणांस लुईचा खप नसून जाणून बुजून परदेशी मनुष्यास राज्य देणें बरें नव्हे. ते असा विचार करीत असतां इकडे पेंब्रोकच्या अर्लनें जॉनचा वडील मुलगा हेन्री यास पट्टाभिषेक केला व त्यानें सरदारांस समेटाचा आर्जवयुक्त निरोप पाठविला. तो अर्ल बालराजाचा मेहुणा असून स्वभावानें चांगला व शहाणा मनुष्य होता. ह्मणून सर्व सरदार एकामागून एक आपापल्या लष्करासह लुईस सोडून नव्या राजास येऊन मिळाले. त्यांनीं पेंब्रोकास राज्याचा रक्षक ठरविला, व अशारितीनें इंग्लंडचें पुन्हा ऐक्य झाल्यानें लुईस तह करून आपल्या मुलुखांत परत जाणें भाग पडलें.

पेंब्रोक जिवंत होता तोंपर्यंत राज्यांत सुख व समाधान राहिलें, परंतु तो दोन वर्षांत मरून गेला, व राजाजवळ मतलबी

लोक भरले. हेन्री मोठा झाला तरी पोरकटच राहिला व जन्मभर दुसऱ्याच्या अकलेनें चालला. त्याच्या राज्यांत खरा अधिकार त्याचे प्रियमित्र गाजवीत होते, व ते नीच परदेशी लोक फावेल तसें आपलें घर भरीत होते. पण यावेळचे शूरवीर सरदार त्या परदेशी प्रियमित्रांचा अधिकार व जुलूम चालूं देणारे नसल्यानें जेव्हां ते प्रियमित्र हेन्रीस "मोठ्या करारनाम्या" विरुद्ध चालण्यास उत्तेजन देत, त्यावेळीं हे सरदार सिंहासारखी गर्जना करून उठत.

हेन्रीनें ५६ वर्षेपर्यंत राज्य केलें, पण तो सर्व काळ सरदारांच्या भांडणांतच गेला. पुष्कळ वेळपर्यंत राज्याचा सर्व अधिकार सरदारांनीं आपल्या हातांत घेतला होता, व हेन्री बराच वेळ खरोखर कैदीच होता. राजाच्या व सरदारांच्या पक्षांमध्यें पुष्कळ वेळ उघड उघड लढाया झाल्या होत्या, व एक वेळ हा पक्ष जिंके तर दुसऱ्या वेळेस दुसरा जिंके. पण पुष्कळ काळपर्यंत या राज्यांत सरदारांचेंच प्राबल्य होतें. सरदारांचा नायक सायमन-डि-मॉन्टफर्ट नांवाचा होता, त्याच्या संबंधाचा व या भांडणाचा थोडासा मजकूर खालीं दिला आहे.

**सायमन-डि-मॉन्टफर्ट.**—हा राजाचा मेहुणा होता. त्यानें पेंब्रोकच्या विधवा स्त्रीशीं लग्न केलें होतें. तो जातीनें फ्रेंच होता, परंतु या स्त्रीशीं लग्न केल्यानंतर तो लीस्टरचा अर्ल झाला व त्याच्या चांगल्या गुणांमुळें सरदारांत त्याचा उत्तम जम बसला.

राजानें दोन चार वेळ "मोठा करारनामा" मंजूर केला व दोन चार वेळ मोडला, याप्रमाणें राजाच्या बोलण्यांत धरबंध नसून

तो नीच माणसांच्या शिकवणीप्रमाणें वागतो असें पाहून सरदारांनीं एके ठिकाणीं जमून संप केला, व कर मंजूर करण्यासाठीं जेव्हां त्यांस पार्लमेंटांत बोलाविलें, तेव्हां ते तेथें हत्यारबंद गेले व राजास नजरकैदेसारखा करून टाकून त्याच्याकडून शपथ घेवविली कीं, तुमच्यापैकीं पंधरा जणांचें एक मंडळ नेमून तें राज्यसुधारणेसाठीं जे कायदे घडवील ते मला कबूल आहेत. त्याप्रमाणें जें मंडळ नेमिलें गेलें, त्या मंडळाचा प्रमुख मॉन्टफर्ट होता. त्याच्या प्रमुखपणाखालीं जे कायदे घडले ते "ऑक्सफर्डचे कायदे" या नांवानें ओळखले जातात (इ. स. १२५८). या कायद्यांनीं मॉन्टफर्टनें देशांत केवढ्या जंगी राज्यसुधारणेचा पाया घातला तें पुढें सांगण्यांत येईल; परंतु त्याच्या या वेळच्या वागणुकीवरून पुष्कळांस असें वाटलें कीं, राज्याची सर्व सत्ता आपल्याच हातांत घेण्याचा या पंधरा जणांचा विचार आहे. वास्तवीक त्यांनीं तसेंच करण्यास सुरुवात देखील केली होती. त्यांनीं राज्याच्या सर्व अंमलदारांस बदलून टाकलें. पार्लमेंटची बैठक वर्षांतून तीन वेळ व्हावी असें ठरविलें व सर्व जहागिरदारांस याप्रमाणें वारंवार पार्लमेंटांस येतां येणार नाहीं यासाठीं बारा जहागिरदारांस प्रतिनिधि नेमलें, व दरेक परगण्यांतील राजाच्या अंमलदारांस त्यांच्या कामकाजांत चार प्रतिनिधि निवडण्याचा हुकूम केला. हें पाहून कित्येक सरदारांनीं राजाच्या पक्षांत जाऊन लढाईची तयारी केली. मॉन्टफर्टला फ्रान्सांत पळून जाणें भाग पडलें.

पण तेथून लौकरच परत येऊन त्यानें राजास ऑक्सफर्डच्या कायद्याप्रमाणें चालण्यास भाग पडलें ( इ. स. १२६३ ).

फ्रान्सच्या राजाकडे ही तक्रार गेली, तेव्हां त्यानें ऑक्सफर्डचे कायदे रद्द केले. हा ठराव सरदारांनी मान्य केला नाहीं, व त्यामुळें देशांत आत्मविग्रह ( Civil War ) सुरू झाला. इ. स. १२६४ त ल्यूईस जवळ मोठें युद्ध होऊन त्यांत हेन्री कैद झाला. आतां सरदारांचा पूर्ण जय झाला. दोनचार ठिकाणांहून राजाच्या तर्फे हालचाल झाली, परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. सरदारांस धर्माबाहेर टाकण्याचा हुकूम पोपनें पाठविला तो मॉन्टफर्टनें भरसभेंत तिरस्कारानें फाडून टाकला व नाताळचा सण आपण राजवैभवानें पाळला.

मॉन्टफर्टचा हा थाट व पराक्रम पाहून कित्येक सरदारांस वाटलें कीं, त्यास राज्यपद पाहिजे आहे, परंतु त्यानें आपल्या या सर्व चढत्या काळांत जें प्रजाहिताचें अपूर्व काम केलें त्यावरून सिद्ध होतें कीं, तो तर खरोखर लोकस्वातंत्र्याचा मित्रच होता. इ. स. १२६५ च्या जानेवारी महिन्याच्या विसाव्या तारखेस त्यानें जें पार्लमेंट बोलाविलें त्यांत दरेक परगणा ( County ) व कस्बा ( Borough ) येथील लोकांस आपल्यातर्फे दोन दोन माणसें पसंत करून पाठविण्याची त्यानें प्रथमच सत्ता दिली. ऑक्सफर्डच्या कायद्यांत त्यानें या कार्याचें मंगलाचरण केलें होतें व यावेळीं त्यानें त्याचा आरंभ केला.

परंतु सरदारांचें त्याच्याबद्दलचें वैमनस्य दिवसेंदिवस वाढत गेलें, व त्याचा फायदा घेऊन राजपुत्र एडवर्ड यानें आपल्या बापाच्यातर्फे खटपट करण्यास सुरुवात केली. तो बापाबरोबर कैदेंत होता, तेथून निसटून त्यानें लढाईचें निशाण उभारलें. इव्हिशाम येथें जंगी लढाई झाली. बऱ्याच मोठ्या सैन्याशीं दृढनिश्चयानें लढतां लढतां मॉन्टफर्ट मारला गेला. हा पराक्रमी सरदार पडतांच सरदारांचा पक्ष मोडला, व राजसत्ता परत स्थापन झाली. हेन्रीनें मॅग्नाकार्टाप्रमाणें चालण्याची शपथ घेतली, व पार्लमेंटनें त्यास पुन्हां मान्य केलें. मॉन्टफर्टनें जी सुधारणा केली होती ती बंद पाडण्याचा राजानें धीर केला नाहीं, व त्यामुळें तो मरेपर्यंत देशांत शांतता राहिली, ती इतकी कीं, एडवर्ड स्वस्थ चित्तानें क्रूझेडच्या लढाईस गेला, व त्या दरम्यान त्याचा बाप मरून गेला (इ. स. १२७२) तरी पण कांहीं तक्रार उपस्थित झाली नाहीं, व तो गैरहाजर असतां लोकांनीं त्याच्या नांवाची द्वाही फिरविली.

**साधारण लोकांची सभा**:—वर सांगितल्याप्रमाणें या लांब कारकिर्दीचा अंत झाला. यांत सर्वांत ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे मॉन्टफर्टचें तें जंगी काम होय. राजकार्यांत भाग घेण्याचा अधिकार सरदारांस तर मूळपासूनच होता, पण या वेळेपर्यंत साधारण लोकांना कोणी विचारीस नसे. पार्लमेंटचें मुख्य स्वरूप जी लोकांतर्फेची पसंती, तें पहिल्यांदा "ऑक्सफर्डच्या कायद्या" पासून दाखल झालें, व हल्लीं जगभर गाजत असलेल्या इंग्लंडांतील

साधारण लोकांच्या सभे (House of Commons) चा पाया घालण्याचें श्रेय या फ्रेंच माणसास आहे. त्या वेळच्या लोकांस त्याच्यांत कसलेही दोष दिसले असले तरी पण इतिहासांत त्याचें नांव उज्ज्वल स्वतंत्रतेबरोबरच नेहमीं जोडलेलें राहील, आणि जोंपर्यंत इंग्लंडचें पार्लमेंट राहील तोंपर्यंत सायमन–डि–मॉन्टफर्टचें नांव लोक प्रेमानें आठवतील.

## एडवर्ड १ ला.

मुसलमानांबरोबरच्या लढायांत मोठा जय मिळवून एडवर्ड पॅलेस्टाईनहून परत येत असतां रस्त्यांत त्यास हेन्री मरून गेला असून आपल्या नांवानें राज्य चांगलें चाललें आहे अशी बातमी लागली. म्हणून घाई न करतां ठरल्याप्रमाणें तो फ्रान्सांत गेला, व तेथें एक वर्ष राहून त्या राज्याशीं ज्या तक्रारी होत्या त्या त्यानें मिटविल्या. नंतर इंग्लंडांत येऊन आपणास राज्याभिषेक करविला. प्रथम थोडी वर्षें त्यानें देशाचा बंदोबस्त करण्यांत घालविलीं. त्याचा विचार स्वतःचें राज्य मजबूत करून नंतर तें चोहोंबाजूंनीं वाढविण्याचा होता. यासाठीं फ्रान्सबरोबर निरर्थक लढाया न करतां वेल्स व स्कॉटलंड जिंकून इंग्लंडास जोडून देऊन इंग्लंडचें राज्य यूरोपांत जबरदस्त करावें असें त्यानें ठरविलें. आपलें सर्व आयुष्य हा हेतु साधण्यांत त्यानें मोठ्या उत्साहानें खर्च केलें व शेवटीं त्यानें आपला हेतु पुष्कळ अंशीं पार पाडला.

**वेल्सचा लाभः—** वेल्समध्यें रोमन व सॅक्सनांपासून पळून गेलेले ब्रिटन लोक रहात होते. त्यांची भाषा निराळी होती; व अजूनही ती तशीच आहे. पुष्कळ दिवसपर्यंत तो देश इंग्लंडचा मांडलीक समजला जात असे. परंतु तेथील ठाकूर स्वतःची वहिवाट स्वतंत्रपणेंच चालवीत. तेथील पहाडी लोक वरचेवर शेजारच्या तालुक्यांतून इंग्लंडच्या वस्तींतील गुरेंढोरें हांकून नेत. यामुळें त्या दोन्ही प्रांतांच्या नेहमीं तक्रारी चालत असत. शिवाय गेल्या राज्यांत तेथील लोक सरदारांच्या पक्षास मिळाले होते. त्याविषयीं एडवर्डच्या मनांत फार राग होता. म्हणून कांहीं निमित्त काढून त्यानें वेल्सवर स्वारी केली. ते जंगली लोक मोठ्या शौर्यानें व देशाभिमानानें लढले. पण कला व कवायतीपुढें नुसत्या शौर्याचें कांहीं चाललें नाहीं. त्यांच्यांत दुफळी पण फार होती. मागाहून ध्यानांत आल्यानंतर त्यांनीं ऐक्य केलें, पण त्याचा उपयोग झाला नाहीं. त्यांचा राजा ल्युएलिन रणांत पडला, व त्याचा भाऊ पळून जात होता त्यास कोणी पकडून एडवर्डच्या स्वाधीन केलें. एडवर्ड त्याच्याशीं फारच निर्दयतेनें वागला. त्यानें त्याचीं आंतडीं खेंचून काढून तीं त्याच्या देखत जाळलीं, व अशा तऱ्हेनें हाल हाल करून त्यानें त्यास मारलें, व तो मेल्यानंतर त्याच्या डोक्याचे चार तुकडे करून त्यापैकीं एकेक इंग्लंडच्या चाऱ्ही दिशांस तो पाहून सर्वांनीं भ्यावें म्हणून पाठविला. यामुळें एडवर्डचा चहूंकडे दरारा बसला व सर्व मुलख त्यास खालसा करण्यास वेळ लागला नाहीं (इ. स. १२८४).

**स्कॉटलंड घेण्याची तजवीज:**—स्कॉटलंड एडवर्डनें पूर्वींच घशांत घातला होता. तेथील राजा नुकताच मेला होता. त्यास एक मुलीची मुलगी होती. स्कॉटलंडची गादी लढाई-शिवाय आपल्या वंशांत यावी ह्मणून एडवर्डनें तिच्याबरोबर आपल्या मुलाचें लग्न ठरविलें. परंतु ती मुलगी लवकरच मरून गेली, व तिच्या नातेवाईकांपैकीं तिघेजण त्या गादीसाठीं भांड-ण्यास उभे राहिले. एडवर्डनें धीर न सोडतां या भांडणाचा फायदा घेऊन आपलाच हेतु साधण्याची उलट तजवीज केली.

त्यानें त्या तीन उमेदवारांस अशी सल्ला देवविली कीं, तुह्मीं आपापसांत भांडण्यापेक्षां निवाडा करण्याचें काम इंग्लंडच्या राजास सोंपल्यास बरें. ही गोष्ट त्यांस व स्कॉटलंडच्या पार्लमेंटास पसंत पडली. ते तिघेही थोड्या सरदारांस बरोबर घेऊन मोठ्या आनंदानें निवाडा करून घेण्यास निघाले व एडवर्ड त्यांस समोरा जाऊन सरहद्दीवरील नॉरहॅम व बेरिक या परगण्यांत त्यांस भेटला. मुला-खत होतांच एडवर्डची लबाडी त्यांच्या लक्षांत आली. त्यानें अशी अट घातली कीं, मी सार्वभौम या नात्यानें तुमचा निवाडा करणार आहे, ह्मणून तुह्मी पहिल्यानें माझें स्वामित्व पत्करावें व तुमचे मोठमोठे किल्ले माझ्या स्वाधीन करावें. स्कॉटलंडवर इंग्लंडचा स्वामित्वाचा हक्क कांहीं होता खरा, व एकदां स्कॉटलंडचा एक राजा पकडला गेला होता तेव्हां त्यानें तें उघडपणें कबूलही केलें होतें; परंतु तो प्रांत अद्यापपर्यंत स्वतंत्रच होता, व तेथील

लोकांस स्वामित्वाचें नांव ऐकतांच राग येई. यासाठीं काय करावें असा त्यांस विचार पडला. विश्वासानें ते तर सडेच आले होते, पण एडवर्ड स्वतः बरोबर निवडक योद्धे घेऊन आला होता. त्यानें धमकी देखील दिली कीं, तुह्मी माझें स्वामित्व कबूल न केल्यास तुम्हांस तुमच्या जन्मभूमीचें तोंड पुन्हा दिसणार नाहीं. ते बिचारे उमेदवार व त्यांच्याबरोबरचे थोडेसे सरदार काय करणार? इकडे तिकडे ओढताण करून शेवटीं ते वळले.

**स्कॉटलंडवरील जयः**—सर्व किल्ले ताब्यांत घेऊन त्यांत आपलें लष्कर भरल्यानंतर एडवर्डनें युरोपांतील पंडितांकडून जॉन बेलियलच्यातर्फेचा शास्त्रार्थ मागवून ठेविला होता तो जाहीर केला (इ. स. १२९२). बेलियलास अशा रीतीनें राज्य तर मिळालें, परंतु लोक बरेच नाखुष झाले. ते राजास परदेशी जूं काढून टाकण्यास सांगूं लागले. एडवर्डची इच्छा देखील असेंच व्हावें अशी होती. कारण लढून सर्व मुलुख खालसा करण्यास आपणांस चांगलें निमित्त मिळेल असें त्यास वाटत होतें. या हेतूनेंच बेलियलास वाईट वाटावें ह्मणून अगदीं साधारण कामासाठीं सुद्धां तो त्यास लंडनास बोलावूं लागला. यामुळें शेवटीं बेलियल कंटाळला व फ्रान्सबरोबर इंग्लंडची लढाई सुरू झाली ती संधि साधून त्यानें उघड बंड उभारलें.

ही बातमी ऐकून एडवर्ड फ्रान्सकडे जावयास निघाला होता तो मागें फिरून स्कॉटलंडकडे धांवला, व डनबरजवळ त्यानें मोठा

जय मिळविला (इ. स. १२९६). बेलियल पकडला गेला. त्यास कैदेंत ठेवून एडवर्डनें स्वतःच्या नांवाची द्वाही फिरविली, व मुलुखाच्या बंदोबस्तासाठीं त्यानें तेथें एक सुभा नेमिला.

**उइल्यम वॉलेसचें बंड**:—या पुरुषाचें नांव जगांत फार प्रसिद्ध आहे. त्यानें यावेळीं आपल्या देशाची लाज राखली. स्कॉटलंडांत इंग्रज लोक पुष्कळ जुलूम करूं लागले, पण कोणाच्यानें कांहीं बोलवलें नाहीं. कारण सरदार लोक आपसांतील भांडणामुळें निर्बळ झाले होते. उइल्यम वॉलेस तर एक ल्हानसा वतनदार होता. देशाचें दुःख पाहून त्याच्या अंगाची आग होत होती. एके दिवशीं तो गांवास गेला असतां एका इंग्रज अंमलदारानें त्याच्या बायकोची अब्रू घेतली, व त्यामुळें ती स्त्री एकदम वेडी झाली. हा गुन्हा छपविण्यासाठीं त्या पाप्यानें वॉलेस बंडखोर आहे असें म्हणून त्याचें घरदार जाळून टाकिलें. वॉलेस गांवाहून येऊन पहातों तों बायको वेडी झालेली व घरदार जाळून टाकलेलें. त्याचवेळीं "आतां मी मरेन, नाहीं तर इंग्रजांस मारीन" अशी प्रतिज्ञा करून तो तरवार घेऊन डोंगरांत चालता झाला.

थोड्याच वेळांत वॉलेसची हांक चहूंकडे पोंचली, व दुसरे हजारों शूर लोक त्यास येऊन मिळाले. त्यांनीं एकत्र होऊन इंग्रजांची कत्तल करून एकामागून एक पुष्कळ किल्ले सर करण्यास सुरुवात केली. आतां सरदार देखील आपल्या सैन्यासह त्याच्या हातखालीं येऊन उभे राहिले. नंतर स्टर्लिंगजवळ इंग्रजांशीं त्यांचें

मोठें युद्ध होऊन त्यांत इंग्रजांचा पराजय करून त्यांस त्यांनीं देशाबाहेर हांकून लाविलें. अशा रीतीनें या एका माणसाच्या पराक्रमानें सर्व पराधीन झालेला मुलुख परत स्वतंत्र झाला.

ही बातमी एडवर्डास समजतांच त्यानें एक लाख सैन्य गोळा केलें व शक्य तितक्या लवकर तें घेऊन तो स्कॉटलंडवर स्वारी करून आला. हें पाहून वॉलेसच्या सैन्यांतील सरदार एकामागून एक पळून जाऊं लागले. त्यांस खुष करण्यासाठीं वॉलेसनें नायकत्व सोडून एखाद्या साधारण शिपायाप्रमाणें लढण्याचें कबूल केलें. परंतु जेथें असले स्वार्थी व भित्रे सरदार असतील तेथें जय मिळणें अशक्य आहे. एकटा वॉलेस काय करणार ! फॉल्कर्क येथें मोठी लढाई झाली व त्यांत स्कॅटलंडचा पूर्ण पराजय झाला (इ. स. १२९८). तरी पण रयत सहज स्वाधीन होईना. इंग्रजी लष्कर आलें कीं ती लाचारी दाखवी खरी, परंतु तें येऊन गेलें ह्मणजे ती पुन्हां जशीच्या तशी होई. अशी लढाई पुष्कळ वर्षें चालू राहिली. शेवटीं एडवर्ड कंटाळून गेला. तो समजून चुकला कीं जोंपर्यंत हा एक पुरुष जिवंत आहे तोंपर्यंत स्कॉटलंड माझ्या ताब्यांत पूर्णपणें कधींही येणार नाहीं. ह्मणून त्यास पकडण्यासाठीं त्यानें पुष्कळ खटपट केली, पण बराच वेळपर्यंत कांहीं वळलें नाहीं. बोलतां बोलतां तो या डोंगरांतून त्या डोंगरांत पळून जाई, व त्याचा पाठलाग करण्याचें धैर्य कोणासही होत नसे. लोकांचा भाव त्याच्याबद्दल इतका होता कीं, डोकें कापलें तरी ते

त्याचा पत्ता दाखविण्यास कबूल होत नसत. शेवटीं पुष्कळ लालूच दाखविली तेव्हां एका दुष्ट मनुष्यानें वॉलेसास आपल्या घरीं पाहुणा बोलावून त्यास फसविलें. वॉलेस मरणास भ्याला नाहीं. एडवर्डनें त्यास लंडनास नेऊन अत्यंत क्रूरपणें हाल हाल करून मारलें. ( इ. स. १३०५ ).

**रॉबर्ट ब्रूसचें बंड:**—वॉलेसला मारून स्कॉटलंडचें राज्य निष्कंटक करण्याची एडवर्डची इच्छा होती, परंतु त्याचा परिणाम त्याच्या अगदीं उलट झाला. वीर पुरुषांच्या मरणानें देखील देशास फायदाच होतो, कारण त्याच्या रक्ताच्या दरेक थेंबांतून दुसरे अनेक वीर पुरुष उत्पन्न होतात. वॉलेसला मारल्याचें ऐकतांच स्कॉटलंडमधील ठिकठिकाणचे लोक सूड घेण्यास सरसावले व त्यांचें नायकत्व रॉबर्ट ब्रूसनें घेतलें. रॉबर्ट ब्रूस हा जॉन बेलियल याच्या बरोबर जो दुसरा उमेदवार होता त्याचा नातू होता, व सध्यां दुसरे जवळचे व लांबचे सर्व वारस मरून गेल्यामुळें तोच स्कॉटलंडच्या गादीचा खरोखर हक्कदार होता.

आतांपर्यंत तो एडवर्डच्या पक्षांत होता. असें सांगतात कीं, फॉल्कर्कच्या लढाईच्या दिवशीं तो एकटाच नदी किनाऱ्यावर फिरत होता, त्या वेळीं समोरच्या कांठावरून वॉलेसनें त्याला पाहिलें व विचारलें, " कोण, ब्रूस " ? तो होय म्हणाला. तेव्हां वॉलेसनें आश्चर्ययुक्त तिरस्कारानें त्यास विचारलें कीं, तूं इकडे कुणीकडे ? नंतर त्यानें देशावरील आपत्तीचें वर्णन त्याजकडे

अशा तऱ्हेनें केलें कीं ब्रूसच्यानें वर मान करून त्याच्याकडे पहावेना. त्यानंतर वॉलेसनें त्यास सांगितलेले शब्द नेहमीं त्याच्या कानाशीं गुणगुणूं लागले. वॉलेस मेला तेव्हां ब्रूसला त्याच्या आत्म्यानें सांगितलें " ऊठ, आतां तुझी पाळी आली आहे. तूं बसून काय राहिला आहेस ? " तो एकदम वेष बदलून लंडनांतून पळाला व स्कॉटलंडांत येऊन सरदारांस भेटला. त्यांनीं त्यास राज्याभिषेक केला, व नंतर सर्वांनीं एकमतानें त्या मुलुखांतून इंग्रजांस हांकून लाविलें. (इ. स. १३०६).

एडवर्डनें लगेच तिकडे मोठें सैन्य पाठवून स्कॉट लोकांची खूब कत्तल करून त्यांस हरविलें. सगळा मुलूख परत इंग्रजांच्या हातांत गेला, व ब्रूसला पश्चिमेकडील बेटांत पळून जाणें भाग पडलें. वास्तवीक इंग्लंडच्या सैन्यापुढें स्कॉटलंडचा टिकाव लागणेंच शक्य नव्हतें व म्हणून शिवाजीप्रमाणें गनिमी काव्याची लढाई करण्याशिवाय त्यांस दुसरा मार्गच नव्हता. अशा तऱ्हेच्या लढाईंत काळजी, चपळता व उत्साही स्वभावाची जरूर असते. हे गुण ब्रूसमध्यें पूर्णपणें होते, व त्यांच्या योगानेंच शेवटीं त्यानें आपला देश स्वतंत्र केला.

एडवर्ड युद्धकलेंत बराच निपुण होता. त्यानें पाहिलें कीं, ब्रूसची ही लढाईची रीत एखादे दिवशीं आपणांस बरीच जाचक होईल. म्हणून त्यानें त्याचा एकदम नाश करण्याच्या इरायानें मोठ्यांत मोठें लष्कर गोळा केलें, व स्वतः आतां जरी वयातीत व

नाजूक झाला होता तरी आपणच त्याचें नायकत्व पतकरलें. परंतु रस्त्यांत जातां जातां त्याची प्रकृती बिघडली, व कार्लाइल सोडून पुढें जातांच त्यास देह सोडावा लागला. ( इ. स. १३०७ ). स्कॉटलंड जिंकण्याची त्यास इतकी हांव होती कीं, मरतां मरतां त्यानें आपल्या मुलास आज्ञा केली कीं, हा मुलुख जिंकल्याशिवाय तूं मागें फिरूं नकोस, व माझ्या प्रेतास तोंपर्यंत न पुरतां एका पेटींत घालून ती लष्कराच्या पुढें चालव. त्याच्या म्हणण्याप्रमाणें जर झालें असतें तर शंभर हिश्शांनीं एडवर्डची इच्छा पुरी झाली असती. परंतु त्याचें सांगणें त्याच्याबरोबर गेलें, व मुलानें बापाच्या प्रेतास मूठमाती देऊन कांहींवेळ उगीच लढाईचें स्तोम माजवून शेवटीं तो मागें फिरला.

**एडवर्डची राजनीतिः**—प्लँटॅजिनेट वंशांत या राजास कित्येक सर्वांस मोठा समजतात, व खरोखरच तो मोठा पराक्रमी व शहाणा राजा होता. जी गोष्ट मनांत येई ती पार पडे तेव्हांच त्यास चैन पडे. तरी पण तो केव्हांही अविचारीपणा करीत नसे. तो जे घाट रची ते पक्के व दूरदृष्टीनें रची. त्याच्यांत राज्यलोभ हा मोठा दुर्गुण होता, व त्यामुळें त्यानें वेल्स व स्कॉटलंडच्या संबंधांत अन्याय केला व क्रूरपणानें वागला. तथापि स्वतःच्या रयतेस चांगला न्याय देण्यासाठीं तो इतकी काळजी बाळगी कीं त्या बाबतीच्या कायद्यांत त्यानें पुष्कळ सुधारा केला. न्यायाधीश

पुष्कळ लांचखाऊ झाले होते, ह्मणून त्यानें एकदां दोघांशिवाय सर्वांस बडतर्फ केलें होतें. तो शिक्षा करण्यांत असा कडक होता कीं, त्याच्या राज्यांत पूर्वीपेक्षा गुन्हे पुष्कळ कमी झाले.

ही पण एक ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे कीं अशा निःपक्षपाती राजाच्या वेळेलाच यहुदी लोकांस देशनिकाल करण्याचा कायदा झाला होता; व त्याचा थोडाबहुत अंमल इंग्लंडचें राज्य पूर्णपणें प्रजासत्ताक होईतोंपर्यंत चालू होता.

पार्लमेंटचा अंकुश त्यास पसंत तर नव्हता, पण बापाच्या वेळच्या अनुभवावरून त्यास माहीत झालें कीं, इंग्रज रयतेस या बाबतींत नाखूष करण्यांत अर्थ नाहीं. या मुळें तो निभेल तोंपर्यंत निभवून घेई, नाहीं तर त्यांस तो बाजूस ठेवी.

मॅग्नाकार्टा त्यास पुष्कळ वेळ मंजूर करावा लागला होता. एक दोन वेळ त्यानें पार्लमेंटच्या परवानगीवांचून कर वसूल केले. होते, तरी "राजास पार्लमेंटच्या परवानगीवांचून कधींहीं कर बसवितां येऊं नये" असा कायदा घडविणें त्यास सरदाराच्या भीतीमुळें भाग पडलें. यावरून एडवर्डपेक्षां सरदारच बळवान् होते, हें तुमच्या सहज लक्ष्यांत येईल.

## एडवर्ड २ रा.

हा राजा पहिल्या एडवर्डचा वडील मुलगा होय. बाप मरतांच स्कॉटलंडचें बंड तसेंच ठेवून तो परत आला होता, हें

पूर्वी सांगितलेंच आहे. त्यावरून तुमच्या लक्ष्यांत आलें असेलच कीं, या नव्या राजांत शौर्य बिलकूल नव्हतें. तेंच खरें. हा राजा स्वभावानें अगदीं थंड व तंट्यास भिणारा होता. परंतु त्यास माहीत नव्हतें कीं, जगांत लढाई व तंटे मिटविण्याचा मार्ग ह्मणजे भित्रेपणा नव्हे. लढाईस कंटाळून तो इंग्लंडांत आला तर तेथें त्याचे तालुकदार कुठें त्यास सुखानें बसूं देत होते ? आणि सर्व राज्यांत सरदारांची बंडें होत होतीं तीं वेगळींच. शेवटीं त्यांतच त्याचा जीव देखील गेला. परंतु त्या बंडाची हकीगत देण्यापूर्वी आपण त्याबरोबरच स्कॉटलंडचें काय झालें तें या ठिकाणीं सांगूं.

**बॅनॉकबर्नची लढाईः**—एडवर्ड मागें वळतांच रॉबर्ट ब्रूसनें एकामागून एक किल्ले घेण्यास सुरुवात केली. पांच सात वर्षांत बराचसा मुलुख परत त्याच्या हातीं आला. एडवर्ड तर हा सर्व वेळ तालुकदारांच्या भांडणांत अडला होता, व अजूनही त्यांतून मोकळा झाला नव्हता. परंतु स्टर्लिंगच्या मोठ्या किल्ल्यास ब्रूसनें वेढा घातला होता, तो तरी शक्य असे तोंपर्यंत जाऊं देऊं नये या हेतूनें स्कॉटलंडवर स्वारी करण्याचा त्यानें निश्चय केला. एडवर्डनें तयारी तर चांगली केली. निवडक असें एक लाख माणूस जमा करून तें घेऊन तो स्कॉटलंडांत शिरला.

हें मोठें सैन्य येत असल्याचें ऐकून ब्रूस विचारांत पडला. त्याच्याकडे ज्यास्तींत ज्यास्ती तीस हजारच सैन्य जमेल असें

होतें. परंतु तें सर्व शूर, एकमताचें व पूर्ण देशाभिमानी असल्यानें ब्रूसनें लढाई करण्याचा निश्चय केला व स्टर्लिंगच्या दक्षिणेस किंचित् दूर असलेल्या, स्टर्लिंगच्या मदतीस येणाऱ्या सैन्यास ज्या रस्त्यानें जावेंच लागेल अशा, बॅनॉकबर्नच्या मैदानांत स्वतःचें सैन्य उत्तम व्यूहरचनेनें उभें करून तो शत्रूची वाट पहात राहिला. या मैदानाच्या एका बाजूस मोठे डोंगर व दुसऱ्या बाजूस दोन मैल वर्तुळाकार फोर्थ नदी आहे; व मध्यें बॅनॉक नांवाचा एक नाला आडवा आलेला असून तो फोर्थ नदीस जाऊन मिळतो व त्या बाजूस पुष्कळ चिखल असतो. डोंगरांच्या बाजूस त्या नाल्याच्या कांठीं मोठें जंगल होतें. ब्रुसनें आपल्या लष्करास तो चिखल व जंगल यांच्या मधल्या भागांत बॅनॉकच्या उत्तरेस उभें केलें व कांहीं रिकामी जागा राहिली तेथें खड्डे खणवून त्यांवर झाडांच्या फांद्या पसरून दिल्या.

ही व्यूहरचना अशी होती कीं, समोरून केवढेंही लष्कर आलें तरी तें निरुपयोगी व्हावें, अथवा जर चुकून एकदम पुष्कळ माणसांनीं हल्ला केला तर त्यांच्यासाठीं एक बाजूस दलदल व दुसऱ्या बाजूस खाडे तयारच होते. शेवटीं धारल्याप्रमाणें झालें. नाला सोडून दुसरीकडून जाणें शक्य नव्हतें, म्हणून नाला ओलांडून एडवर्डचें सर्व सैन्य या बाजूस आलें, व येतांच सांडशींत सांपडलें कित्येक चिखलांत बुडून मेले; व कित्येक खाड्यांत पडले त्यांस शत्रूंनीं शोधून काढून मारलें. लष्कर मोठें असल्यानें त्याच्या

तुकड्या आपसांतच घोंटाळल्या. तिरंदाज, भालेवाले व तरवार-वाले, पायदळ व घोडेस्वार या सर्वांचा एकच गोंधळ होऊन इंग्रजी लष्करांत मोठा हाहा:कार झाला. हें पाहून ब्रूसनें शेवटचे हल्ले केले. मोठी कत्तल सुरू झाली व लाख माणसांच्या सैन्याचा घटके दोन घटकेंत नाश झाला. ( इ. स. १३१४ ). जे थोडे वांचले, त्यांच्या पळतां पळतां नाकीं नव आले. या पराजयामुळें पुढें कित्येक वर्षेंपर्यंत स्कॉटलंडकडे पाहण्याची देखील हिंमत इंग्लंडास राहिली नाहीं. या जंगी विजयानें स्कॉटलंड देश स्वतंत्र झाला तो थेट इ. स. १६०३ त तेथील राजा जेम्स यास इंग्लंडची गादी वारसाई हक्कानें मिळेपर्यंत स्वतंत्रच राहिला.

**तालुकदारांचीं बंडें.**—एडवर्डनें पहिलें पार्लमेंट बोलाविलें त्यांतच सरदार त्याच्या विरुद्ध उठले, व त्यांनीं सांगितलें कीं, तुमच्या आवडत्या पीअर्स गॅव्हेस्टनास हद्दपार करा. हा गृहस्थ हलकट असून एडवर्डचा लहानपणापासून स्नेही होता. एकदां मोठ्या एडवर्डनें देखील त्यास हद्दपार केला होता. पार्लमेंटची ही मागणी त्यास नाकारतां येईना, परंतु हद्दपार करण्याच्या निमित्तानें त्यास त्यानें आयर्लंडचा सुभा करून पाठविलें, व दीडएक वर्षांत त्यास पुन्हा आपलेजवळ बोलावून घेतलें. तालुकदारांनीं पुन्हा हत्यारें सरसाविलीं व पुष्कळशी राजसत्ता आपणांपैकीं कित्येकांकडे सोंपविली. तरी देखील हा बेअकली राजा कांहीं उमजला नाहीं. त्यानें गॅव्हेस्टनास तिसऱ्यांदा परत बोलाविलें, व तिसऱ्यांदा सरदार

त्याच्या विरुद्ध उठले. यावेळीं तर त्यांनीं लँकॅस्टरच्या ड्यूकच्या हाताखालीं उघड बंड केलें. त्यामुळें राजास पळून जाणें भाग पडलें, गॅव्हेस्टन पकडला गेला व सरदारांनीं त्याचा शिरच्छेद केला (इ. स. १३१२).

स्कॉटलंडांत अपजय घेऊन आल्यापासून एडवर्डचें सर्व वजन नाहींसें झालें होतें, व तालुकदार साध्या बाबतींत देखील त्याच्याशीं तुच्छतेनें वागूं लागले. यावेळीं एडवर्डची प्रीति डिस्पेन्सर नांवाच्या बापमुलावर फार होती. धाकटा डिस्पेन्सर तरुण व चांगला पुरुष होता. परंतु तालुकदारांच्यानें हेंही पहावेना. त्यांनीं बंड करून लंडन घेतलें, पार्लमेंट बोलाविलें, व दोघांही डिस्पेन्सरांस बडतर्फ केलें. हें पाहून एडवर्ड लष्कर घेऊन बंडखोरांच्या मागें धांवला. त्यांनीं स्कॉटलंडची मदत घेतली, परंतु राजानें त्यांचा पराभव केला (इ. स. १३२२). लँकॅस्टरला पकडला व त्यास त्याच्या स्वतःच्या किल्ल्याजवळ आणून फजात करून फांशीं दिलें. परंतु "घर फिरलें कीं घराचे वांसेही फिरतात" या ह्मणीप्रमाणें बिचाऱ्या एडवर्डास झालें. त्याची दुष्ट राणी रोजर मॉर्टिमर नांवाच्या एका सरदाराबरोबर बिघडली, व त्याच्या चिथावणीवरून आतां ती बंडखोरपक्षास उघड रीतीनें जाऊं लागली. फ्रान्सांत गेली होती तेथून तिनें नवऱ्यास सांगून पाठविलें कीं, तुह्मी डिस्पेन्सरांस काढून टाकाल तरच मी येईन. राजास विचारल्याशिवाय मुलगा एडवर्ड याचें तिनें लग्न केलें,

व त्याच्या सासऱ्याकडून लष्कर आणून इंग्लंडांत येऊन बंडांत सामील झाली. राजाचे दोघे भाऊही त्यांत मिळाले. एकटा बिचारा एडवर्ड काय करील? तो वेल्समध्यें पळाला व दोघेहि डिस्पेन्सर पकडले गेले, त्यांस राणीनें फांशी दिलें. राजा वेल्समधून आयर्लंडास जाण्यास निघाला, पण दुर्दैवानें वाऱ्यामुळें त्याचें जहाज मागें परत आलें, व तो शत्रूच्या हातांत सांपडला (इ.स. १३२७). पापी राणीनें त्यास एका किल्ल्यांत कैदेंत ठेविलें, व सांगतात कीं, तेथें तापलेल्या सळया त्याच्या पोटांत खुपसून त्यास तिनें मारून टाकविलें.

---

## प्रकरण ९ वें.

### प्लॅन्टॅजिनेट वंशाचे राजे.

### एडवर्ड ३ रा, व रिचर्ड २ रा.

**इ. स. १३२७ पासून इ. स. १३९९ पर्यंत.**

**एडवर्ड तिसराः**—एडवर्ड पकडला गेल्यावर राणीनें पार्लमेंटकडून त्यास एकदम पदभ्रष्ट करविलें, व आपल्या मुलास तिसरा एडवर्ड हें नांव देऊन गादीवर बसविलें (इ. स. १३२७). हा राजा अजून चौदा पंधरा वर्षांचा होता, ह्मणून सर्व कारभार राणीचा ह्मणजे त्या पापी मॉर्टिमरच्या हातांत आला. सुमारें तीन वर्षें असें चाललें, त्यांत त्यानें पुष्कळ जुलूम केला व पुष्कळांस

लुटून आपल्या जहागिरी वाढविल्या. स्कॉटलंड बरोबर लढाई झाली, त्यांत हरून त्यानें त्यांचें स्वातंत्र्य कबूल केलें. सरदार त्यास कंटाळून फितुर होऊं लागले. मॉर्टिमरनें राजद्रोहाचा आरोप ठेवून राजाच्या काकास मारून टाकलें, व त्याच्या जहागिरी जप्त केल्या व आपण आतां राजासारखा मिजाशीनें वागूं लागला. तरुण एडवर्डास हें सर्व सहन होईना. त्यानें कित्येक सरदारांबरोबर मसलत करून, ज्या किल्ल्यांत त्याची आई व मॉर्टिमर राहत होतीं, तेथें एकाऐकीं रात्रीं घुसून त्या दोघांस कैद केलें, व कोणत्याही विधीशिवाय मॉर्टिमरास फांशी दीलें, व स्वतःच्या दुष्ट आईस मरेपर्यंत एका किल्ल्यांत कैदेत ठेविलें (इ. स. १३३० ).

**स्कॉटलंड परत मिळविण्याची मेहेनतः**—एडवर्ड आपल्या आजाप्रमाणें महत्त्वाकांक्षी होता. लहान असून देखील स्कॉटलंडबरोबर लढाई झाली तींत तो गेला होता. आतां स्वतःच्या हातांत राज्य घेतल्यावर त्यानें पहिलीं दोन वर्षें राज्याचा बंदोबस्त करण्यांत घालविलीं, व नंतर स्कॉटलंडबरोबर पुन्हा लढाई सुरू केली. यावेळीं मोठा ब्रूस मरून गेला होता, व त्याचा मुलगा डेव्हिड गादीवर होता, व तो अजून वयानें लहान होता. त्यामुळें एडवर्डनें बेलियलच्या मुलास चिथविलें. तो फ्रान्समधून येऊन लढला व त्यानें राज्य घेतलें, परंतु तो एडवर्डच्या पक्षांतील आहे असें समजतांच स्कॉट लोकांनीं त्याला थोड्याच दिवसांत गादीवरून हांकून लावलें. एडवर्ड त्याच्या मदतीस गेला, व त्यानें हॅलिडन-

हिल येथें मोठा जय मिळविला. परंतु त्याचें लष्कर मागें वळतांच ते लोक परत उद्दाम झाले. त्यांनीं निश्चय केला होता कीं, परदेशी लोकांच्या ताब्यांत जावयाचें नाहीं. सुमारें सहा वर्षें ही लढाई चालली, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं व शेवटीं डेव्हिड गादीवर आला.

एडवर्डनें पाहिलें कीं, स्कॉट लोकांचा जास्त पिच्छा पुरविण्यांत अर्थ नाहीं. वॉलेस व ब्रूसच्या तालमीनें ते पण देशाभिमानी झाले होते, व आतां जिंकले जाण्याऐवजीं ते उलट इंग्लंडवर स्वाऱ्या करूं लागले होते. एडवर्ड ज्यावेळीं फ्रान्सांत यशाचा डंका वाजवून राहिला होता, त्यावेळीं या लोकांनीं इंग्लंडवर एक जोराचा हल्ला केला. परंतु जिच्या हातीं यावेळीं राज्याची लगाम होती त्या एडवर्डच्या राणीनें धैर्यानें बचाव केला, व नेव्हिल्सक्रॉस येथील लढाईंत जय मिळवून स्कॉटलंडचा राजा डेव्हिड यास कैद केलें (इ. स. १३४६).

**शंभर वर्षांच्या लढाईस आरंभ.**—स्कॉटलंडचा लाग साधला नाहीं ह्मणून त्याचा सूड फ्रान्सवर उगाविण्याचा एडवर्डनें निश्चय केला. कारण स्कॉटलंडास फ्रान्सची मदत होती. फ्रान्सचा राजा मरून पुष्कळ वर्षें झालीं होतीं, व गादीवर कोणी बसावें याविषयीं त्यावेळीं तक्रार चालली होती. एडवर्डचा आपल्या आईच्या बाजूनें त्या गादीवर हक्क पोंचत होता. परंतु वास्तवीक हा हक्क अगदीं निराधार होता, व एडवर्डनें स्वतःच इ. स. १६२९ त

खऱ्या हक्कदारांचें स्वामित्व कबूल केलें होते. परंतु आतां त्यानें तो प्रश्न उपस्थित केला व इ. स. १३३८ त फ्रान्सवर पहिला हल्ला केला.

या बाबतींत फ्रान्सबरोबर पुढें शंभर वर्षें लडाई चालली. त्याचा परिणाम इतकाच झाला कीं, दोन्ही देशांची अगदीं खराबी झाली, आणि इंग्रज व फ्रेंच यांच्यामध्यें इतका वैरभाव झाला कीं, तो अजूनपर्यंत चालत होता. यावेळीं आपल्यापैकीं दोन तीन राजांनीं जे फ्रान्सांत जय मिळविले होते ते पाहून इंग्रज चढून गेले होते, परंतु हल्लींच्या तज्ज्ञ पुरुषांची समजूत अशी आहे कीं, जर त्यावेळीं फ्रान्स इंग्लंडकडून जिंकला गेला असता तर इंग्लंडची महादुर्दशा झाली असती. जर इंग्रजांनीं फ्रान्स जिंकला असता, तर इंग्लंडचा राजा स्वतःची राजधानी तेथेंच करून राहिला असता. राजधानी परदेशांत असल्यास किती गैरफायदे होतात तें उघडच आहे. मुसलमानी जुलमी राजांकडून हिंदुस्थानचा जो उत्कर्ष झाला त्याचें कारण हेंच कीं ते या देशांत रहात असत; परंतु तो काळ इतक्या बारकाईनें विचार करण्याचा नसून वीररसाच्या झटा-पटीचा होता. या लढाईनें इंग्रजांचीं हत्यारें झळकलीं व तीं सर्व युरोपांत नांवाजलीं गेलीं, आणि त्यामुळें प्रजेंत स्वाभिमान जागृत झाला. यावेळेपासून फ्रान्सचे राजे इंग्लंडवरील स्वामित्वाचा हक्क दाखविणें विसरून गेले व यापुढें इंग्लंडची मोठ्या राज्यांत गणना होऊं लागली.

**क्रेसीचें युद्ध. इ. स. १३४६ः**—यावर्षी फ्रान्सची लढाई फार जोरांत आली. एडवर्ड ३०००० सैन्य घेऊन फ्रान्सांत गेला, व चहूंकडचा मुलुख उजाड करीत करीत पॅरीसपर्यंत जाऊन पोंचला. परंतु त्यानें त्या शहरास वेढा घातला नाहीं, कारण तेथील किल्ला फारच मजबूत होता, व त्याच्या मदतीस फिलिप राजा सुमारें सव्वा लाख लोक बरोबर घेऊन धांवत येत होता. यामुळें एडवर्ड मागें वळला, व फ्रान्सच्या किल्लीप्रमाणें समजलें जाणारें कॅले शहर घेण्याचा विचार करून तो तिकडे गेला. फ्रेंच लष्करानें त्याचा पाठलाग सुरू केला. पुढें इंग्रज व मागें फ्रेंच अशी कित्येक दिवसपर्यंत दौड चालली होती. आतां हे लोक आपणास पकडल्याशिवाय रहात नाहींत असें पाहून एडवर्डनें आपलें लष्कर रस्त्यांत क्रेसीचा कडा लागला त्यावर चढवून उभे केलें. हा कडा बचावाच्या लढाईस जसा पाहिजे तसा होता. शिवाय विशेष रक्षणासाठीं एडवर्डनें आपल्या लष्करा सभोंवतीं खंदक खोदविले. अशा रितीनें कोट बांधून त्यानें आपल्या लष्कराची उत्तम रचना केली. तिरंदाजांस जंगलाजवळ अंतराअंतरावर उभे करून त्यांच्या मागें त्यानें भालेवाले उभे केले आणि तरवारवाले त्यानें आपल्याजवळ ठेविले.

आतां फ्रेंच लष्कर तेथें धांवत येऊन पोंचलें. फिलिपचा विचार थोडीशी विश्रांती घेऊन ताजेतवाने होऊन दुसऱ्या दिवशीं लढाई देण्याचा होता, परंतु सरदारांस तो विचार पसंत पडला नाहीं. त्यांनीं पसरलेल्य स्थितींत असतांच एकदम इंग्रजांवर हल्ले

केले. तिरंदाजांचा हल्ला चालू होतो न होतो, इतक्यांत पावसाची एक सर येऊन गेली, व त्यांच्या धनुष्याच्या दोऱ्या भिजून गेल्या. त्यामुळें त्यांनीं मारलेले तीर नेमक्या ठिकाणीं जात नसत, व गेले तरी जोरानें लागत नसत. इंग्रजांच्या तिरंदाजांनीं अजून आपलीं धनुष्यें उपयोगांत आणली नव्हतीं. आतां मात्र त्यांनीं बाणांचा मारा चालविला. अगोदरच इंग्रज तिरंदाजींत सर्वोत्कृष्ट गणले जात होते, व आतां तर त्यांच्यापुढें फ्रेंच तिरंदाजांचा खरोखरच निभाव लागेना.

हें पाहून मागच्या घोडे स्वारांनीं पुढें येण्यासाठीं दौड केली, परंतु त्याचवेळीं तिरंदाज मागें धांवत असतां आपाल्याच लोकांचा घोड्यांच्या सपाट्यांत येऊन पुष्कळ जण मारले गेले. आतां घोडेस्वारांची पाळी आली. इंग्रंजांचे सव्वा सव्वा वार लांब तीर शत्रूंच्या टोपांवर व ढालींवर खाणखाण आपटूं लागले, व पुष्कळांचे प्राणही गेले. शेवटीं स्वारांची फळी मोडली, त्याबरोबर भालेवाले इंग्रज त्यांच्यावर तुटून पडले. ज्याप्रमाणें खडकावर आपटून एखादें जहाज अस्ताव्यस्त होऊन मागें पडतें, त्याप्रमाणें या मोठ्या घोडेस्वारांच्या सैन्याची दाणादाण होऊन तें मागें वळलें. नंतर इंग्रज तलवारवाल्यांनीं त्यांचा पाठलाग करतांच पळतां पळतां ते घोडेस्वार आपल्याच पायदळा-वर येऊन पडले, व त्यामुळें फ्रेंच सैन्यांत एकच धांवपळ व गर्दी होऊन गेली. मागाहून कापाकापी करीत इंग्रजांचें सर्व लष्कर

त्यांच्यावर तुटून पडले. या लढाईंत छत्तीस हजार फ्रेंच लोक मेले व शेवटीं फिलिपास जीव घेऊन पॅरिसकडे पळून जावें लागलें.

या लढाईचें नायकत्व एडवर्डच्या मोठ्या मुलाच्या हातीं होतें, व त्यामुळें या जयाचें बरेचसें श्रेय त्यास होतें. यावेळेपासून त्याच्यावर इंग्रज लोकांचें फार प्रेम बसलें. तो लढाईंत काळें चिलखत घालीत असल्यानें त्याचें श्याम युवराज (Black Prince) असें नांव पडलें होतें.

**कॅले शहराचा वेढा:**—आतां एडवर्डास कॅलेकडे जाण्यास कोणत्याहि तऱ्हेची भीति राहिली नाहीं. दुसऱ्या दिवशींच तो तिकडे जाण्यास निघाला. परंतु लोकांनीं दरवाजे बंद करून घेतल्यामुळें त्यास घेरा घालणें भाग पडलें. या वेढ्याचा एक वर्षपर्यंत कांहीं उपयोग झाला नाहीं व त्यामुळें एडवर्डास फार राग येऊन त्या गांवांतील एकही मनुष्य जिवंत न ठेवण्याचा त्यानें निश्चय केला. इतक्यांत शेवटीं दाणापाणी खुटलें व लोकांस शरण जाणें भाग पडलें. त्यावेळीं एडवर्डनें उत्तर दिलें कीं, तुमच्यापैकीं सहा अब्रूदार गृहस्थ गळ्यांत तोबरे बांधून व दांतीं तृण धरून मजकडे येतील व मीं त्यांस फांशीं द्यावें असें म्हटल्यास खुषीनें कबूल होतील, तरच मीं माझा निश्चय फिरवून दुसऱ्या लोकांस जिवंत सोडीन. हें ऐकून गांवांत हाहाःकार झाला. दुसऱ्यांसाठीं स्वतः मरण्यास कोण तयार होईल ? परंतु हरीचे लाल असे लोक आपण होऊन तयार झाले व एडवर्डकडे येऊन मरावयास उभे राहिले. हें पाहून इंग्र-

जांस देखील वाटलें कीं, अशा परदुःखनिवारण करणाऱ्यांस राजा माफी करील तर बरें. परंतु क्रोधांध एडवर्डनें कोणाचें ऐकलें नाहीं, व फांशींची तयारी करविली. चोहींकडे त्राहि भगवन् असें होऊन गेलें. परंतु चिडलेल्या राजास वारण्याची राणीशिवाय कोणाचीही ताकत चालली नाहीं. राणीनें त्याच्या पायां पडून त्याजकडून त्यांस जीवदान देवविलें. तिच्या अश्रुधारांनीं एडवर्डचा कोप निवाला, व त्यानें राणीचा मान राखून त्या सहाजणांस शेवटीं सोडलें. कॅलेंत एडवर्डनें इंग्रजांचीच वस्ती केली; व तेथील व्यापारउद्योगासाठीं असे कायदे केले कीं त्यामुळें त्या शहराची थोड्याच काळांत भरभराट झाली. नंतर कांहीं वर्षेंपर्यंत इंग्लंड व फ्रान्समधील लढाई दोन्हीपक्षांनीं जाणूनबुजून बंद ठेविली, कारण लढाईच्या खर्चामुळें दोन्ही देश अगदीं दरिद्री होण्याच्या बेतांत होते.

**पॅायटियरचें युद्ध** ( इ. स. १३६० ).—शांततेची मुदत संपतांच दोन्ही देशांच्या लढाईस पुन्हा सुरवात झाली. स्कॉट लोक पुष्कळ मस्त होऊन इंग्लंडवर उतरून येऊं लागले होते. या खेपेस एडवर्डनें लढाईची सर्व जबाबदारी आपला यशस्वी पुत्र श्याम युवराज यावर सोंपवून त्यास स्कॉट लोकांवर पाठविलें. यावेळीं देखील इंग्रजांनीं सुरवातीसच सपाटा चांगला दाखविला. श्याम युवराजानें दक्षिणेकडील प्रदेशावर हल्ला करून पुष्कळ मुलुख सर केला, व बोर्डो येथें राजधानी करून चहूंकडे लुटालूट आरंभिली. अशा तऱ्हेनें लुटालूट करून मागें फिरत असतां फ्रेंच

लोकांनीं येऊन त्यास घेरा घातला. फ्रेंच लष्कर ५० हजाराचें होतें, व श्याम युवराजाकडे फक्त आठ हजार लोक होते. त्यानें सर्व लूट परत देऊन लढाई बंद ठेवण्याची आपली इच्छा प्रदर्शीत केली. परंतु फ्रेंच राजानें तें मानलें नाहीं व युद्ध केल्याशिवाय सुटकाच नाहीं असें त्यास कळविलें. तेव्हां श्याम युवराजनें पॉयटिअर येथील रणभूमि पसंत केली. यावेळीं व्यूहरचना बहुतेक क्रेसीच्या युद्धासारखीच होती, व फळ देखील तसेंच मिळालें. फ्रेंच लोकांचा मोठा पराभव झाला इतकेंच नव्हे तर त्यांचा राजा जॉन पकडला गेला. त्यास पकडल्याची बातमी ऐकतांच श्याम युवराज सामोरा जाऊन त्यास मानसन्मानानें घेऊन आला; व जेवणाचे वेळीं त्याच्या खुर्चीजवळ उभा राहून हुजऱ्याप्रमाणें त्यानें त्याची सेवा केली. नंतर त्यास इंग्लंडास नेलें, तेथें एडवर्डनेंही त्याचा चांगला मान ठेविला. कैदी जॉन राजा या सर्व सन्मानास पात्रच होता. त्यानें यावेळीं जी खुबी दाखविली तशी आपल्या पौराणिक इतिहासाशिवाय कोठेंही पहाण्यांत येत नाहीं. जिंकलेला मुलुख व कांहीं रक्कम देण्याच्या अटीवर तो परत फ्रान्सांत गेला. हा करार लोकांनीं कबूल केला नाहीं, व ह्मणून तो सत्यवादी राजा आपण होऊन एडवर्डचा कैदी झाला. एडवर्डनें अशा अपूर्व प्रामाणिकपणाचें योग्य चीज केलें असतें, तर क्षत्रियांच्या मोठेपणाची ही गोष्ट फार रसिक झाली असती. त्यानें तर कांहीं तसें केलें नाहीं, उलट जॉनला मरेपर्यंत तुरुंगांत ठेविलें.

**शेवट परिणाम**:—या वेळीं स्पेनमध्यें कोणी महान जुलमी राजा होता. म्हणून त्याच्या रयतेनें त्यास चोप दिला, त्यामुळें त्यानें या दिग्विजयी श्याम युवराजाची मदत मागीतली. अशा अधर्मी मनुष्याचा पक्ष त्यानें धरला हें चांगलें केलें नाहीं, व शेवटी ईश्वरानें फळही तसेंच दिलें. त्यानें व्हिक्टोरियाच्या मैदानांत मोठा जय मिळविला, व बिचाऱ्या स्पेनच्या रयतेस परत त्या जुलमी राजास मान्य करणें भाग पडलें. परंतु त्या वेळेपासून श्याम युवराजास क्षयरोग लागला. या लढाईचा खर्च पुरा पाडण्यासाठीं फ्रेंच रयतेवर पुष्कळ जुलमी कर लादणें त्यास भाग पडलें. रोगामुळें श्याम युवराजास इंग्लंडास परत जावें लागलें. त्याच्यामागें जे सेनापति राहिले, त्यांचा फ्रेंच राजापुढें निभाव लागेना. एका मागून एक सर्व जिंकलेला मुलुख त्याच्या हातून गेला. शेवटीं इ. स. १३७४ त तह झाला तेव्हां इंग्रजांच्या हातांत फक्त तीनच गांवें राहिलीं—बोर्डो, बेयॉन व कॅले. सबंध आयुष्याची सर्व मेहेनत याप्रमाणें फुकट गेलेली पाहून एडवर्डास फार दुःख झालें, व त्यांतून राहिलेली बाकी पुरी करण्यासाठींच कीं काय, श्याम युवराज बरा न होतां शेवटीं मेला.

या मोठ्या लढाया चालविल्या होत्या पार्लमेंटच्या मंजुरीनेंच, तरी पण त्यांचा भार फार मोठा झाला, व आतां जेव्हां तो सर्व खर्च पाण्यांत गेला असें दिसलें, तेव्हां लोकांस फार वाईट वाटलें.

हें सर्व दुःख विसरण्यासाठीं राजानें म्हातारपणीं आपलें लक्ष्य चैनीकडे लाविलें. परंतु अंतःकरणातील खोल घाव असे कसे

बरे होतील ? शेवटीं इ. स. १३७७ त हा प्रतापी राजा ५१ वर्षे राज्य करून आपल्या वयाच्या ६५ व्या वर्षीं मरण पावला.

याच्या राज्यांत पार्लमेंटचे हक्क वाढले, व न्यायाचे कायदे सुधरले. त्या वेळच्या जनस्थितीचें वर्णन पुढें देण्याचा विचार असल्यानें याठिकाणीं त्या विषयीं कांहीं विशेष सांगत नाहीं.

**रिचर्ड दुसरा:**—गादीचा वारस श्याम युवराज तर या वेळीं मरून गेला होता, त्यामुळें त्याचा मुलगा रिचंड यास गादीवर बसविलें. त्याचें वय केवळ ११ वर्षांचें असल्यानें सर्व कारभार त्याच्या काकांच्या हातांत आला. मोठा झाला तेव्हां ही सत्ता परत मिळविण्यास त्यास फार प्रयास पडले, व पूर्णपणें तर ती त्यास कधींच मिळाली नाहीं. त्याच्यांत शहाणपणा वगैरे कांहींच नव्हतें, व एकदां जुलूम करूं लागला ह्मणजे तो मागें पुढें पहात नसे. या सगळ्याचा परिणाम असा झाला कीं, त्यानें राज्य गमाविलें व शेवटीं चमत्कारिक रितीनें त्याचा प्राणही गेला. त्याचा काका ड्यूक ऑफ लँकॅस्टर याचा मुलगा हेन्री यास त्यानें कांहीं कारणामुळें हद्दपार केलें होतें. त्या वेळीं त्यानें त्यास त्याच्या बापाच्या सर्व जहागिरी भोगण्यास देण्याचें कबूल केलें होतें. परंतु वेळ आली तेव्हां रिचर्ड टाळाटाळ करूं लागला. याच सुमारास आयर्लंडांत बंड उठलें होतें. ही संधी साधून हेन्री इंग्लंडांत आला व लगेच त्यास पुष्कळ सरदार मिळाले. ही बातमी लागतांच रिचर्ड आयर्लंडांतून परत वळला, परंतु सगळा देश आपल्या विरुद्ध उठलेला पाहून

तो भिऊन गेला, व लढाई शिवाय त्यास शरण जाणें भाग पडलें. पार्लमेंटनें त्यास पदच्यूत करून तुरुंगांत घालण्याचा हुकुम केला, व सर्वांनीं एकमतानें लॅंकॅस्टरवाल्या हेन्रीस गादी दिली. ( इ. स. १३७९ ). असें म्हणतात कीं रिचर्डच्या शत्रूंनीं त्यास तुरुंगांत कांहीं खाऊं न घालतां उपासमार करून त्याचा प्राण घेतला.

**वॉट टायलरचें बंड.**—हें बंड ही एक या कारकीर्दींतिल लक्ष्यांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. फ्रान्स व स्कॉटलंड बरोबर लढाया झाल्या त्यांत कांहीं लाभ न होतां सोळा वर्षांवरील सर्व स्त्री पुरुषांवर व्यक्तिशः मोठा कर बसविणें भाग पडलें. या वेळीं कर वसूल करण्याचें काम इजाऱ्यानें देण्याची इंग्लंडांत पद्धत होती; त्यामुळें देशांत चहूंकडे इजारदार लोक इतर लोकांस त्रास देऊं लागले होते, व म्हणून सगळा देश त्राहि त्राहि होऊन गेला होता. वॉट नांवाचा एक कौलें चाळणारा होता, त्याच्या मुलीस सोळा वर्षें होऊन गेलीं आहेत असें सांगून इजारदाराच्या माणसानें वॉटकडे कर मागितला. त्यानें सांगितलें कीं तिला अजून सोळा वर्षें झालीं नाहींत. त्यावरून तो चढेल माणूस त्या कुमारिकेस बेअदबीनें शिवला. हें पाहून वॉटच्या तळव्याची आग मस्तकास गेली, हातांतील हातोड्यानें त्यास त्यानें तेथेंच मारून टाकलें. गांवांतील सर्व लोक या वेळीं वॉटच्या पक्षास मिळाले व त्यांनीं सरकारच्या अशा जुलमाविरुद्ध उघड बंड करण्याचा निश्चय करून लंडनास जाण्याच्या इराद्यानें ते गांवाबाहेर पडले ते जसजसे पुढें चालले. तसतसे

गांवोगांवचे लोक येऊन त्यांस सामील होऊं लागले. जेव्हां ते लंडन जवळ पोहोंचले तेव्हां त्यांची संख्या एक लाखापर्यंत पोंचली होती. कोणाच्या हातांत तरवार, तर कोणाच्या हातांत पावडें; कोणाच्या हातांत कुऱ्हाड, तर कोणाच्या भाले; कोणाच्या तीरकमठे, तर कोणाच्या कोयत्याच अशी प्रत्येकाकडे हत्यारें होतीं. या प्रकारचें विलक्षण पण क्रोधांध सैन्य पाहून सरकारही विचारांत पडलें, व त्यास फुसलावून परत लाविण्याची तें युक्ति करूं लागलें. या सैन्याच्या नेत्यांस हकीगत सांगण्यास बोलाविलें असतां, वॉट राजासमोर इतक्या उद्धटपणानें बोलूं लागला कीं, बालराजाबरोबर लंडनचा मेयर वॉल्वर्थ होता त्यानें खंजीर मारून वॉटचा तेथेंच प्राण घेतला. हें पाहून त्या सर्व सैन्यांत एकच ओरड झाली. यावेळीं बाळराजानें जर असाधारण समयसूचकता दाखविली नसती तर त्याच्या राज्याचा त्याच वेळीं नाश झाला असता. तो लगेच घोडा पिटाळून त्यांच्याकडे गेला व त्यांस ह्मणाला “ या, तुमचा आगेवान पडला तर आजपासून मी तुमचा आगेवान होतों. चला, मी तुह्मांस न्याय देववितों, ” असें सांगून त्यानें त्यांस जवळच्या मैदानांत नेलें, तेथें बसवून त्यांस शांत केलें, व जी जी सूट ते मागत होते ती ती देण्याचें त्यानें वचन दिलें. अज्ञानी गांवढळ लोक भोळेच असतात. त्यांस वाटलें कीं राजा बोलतो आहे त्याप्रमाणें करीलच. परंतु त्या राजानें तर त्यांस अशा रीतीनें फसवून मागें फिरवून लगेच आपल्या तालुकदारांस :बोलाविलें,

व ते येतांच त्यांस बंडखोरांच्या मागें पाठवून त्या भोळ्या गांवढळांचा नाश करविला.

असें चातुर्य रिचर्डनें मोठेपणीं दुसऱ्या कोणत्याही वेळीं दाखविलें नाहीं, परंतु त्याचा मूळचा खोटेपणाचा व जुलमी स्वभाव शेवटपर्यंत तसाच राहिला व शेवटीं त्या मुळेंच तो मेला.

## प्रकरण १० वें.

### तेराव्या व चौदाव्या शतकांतील इंग्लंडची स्थिति.

**वर्णव्यवस्था.**—तेराव्या शतकाच्या आरंभीं इंग्लंडांत क्षत्रीय व शूद्र असे दोनच वर्ण होते असें म्हटलें तरी चालेल. क्षत्रीयवर्ग महाबलवान् व शूर होता. यावेळीं यूरोपांत प्रेमशौर्यभक्ति पूर्ण जोरांत चालत होती. तिच्या मदांत व तरंगांतच ते नेहमीं मग्न असत. युद्ध हाच ते आपला मुख्य धर्म समजत, व दुसरा कोणताही धंदा करणें हें त्यांस फार कमीपणाचें वाटे.

धंदेदार लोक, म्हणजे वस्तीचा बहुतेक भाग, शूद्रांत गणला जात असे, व त्यांची स्थिती गुलामगिरी पेक्षां किंचित् चांगली होती. जहागीर विकली कीं तिच्याबरोबर गुरांढोरांप्रमाणें शेतकरी लोक देखील नव्या धन्याच्या ताब्यांत जात, व जहागिरदार त्यांच्यावर जुलूम करण्यास बहुतेक मुखत्यार असत. बसाहती लोकांवर फार जुलुम होई. दुसरे व्यापारधंदे पुष्कळ जातींचे होते, पण ते करण्यास स्वस्थता नव्हती.

कित्येक शहरांतील सावकार धनाढ्य होते, व म्हणून त्यांस कांहीं मान होता. परंतु त्यांच्या हातांत सत्ता कांहीं नव्हती, व क्षत्रीयांस खुषी ठेवलें तरच त्यांस शांततेनें रहातां येई. यहुदी कितीही लक्षाधीश असला तरी त्यास अतिशूद्र गणीत, व त्याच्या-वर कोणीही कितीही जुलुम केला तरी त्याची कोणी दाद कीं फिर्याद घेत नसे. सारांश, या वेळीं सर्व प्रजा अत्यंत हीन अशा गुलामगिरींत होती व क्षत्रीयच सत्ताधारी होते. क्षत्रीयांत देखील जास्त जोर जहागिरदारांचा होता. ते राजास देखील क्वचितच गांठीत. त्यांच्याजवळ मोठमोठ्या लष्करी जहागिरी असल्यानें चुटकी वाजवितांच शेंकडो शिपाई त्यांच्या निशाणाकडे येऊन उभे रहात. असले पांच दहा सरदार एकत्र झाल्यास राजास देखील विचार पडे यांत काय नवल? या काळांत राजाकडे स्वतःचें लष्कर थोडेंच असे. या सरदारांचें सर्व लष्कर तेंच राजाचें मोठें लष्कर असे. त्यामुळें राजे सरदारांस आपल्या भावांप्रमाणें मानीत, व कित्येक तर खरोखरच त्यांचे भाऊ असत. राजाचें एखादें काम त्यानें या सरदारांस खूष ठेविलें तरच होत असे. क्वचित् एखादा राजा आडमार्गानें जाऊं लागला तर हे क्षत्रिय बच्चे एकदम हत्यार घेऊन उठत, व त्यावेळीं ते कसा पराक्रम करीत हें तुम्ही मागें दोनशें वर्षांचा वृत्तांत वाचला त्यावरून तुमच्या पूर्णपणें लक्ष्यांत आलेंच असेल.

ज्यांच्याकडे मोठ्या जहागिरी नसत, त्यांस नाईट (Knight

ह्मणत. ते देखील जातीचे क्षत्रीय असून मूळचे जहागिरदारांच्या इतके अधिकारी होते, परंतु त्यांचा अधिकार हळू हळू कमी होत गेला होता; कारण स्वतः आपल्या लहानशा जहागिरीवर देखरेख केली तरच गुजारा होईल अशी त्यांची स्थिती असल्यानें घटके घटकेस लढणें किंवा राज्यकारभारांत डोकें घालण्यासाठीं लंडनास धांवत जाणें हें त्यांस परवडत नसे. पार्लमेंटांत बोलाविलें तरी ते क्वचितच जात; व त्यामुळें तेराव्या शतकाच्या आरंभीं त्यांस कोणतेही हक्क नसल्यासारखेच होते. तरी पण त्यांनीं आपलें क्षत्रीयत्व सोडलें नव्हतें. शस्त्रास्त्रांत ते बरेच कुशल होते. प्रसंग पडल्यास हत्यार धरणें हें ते आपलें कर्तव्य समजत. यामुळें राज्यांत त्यांस अजूनही कांहीं मान होता खरा तो मान कशा रितीनें वाढला व या नाइटस्‌मधून पुढें जो गृहस्थवर्ग उभा झाला त्याची सत्ता देशांत कशा तऱ्हेनें सर्व प्रकारें वाढली तें तुम्ही इंग्लंडचा इतिहास जसजसा पुढें वाचीत जाल तसतसें तुम्हांस समजेल.

**प्रजेच्या सत्तेचा उदय व वृद्धि.**—वर जें सांगितलें त्यावरून तुम्हांस समजलेंच असेल कीं तेराव्या शतकाच्या आरंभीं इंग्लंडांतील पुष्कळ लोक सत्तारहित होते. थोडेसे लष्करी जमीनदार असेही होते कीं ते राजास देखील धाब्यावर बसवीत. यावेळच्या यूरोपांतील दुसऱ्या देशांकडे पाहिल्यास दिसून येईल कीं, असले जमीनदार केव्हांच आपल्या राजांशीं भांडून स्वतंत्र झाले असते. जॉन, तिसरा हेन्री, दुसरा एडवर्ड व दुसरा रिचर्ड या

राजांच्या राज्यांत इकडील जमीनदारांनीं देखील बरीच हालचाल केली, परंतु विजयी उइल्यमच्या फ्यूडल सिस्टिमच्या योगानें त्यांस केव्हांही राज्य तोडून स्वतंत्र तालुके स्थापन करतां आले नाहींत. इंग्लंडच्या तालुकदारांस असें आपल्या हातून कधींही होणार नाहीं हें प्रथम पासूनच माहीत होतें व म्हणून स्वतंत्र होण्याची उमेद राखण्याऐवजीं ते आपापसांत संप करून राजास नेहमीं दाबांत ठेवण्याचा प्रयत्न करीत.

नॉर्मन तालुकदार मुळचेच शहाणे होते. आपल्या जातीचा जम इंग्लंडांत पूर्णपणें बसेपर्यंत ते पूर्ण राजानिष्ठ होते. जेव्हां गादीसाठीं राजपुत्रांत भांडणें होत, त्या वेळीं ते खरा किंवा खोटा कोणताच पक्ष न घेतां कसेंही करून लढाया मिटवीत. शांततेच्या काळीं देखील एक राजा मरेल तेव्हांच दुसरा गादीवर बसूं शकेल अशी ते तजवीज करीत. असें करण्यांत नॉर्मन राज्याचे तुकडे पडूं नयेत हा त्यांचा हेतु असे. शिवाय गादीसाठीं राजपुत्रांनीं भांडून मरूं नये ह्मणून त्यांनीं वंशपरंपरेचा ह्मणजे एक राजा मेल्यास त्याच्या मागून त्याचा मोठा मुलगा अगर त्या मुलाचा मुलगाच गादीवर बसावा असा परिपाठ पाडला. तिसऱ्या हेन्रीच्या कारकीर्दींत इतके तंटे झाले होते, तरी पण तो मेला तेव्हां त्याचा वडील मुलगा पॅलेस्टाईनमध्यें असूनही लोकांनीं त्याच्याच नांवाची द्वाही फिरविली.

ह्या नॉर्मन जमीनदारांस इंग्लंडांत येतांच असें दिसून

आलें कीं राजाच्या जुलुमाच्या आड येणारे व लोकांचें स्वातंत्र्य राखणारे असे कायदे मागील राज्यांत चांगले घडविले होते. ते अमलांत आणण्याची शक्ति अँग्लो सॅक्सनांतून गेली होती, व ह्मणूनच त्यांचें राज्य मोडून त्याचे तुकडे तुकडे झाले होते. नॉर्मन लोक शहाणे, एकमताचे व शूर होते. त्यांनीं पहिल्या हेन्रीच्या वेळेपासूनच राजाकडून कायद्याप्रमाणें वागण्याचें वचन घेण्यास सुरुवात केली होती. व तेराव्या शतकाच्या आरंभास तर जॉन राजाकडून मॅग्नाचार्टा लिहवून इंग्लंडच्या प्रजेच्या हक्काची जबर कबुलायत करून घेतली.

हा मॅग्नाचार्टा मिळविण्याचा मान या जहागिरदारांसच आहे. त्यांत दुसऱ्या लोकांचा भाग मुळींच नव्हता, अथवा असला तरी पुष्कळ थोडा होता. त्या करारनाम्यांत सर्व प्रजेचे हक्क पुष्कळ अंशीं मंजूर झाले, परंतु राजसत्तेंत दुसऱ्या लोकांस त्यानें कांहीं फायदा झाला नाहीं. त्यांत महाजनांची संमति घेण्याचें लिहिलें होतें; परंतु महाजनांच्या सभेंत जहागिरदारांशिवाय दुसऱ्या कोणत्याही लोकांस जाण्याचा अद्याप अधिकार नव्हता. प्रजेनें पसंत केलेले त्यांचे प्रतिनिधि येतील, तेव्हांच ते देशांचे महाजन समजले जातील, हें जें हल्लींच्या पार्लमेंटचें मुख्य लक्षण आहे, तें अजून कोणाच्या ध्यानांत आलें नव्हतें. परंतु तें जंगी काम करण्यास देखील इंग्लंडास फार वेळ लागला नाहीं. इ. स. १२६५ त सायमन डि मॉन्टफर्टच्या मार्फत हे अमूल्य

हक्क इंग्रजी प्रजेस मिळाले. त्यावेळेपासून पुष्कळ मोठमोठ्या शहरचे लोक आपले प्रतिनिधि पार्लमेंटांत पाठवूं लागले, व यावेळेपासूनच खरें पार्लमेंट इग्लंडांत सुरू झालें असें समजलें जातें. राजे व जहागिरदार यांच्या भांडणामुळें पार्लमेंटास पुष्कळ फायदा झाला. दोन्ही पक्षांच्या लोकांस असें वाटे कीं नाइट लोक आपल्या बाजूस आल्यास बरें. त्यांत जहागिरदार तर विशेषतः त्यांचेंच सहाय्य पहात, कारण ते एकटे राजाबरोबर टक्कर देतील असे यूरोपच्या तालुकदारांइतके बळवान् नव्हते. राजांस देखील जेव्हां पैशांची जरूर पडे, व जहागिरदार त्यांच्या विरुद्ध असत, तेव्हां ते पार्लमेंटास खूष राखीत.

प्रथम तर जहागिरदारांबरोबरच प्रजेचे प्रतिनिधि पार्लमेंटांत बसत, पण इ. स. १३१२ पासून १३४१ पर्यंत ते निरनिराळे बसूं लागले, व तेव्हांपासून "सरदारांची सभा–(हाउस ऑफ लॉर्ड्स्)" व "सामान्य लोकांची सभा–(हाउस ऑफ कॉमन्स)" हीं नांवें पडलीं. हाउस ऑफ कॉमन्स मध्यें 'स्पीकर'–ह्मणजे अध्यक्षासारखा उपरी निवडण्याची पद्धत इ. स. १३७७ पासून पडली.

तिसऱ्या एडवर्ड राजानें पार्लमेंटच्या मंजुरीशिवाय कर वसूल करण्याची पुष्कळ खटपट केली, व तो एवढा पराक्रमी होता तरी त्यास पार्लमेंटास पावलोपावलीं नमावें लागलें. हाऊस ऑफ कॉमन्स मधील लोक जहागिरदारांप्रमाणें लढण्यास निघत नसत; परंतु जेव्हां राजा त्यांस धाब्यावर बसवी तेव्हां ते त्याचें म्हणणें कायद्या-

विरुद्ध असल्याचें ठरवीत, व वारंवार अर्ज करीत असत. एखाद्या अडलेल्या प्रसंगीं तर ते असा हट्ट घेऊन बसत कीं आमची अमुक अमुक फिर्याद जर तुम्ही ऐकिली नाहीं, तर आम्ही कर मंजूर करणारच नाहीं. कर मंजूर करते वेळीं ते इतक्या पंचायती करीत इतकेंच नव्हे, तर दिलेले पैसे कसे वापरले जात याचा देखील ते तिसऱ्या एडवर्डच्या वेळेपासून हिशोब विचारूं लागले. या राजाच्या कारकीर्दीच्या शेवटच्या भागांत जे कायदे राजानें केले त्यांच्या डोक्यावर असें लिहिलें आहे कीं हे कायदे सरदार व हाऊस ऑफ कॉमन्स यांच्या संमतीनेंच केले आहेत. शिवाय राजा वेडावांकडा वागूं लागल्यास त्यास ठपका देण्या-ऐवजीं कारभाऱ्यांस बदलण्याचा रिवाज बंद करून प्रधानास काढून टाकण्याचा आग्रह सरदारांचा मूळपासूनच होता; मागाहून हाऊस ऑफ कॉमन्सचे लोकांनीं तोच कित्ता वळविला, व ती पद्धत त्यांनीं बरीच स्वीकारली. बंड करण्याऐवजीं पैशांची मंजुरीच ते देत नसत, व असें झालें म्हणजे शेवटीं राजास त्यांचें म्हणणें कबूल करावें लागे. एखादेवेळीं राजा जरा जोरदार व हेकेखोर असला म्हणजे पार्लमेंटची मागणी रद्द देखील होत असे. पण पार्लमेंट-मधील लोक पुन्हा संधी साधून आपला हेतु तडीस नेत तेव्हांच स्वस्थ बसत. पार्लमेंटनें वेळोवेळीं कसे हक्क मिळविले आहेत तें पहातां मध्यम वर्गांतील इंग्रज किती अट्टाहासी आहेत तें बरोबर दिसेल.

चौदाव्या शतकाच्या शेवटीं पार्लमेंटची सत्ता वाढून वाढून

इतकी झाली होती. अजून ती जहागिरदारांच्या सत्तेच्या तेजाखालीं झांकून जात होती ही गोष्ट खरी. पुष्कळ वेळ पार्लमेंट राजा किंवा बंडखोर तालुकदारांच्याच म्हणण्यास होकार देत असे. दुसरा एडवर्ड व दुसरा रिचर्ड यांस पदच्यूत केलें हें या मदोन्मत्त जमीनदारांचेंच कर्म होतें; पार्लमेंटचें त्यांत उगीच नांव गोंविलें होतें. पण निदान नांवास तरी राजास पार्लमटास विचारावें लागे, किंवा नुसत्या नांवाच्या मंजुरी शिवाय देखील त्याच्यानें कांहीं होत नसे. हा तुम्ही पार्लमटास लहान सहान अधिकार होता असें समजूं नका. यावरून स्पष्ट दिसून येते कीं, पार्लमेंट सर्वांत वरिष्ठ आहे हें मत तर तेव्हांपासूनच इंग्लंडांत स्थापन होतें. अशा रीतीनें मध्यम वर्गांतील लोकांची सत्ता राज्यांत उत्पन्न झाली व वाढली. हा वर्ग अजून लहान होता. धंदेदार व शेतकरी लोकांच्या स्थितींत कांहीं सुधारणा झाली होती, तरी पण त्यांच्यावरील जुलुम व शूद्रता ( ज्यास व्हिलनेज Villeinage म्हणतात ) हीं अजून दूर झालीं नव्हतीं. ते महादुःखी होते. वॉट टायलरचें बंड हा एक त्याचाच परिणाम होता. शूद्र लोक स्वतःच्या हक्कासाठीं भांडण्यास उठल्याचें इंग्लंडच्या इतिहासांत पहिलें उदाहरण हेंच आहे. दोनशें वर्षांपासून देशांत हक्कांविषयीं जहागिरदार व वाईट लोक ओरड करून राहिले होते, व त्यासाठीं निरंतर हत्यारें झळकत होतीं, तर त्याचा परिणाम थोडातरी या लोकांवर झाल्याशिवाय कसा राहील ? ते देखील स्वातंत्र्याची

किंमत ओळखूं लागले होते. अजून जबरदस्त जहागिरदारांपुढें मध्ययमवर्गाचेंच पुरेंसें चालत नव्हतें, तर या बिचाऱ्या अज्ञान शूद्र जाती काय करणार ? तरीपण या बंडाच्या वेळीं त्यांची ओरड हीच होती कीं, सर्व माणसें सारखींच आहेत, असें असतां हा उच्चनीच भेद कोठून उद्भवला ? "ज्यावेळीं ॲडामनें स्वतः हातांत नांगर धरला, व इव्हनें चरकीवर सूत कांतलें त्यावेळीं हा गृहस्थ वर्ग कोठें होता ?" अशा अर्थाचा दोहरा ते ठिकठिकाणीं बडबडत फिरत. शारिरीक मेहनत करूं नये व जो करील तो नीच असा अभिमान जो गृहस्थ वर्गांत होता त्यावर हा कडक टोमणा होता.

**विद्या व धर्माची स्थिती आणि त्यांत सुधारणा**— लोक फार संशयी व धर्मांध होते. ख्रिस्ती धर्म सर्व ठिकाणीं चाले. त्याचा धर्मगुरु रोममध्यें राही, व त्याची सत्ता सर्व ठिकाणच्या मोठमोठ्या राजांसही कांपवी. जॉनच्या वेळीं इंग्लंडवर त्यानें खंडणी बसविली हें तर आपण मागें सांगितलेंच आहे. परंतु ही खंडणी धर्मगुरूंस फार दिवस मिळाली नाहीं, कारण लोकांस ती देणें पसंत नव्हतें. जॉनच्या मागून क्वचितच कोणी राजानें खंडणी भरली, आणि तिसऱ्या एडवर्डच्या राज्यांत तर पार्लमेंटनें कायदा करून खंडणी देणें बंद करून टाकलें. त्याच राज्याच्या उत्तर भागांत असा कायदा झाला कीं राज्यासंबंधीं धर्मगुरूंचें फरमान ( Papal Buli ) कोणीही देशांत करूं नये. धर्मगुरूच्या गुणदोषांवर लोक चर्चा करूं लागले होते, कारण राजकीय बाबतींबरोबरच धार्मिक बाबतींत

लोकांची स्वतंत्र्यबुद्धि जागी होऊं लागली होती. धार्मिक सुधारणेविषयीं पहिली ओरड याच वेळीं विक्लीफ नामक साधूनें केली, आणि त्याचें म्हणणें शंभर वर्षांनंतर धर्मसुधारकांनीं जी गोष्ट केली त्यापेक्षां देखील जास्त चोख व धैर्याचें होतें. त्यानें बायबलचें भाषांतर इंग्रजी भाषेंत प्रथमच केलें. हा त्याचा मोठा पराक्रम होय. कारण त्यावेळीं सर्व धर्मकृत्यें लॅटिन भाषेंतच होत असत, आणि धार्मिक पुस्तकांचें देशी भाषेंत भाषांतर करणें हें महत्पाप होय अशी पाद्र्यांनीं सर्वांची समजूत करून दिली होती. पाद्री लोक यावेळीं पुष्कळ लोभी, लुच्चे, ठक व विषयासक्त होऊन गेले होते. विद्या तर या काळपर्यंत देशांत थोडीच होती. प्रथम कोणास लिहितां वाचतां देखील येत नव्हतें, आणि राजे व तालुकदार आपल्या नांवाची मोहोर कारून ठेवून जरूर पडे त्यावेळीं सहीच्या ठिकाणीं तिचा छाप मारीत. पहिला हेन्री थोडासा शिकलेला होता. तें त्यावेळच्या लोकांस इतकें आश्चर्यकारक वाटलें कीं, त्यास "विद्वान् हेन्री" असें टोपणनांव पडलें. त्यावेळीं जी थोडी विद्या होती, ती साधूंच्या मठांतच होती; तरी देखील कोणाही साधूस पंडित व्हावयाचें असल्यास त्यास इताली किंवा फ्रान्समधील पाठशाळेत जावें लागे.

चौदाव्या शतकांत उच्च वर्गांतील लोकांस विद्येची गोडी लागूं लागली. गेल्या शतकांत देशभाषा इंग्रजी झाली होती तिची आतां मशागत होऊं लागली. तिसऱ्या एडवर्डच्या राज्यांत दोन

उत्कृष्ट पुस्तकें रचलीं गेलीं, आणि इंग्रजी भाषेच्या सुधारणेचा पाया घातला गेला. एक वर सांगितलेलें विक्लिफनें केलेलें बायबलचें भाषांतर व दुसरें चॉसर कवीचें काव्य. या कवीची गणना आज देखील इंग्रची भाषेच्या सर्वोत्तम कवींत होत आहे, आणि त्याचें काव्य लोक प्रेमानें शिकतात. याच राज्यांत सरकारी कागदपत्रांतून फ्रेंच भाषा जाऊन इंग्रजी वापरण्यांत येऊं लागली. लॅटिन भाषेचा अभ्यास वाढला. रोजर बेकन नांवाच्या एका साधूनें पदार्थविज्ञानाकडे आपलें लक्ष्य लाविलें, आणि असें सांगतात कीं, मागाहून निरनिराळ्या शतकांत जे शोध लागले ते सर्व त्यानेंही लावले होते; परंतु आसपासच्या गाढ अंधःकारामुळें ते प्रगट होऊं शकले नाहींत, व उलट धर्मांध लोकांकडून त्यास पुष्कळ दुःख सोसावें लागलें. त्याच्याविषयीं असेंही सांगतात कीं, वाफेच्या यंत्राचा एक नमुना देखील त्यानें बनविला होता.

---

# भाग ३ रा.

## पंधरावें व सोळावें शतक.

## प्रकरण ११ वें.

### लँकॅस्टर व यॉर्क कुळाचे राजे.

इ. स. १३९९ पासून इ. स. १४८५ पर्यंत.

**लँकॅस्टर कुळाचे राजे.**—इंग्रजांच्या इतिहासांत हक्काशिवाय गादी पचविण्याचें हें पहिलेंच उदाहरण होय. दुसऱ्या

एडवर्डास जुलमानें पदभ्रष्ट केला होता, परंतु त्याच्यामागून त्याच्या मुलास गादीवर बसविल्यामुळें कांहीं विशेष अन्याय वाटला नाहीं. दुसऱ्या रिचर्डास मूल तर नव्हतें, पण त्याच्या मागून हेन्रीचा हक्क होता असें मात्र ह्मणतां येणार नाहीं. आतां तो गादीवर बसला तरी कोणीं बोललें नाहीं, व पुढेंही ५०–६० वर्षें गादी त्याच्या कुळांत राहिली. परंतु नंतर मोठा तंटा झाला व देशांत पुष्कळ वर्षेंपर्यंत मोठी कापाकापी चालली. ह्मणून या ठिकाणींच त्याचा व त्याच्या विरूद्ध पक्षाचा इंग्लंडच्या राज्यावर किती हक्क होता हें आपण पाहूं.

**वंशावळी.**—लँकॅस्टरचा ड्यूक हेन्री, जो आतां गादीवर बसला होता तो तिसऱ्या एडवर्डच्या चौथ्या मुलाचा मुलगा होता. पहिल्या व दुसऱ्या मुलाचा तर आतां कांहीं वंश राहिला नव्हता, त्यामुळें त्यांच्या तर्फेची कांहीं हरकत नव्हती, पण तिसरा मुलगा क्लेअरन्सचा ड्यूक याची एक मुलगी मार्चच्या डयूकशीं लग्न झालेली असून तिच्या मुलाचा मुलगा यावेळीं हयात होता. परंतु त्यानें गादीवर आपला हक्क सांगितला नाहीं, व तो निर्वंश मरून गेला. पण त्याची बहीण ॲन हिचें यॉर्क कुळांत लग्न झालें होतें आणि तिच्यातर्फे ते लोक मागाहून राज्याविषयीं भांडावयास सरसावले. बाकी यॉर्क कुळांतील ठाकूर हे स्वतः तर एडवर्डच्या पांचव्या मुलाच्या वंशांतील होते, परंतु तिसऱ्या मुलातर्फेचा हा हक्क व तीन कुळांची दौलत आणि सत्ता मिळाल्या-

मुळें पुढें ते फार बळवान् झाले.

**चौथा हेन्री.**–हक्काशिवाय गादीवर बसणाऱ्याच्या राज्यांत बंड फितूर होतातच त्याप्रमाणें या राज्यांत झालें. परंतु हेन्रीनें तीं शौर्यानें व चातुर्यानें शमविलीं. ह्या राज्यांत याशिवाय विशेष कांहीं जाणण्याजोगें नाहीं.

**पांचवा हेन्री.**—लहानपणीं या राजानें जेवढें नांव घालविलें तेवढें त्यानें गादीवर बसतांच मिळविलें. असें सांगतात कीं, बापाच्यावेळीं तो लुच्चे, लफंगे व दुष्ट लोकांच्या संगतींत असे. एकवेळ त्याचा कोणी जुगारी साथीदार गुन्ह्यांत सांपडला, त्यावेळीं त्यास सोडविण्यास तो स्वतः कोर्टांत गेला, व आपली शिफारस ऐकली नाहीं ह्मणून त्यानें न्यायाधिशाच्या एका थोबाडींत लगाविली. त्या न्यायाधिशानें लगेच सांगितलें कीं, " युवराज, मी आपल्या वडिलांनीं दिलेला अधिकार बजावीत आहें. त्यामुळें आपण हा माझा अपमान केला नसून खुद्द महाराजांचा केला आहे, व यासाठीं आपणही आपल्या साथीदाराबरोबर तुरुंगांत चला. " राजपुत्र समजला व लगेच तो एक दिवस तुरुंगांत गेला. ही हकीगत जेव्हां त्याच्या बापास समजली तेव्हां त्यास फार हर्ष झाला. व तो म्हणाला कीं, " धन्य माझें नशीब कीं मला असला धीट न्यायाधीश मिळाला आहे. त्याहूनही माझें नशीब जास्त धन्य म्हणावयाचें कीं माझा मुलगा कायद्यास इतका मान देतो. " ह्या अमर कीर्तिवाल्या न्यायाधिशाचें नांव गॅस्कोइन असें होतें.

आपल्या देशांत असले अंमलदार, राजपुत्र, किंवा राजे सध्यांचे काळीं कोणत्या ठिकाणीं मिळतील ?

गादीवर बसतांच या राजानें आपली वर्तणूक एकदम सुधरली. जुन्या अंमलदारांस सन्मानानें कायम ठेविलें, व स्वतःच्या ऐटबाज मित्रांस एकांतांत बोलाऊन सांगितलें कीं " जा, जोंपर्यंत तुम्ही आपली वर्तणूक सुधारणार नाहीं, तोंपर्यंत मला तुमचें तोंड दाखवूं नका. त्या दरम्यान तुमची उपासमार होऊं नये ह्मणून ही थोडी वाटखर्ची देत आहें ती घेऊन जा, " असें सांगून त्यांस घालवून देऊन आपण शहाणपणानें व निःपक्षपातानें राज्य चालवूं लागला.

तिसऱ्या एडवर्डच्या वेळेपासून फ्रान्सबरोवर जी लढाई सुरू झाली होती ती अजून शांत झाली नव्हती. लढून लढून दोन्ही पक्षाचे लोक थकले ह्मणजे लढाई ढिली पडे व अशाप्रमाणें वर्षेंचीं वर्षें जात; परंतु लढाई चालूच आहे जसें समजलें जाई. फ्रान्सचा राजा याबेळीं वेडा झालेला असल्यानें राज्यांत यावेळीं दोन पक्ष झालेले असून त्यांच्या परस्परांशीं मारामाऱ्या चालल्या होत्या. ह्या भांडण्याचा लाभ घेऊन हेन्रीनें फ्रान्सवर स्वारी केली. एजिन-कोर्टच्या मैदानांत दोन्ही लष्करांची भेट झाली (इ. स. १४१५), आणि फ्रेंच लोकांनीं पूर्वीप्रमाणेंच आपल्या मिजाशींत राहून आपला पराभव करून घेतला.

दोन वर्षें मध्यंतरीं कोरडी जाऊं देऊन जेव्हां हेन्रीनें फ्रेंच

लोक आपापसांत लढून अगदीं निःशक्त झाले आहेत असें पाहिलें, तेव्हां त्यानें फ्रान्सवर दुसरी स्वारी केली. पॅरिसमध्यें जातांच फ्रान्सच्या निर्बळ राजानें त्यास आपल्या तारकासारखा मानला. त्यानें आपल्या मुलीचें हेन्रीशीं लग्न लाविलें व त्यास फ्रान्सचा राजरक्षक बनविलें व मागाहून त्यास राजा मानण्याचें सर्वांनीं कबूल केलें. ( इ. स. १४१७ ). आतां तर हेन्रीनें पॅरिसच आपली राजधानी केली. पैशाची जरूर पडल्यास तो इंग्लंडास येई, नाहीं तर तेथेंच राही. तेथें त्यास एक मुलगा झाला. अशा तऱ्हेनें लवकरच इंग्लंड एक उपराज्य होण्याच्या तयारींत होतें, परंतु ईश्वराची इच्छा तशी नव्हती. तो एकाएकीं आजारी पडला, व त्यास वाटलें कीं, आपण आतां जास्त दिवस जगणार नाहीं. तेव्हां त्या शहाण्या राजानें राजपुत्र मोठा होईपर्यंत आपला एक भाऊ बेडफर्ड यास फ्रान्सचा व दुसरा भाऊ ग्लस्टर यास इंग्लंडचा राज्यरक्षक नेमिलें. अशा रीतीनें राज्याचा बंदोबस्त करून ३५ वर्षांच्या लहान वयांत अपूर्व कीर्ति मिळवून इ. स. १४२२ त त्यानें आपला देह सोडला.

**सहावा हेन्री**—यावेळीं फ्रान्सचें राज्य इतकें पूर्ण हस्तगत झालें होतें कीं महिन्याभरानें चार्ल्स राजा मेला तेव्हां, लहान हेन्रीस फ्रान्सचा राज्याभिषेक झाला. त्याचें वय यावेळीं पुरतें बारा महिन्याचें देखील नव्हतें, पण बेडफर्ड शहाणा व पराक्रमी पुरुष होता. फ्रान्सच्या मयत राजाच्या मुलानें सातवा चार्ल्स हें नांव

धारण करून जें तुफान माजविलें होतें त्याचा काळजीपूर्वक पिच्छा पुरविला. सात वर्षेंपर्यंत बेडफर्ड त्याच्या इतका मागें लागला होता कीं, आतां त्यास शरण जाणें चार्ल्सला भाग पडेल असें सर्वांस वाटलें. परंतु इतक्यांत जोन ऑफ् आर्क नांवाच्या एका तरुण कुमारिकेनें पुढें येऊन सर्व रंग फिरवून टाकला. ती बाई एका गरीब शेतकऱ्याची मुलगी होती. परक्या लोकांचा अंमल पाहून तिचें अंतकरण इतकें विदीर्ण झालें कीं शेवटीं तिचें मस्तक फिरून गेलें. तिला दैवी साक्षात्कार घडूं लागले. " तूं ऊठ, व चार्ल्सला राज्याभिषेक कर " असे शब्द रोज तिच्या कानांत घुमूं लागले व शेवटीं तिनें चार्ल्सकडे जाऊन त्यास सांगितलें कीं, " अमक्या एका देवळांत अशा अशा तऱ्हेची एक तरवार लटकत आहे ती मला दे व मग मी तुझ्या थोड्याशा लष्करासह जाऊन जय मिळवून येतें. " नंतर ती पुरुषाचा पोषाख करून सोनेरी खोगिराच्या सुंदर घोड्यावर स्वार झाली व एका हातांत तरवार व दुसऱ्या हातांत पवित्र निशाण घेऊन थोड्याशा लष्करासह ऑर्लीयन्स शहरास जेथें इंग्रजांनीं वेढा घातला होता तेथें धांवत जाऊन पोंचली. ( इ. स. १४२९ ). इंग्रजांनीं भिऊन तिला रस्ता दिला, आणि शहरांत जाऊन तिनें किल्लेदारास विचारलें कीं, " तुम्ही पहात काय राहिलां ? मजबरोबर इंग्रजांशीं लढण्यास चला. " अशा तऱ्हेनें उत्तेजित झालेल्या या जोरदार टोळीशीं इंग्रजांचा निभाव लागला नाहीं, व घेरा उठवून ते पळून गेले. यापुढें त्या

बाईचें ऑर्लियन्सची कुमारिका असें नांव पडलें. तिनें चार्लसला रीम्स शहरांत नेऊन नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें राज्याभिषेक केला, व नंतर म्हणाली कीं, मी माझें काम पुरें केलें आहे, आतां मला परत जाऊं द्या. परंतु जिच्या प्रतापामुळें एवढी सरशी झाली तिला आतां कोण जाऊं देणार ? यानंतर पुष्कळ लढाया झाल्या, त्या सर्वांत इंग्रज हरले, आणि इंग्लंडहून अचानक मदत येऊन पोंचली नसती, तर बेडफर्ड कितीही शूर असता तरी पण त्यास पॅरीस सोडून पळून जावें लागलें असतें. ह्या नव्या लष्करामुळें इंग्रजी पक्षानें कांहीं वेळ टिकाव धरला. दैवयोगानें ती कुमारिका त्यांच्या हातीं पडली व तिला त्यांनीं डाकीण समजून क्रूरतेनें जिवंत जाळून मारली. ( इ. स. १४३१ ). परंतु या रतेचा शेवट मात्र भलताच झाला. तमाम फ्रेंच लोकांस खून चढला, व आपसांतले भेदभाव बाजूस ठेवून स्वदेशाभिमानानें प्रेरित होऊन सर्व लहान थोर फ्रेंच लोक इंग्रजांविरुद्ध इतक्या जोरानें उठले कीं इंग्रजांचा त्यांच्यापुढें निभाव लागला नाहीं. इतक्यांत शहाणा व शूर बेडफर्ड मरण पावला. (इ. स. १४३५). आतां एकामागून एक इंग्रजांच्या हातून मुलूख जाऊं लागले, व. इ. स. १४५१ त कॅलेशहराशिवाय त्यांच्याकडे फ्रान्समध्यें कांहीं सुद्धां राहिलें नाहीं.

याप्रमाणें इंग्रजांच्या हातांत आलेलें फ्रान्सचें राज्य सपाट्यानें परत गेलें. त्याचें एक कारण हें होतें कीं इंग्रडच्या राज्यकारभा-

रांत पुष्कळ तंटे भांडणें उपस्थित झालीं होतीं. पांचव्या हेन्रीनें नुसत्या ग्लस्टरलाच राजरक्षक नेमिलें होतें. परंतु पार्लमेंटनें त्याच्या-बरोबर त्याच्या चुलता बोफर्ट यास सामील केलें. बोफर्ट जबरदस्त पण महालुच्चा व खटपटी होता. या दोन्ही राजरक्षकांत मूळपासून बेबनाव होता व पुढें त्यांचें वैर इतकें वाढलें कीं ते एकमेकावर राजद्रोहाचा आरोप ठेवून एकमेकाचा जीव घेण्यास तयार झाले होते राजा मोठा झाला, परंतु त्याच्यांत कांहीं अर्थ नव्हता. त्याची राणी मार्गरेट महा हट्टी व भांडखोर होती. ती एका पक्षास सामील झाली, व दोन्ही पक्षाचे लोक एकमेकांस मारून टाकण्याच्या मसलती रात्रंदिवस करूं लागले. शेवटीं ग्लस्टरास विरुद्धपक्षानें कैद केलें व तेथें त्यास कोणी मारून टाकलें. हें पाहून दुसऱ्या सरदारांस आपले जीवित येथें सुरक्षीत नाहीं असें वाटूं लागलें, कारण राजांत तर कांहीं राम नव्हता, आणि बलवान्पक्ष आपल्या शत्रूवर राजद्रो-हाचा आरोप ठेवून त्याचा प्राण घेण्यास कांहीं उशीर लावीत नव्हता. राजाच्या डोक्यावर कर्जाचा फार भार झाला होता, व त्यामुळें पार्लमेंट देखील फार ओरड करून राहिलें होतें. कांहीं लोकांनीं तर एका परगण्यांत बंड करण्याचीही तयारी चालविली होती.

**गुलाबाच्या लढाया.**—अशी संधी पाहून यॉर्कच्या ड्यूकनें विचार केला कीं राज्यावर खरा हक्क माझा आहे. त्यानें गेल्या

राज्यांत निमकहलालीनें नोकरी बजावली होती, आणि या राज्यांत देखील फ्रान्सांत तो पुष्कळ बहादुरीनें लढला होता. परंतु आतां या राजाचें तट्टू फार दिवस चालणार नाहीं, व मी मेहेनत करतों ती सर्व फुकट जाते असें त्याच्या मनांत आलें; तरी पण प्रथम त्यानें राज्यसुधारणेचीच मागणी केली व तीही लष्करास व नागव्या तरवारीनेंच. यावेळीं त्यास कांहीं साधलें नाहीं, व त्यास परत आपल्या तालुक्यांत जाणें भाग पडलें. इतक्यांत दैवयोगानें राजास वेड लागलें, व त्यामुळें पार्लमेंटास समजावून, व मार्गरेट राणी नको म्हणत असतांही त्यानें राज्याकारभार आपल्या हातीं घेतला. (इ. स. १४५४). मागच्या कारभाऱ्यास कैद करून त्यानें आपला प्रताप दाखविला. परंतु सुमारें वर्षाच्या आंत राजा बरा झाल्यानें तो सुटला व यॉर्कला दरबारांतून पळून जाणें भाग पडलें. त्यानें आपल्या तालुक्यांत जाऊन लष्कर गोळा केलें व तें घेऊन राज्याची सुधारणा करा असें म्हणत तो लंडनकडे येऊं लागला. राजा सैन्य घेऊन त्यास अडविण्यास गेला, परंतु सेंट आल्बन्सच्या मैदानांत जी लढाई झाली त्यांत तो हरला व पकडला गेला. (इ. स. १४५५). पण मार्गरेट राणी मदत घेऊन आली, व यॉर्कला तिनें उत्तरेकडे पळावयास लाविलें. या वेळीं इंग्लंडांत जी तरवार बाहेर पडली ती ३० वर्षेपर्यंत पूर्णपणें म्यानांत गेलीच नाहीं. यानंतर दोन्ही पक्षांच्या ज्या ज्या लढाया झाल्या त्यांचें वर्णन करूं बसल्यास पार येणार नाहीं. इतक्या लढाया झाल्या तरी त्या तंट्याचा निकाल लवकर

लागला नाहीं, कारण इंग्लंडचे सर्व लोक कोणी यॉर्कच्या तर कोणी लँकॅस्टरच्या पक्षांत सामील होऊन लढण्यास बाहेर पडले होते. जसजशीं माणसें मरत गेलीं तसतसीं वैर व अट्टाहास हीं वाढत गेलीं, व नंतर तर एक दुसऱ्यास आपला शत्रू असें मानूं लागला. लढाईंत समोरासमोर आल्यास शत्रूस वेंचून काढून मारीतच, परंतु जो पकडला जाई अगर शरण जाई त्यास देखील दुष्टपणानें कापून टाकण्यास कोणीहि उशीर लावीत नसत. घरांत बसलेल्यास देखील पकडून आणून राजद्रोही ठरवून पहातां पहातां त्यास फांशीं चढवीत. निरपराधी लहान मुलांस सुद्धां पकडून मारून टाकीत. यावेळीं एकाही पक्षाच्या माणसास जरासुद्धां दया येत नव्हती. देशांतील या भयंकर तंट्यास "गुलाबाच्या लढाया" म्हणतात, कारण लँकॅस्टर पक्षाच्या निशाणावर तांबड्या गुलाबाचें व यॉर्कच्यावर पांढऱ्या गुलाबाचें फूल काढलेलें होतें. या लढाईंत घटकेंत यॉर्कचा तर घटकेंत लँकॅस्टरचा जय होई राजा पुष्कळदां पकडला गेला व तितके वेळ राणीनें त्यास सोडविला. तो कैदेंत होता तरी राणीनें आपल्या मुलाच्या नांवानें लढाई जोरांत चालू ठेविली. रिचर्ड शेवटीं एका लढाईंत पडला (इ. स. १४६०), तरी पण यॉर्क पक्षवाल्यांनीं त्याच्या एडवर्ड नांवाच्या मुलास पुढें करून मार्गरेटचा पराभव केला, आणि इ. स. १४६१ त त्यास लंडनांत नेऊन राज्याभिषेक केला.

**यॉर्क कुळाचे राजेः चौथा एडवर्ड.**-एडवर्ड आतां राजा

झाला, परंतु दोन्ही पक्षाच्या लढाया जशाच्या तशाच जोरांत होत्या. मार्गरेट राणी पुष्कळ जोरदार, शूर व उत्साही होती. तिनें लगेच उठाव केला, परंतु त्यांत हरल्यानंतर ती थोडे दिवस स्वस्थ राहिली व नंतर फ्रान्स व स्कॉटलंडची मदत घेऊन ती परत आली. हेक्सम जवळ (इ. स. १४६४) एक जंगी लढाई झाली, त्यांत लँकेस्टर पक्षाचे पुष्कळ लोक मारले गेले व पुष्कळ काळपर्यंत तो पक्ष डोकें वर करूं शकला नाहीं. त्या पक्षांतील बहुतेक लोक कापले गेले व बाकीच्यांस देश सोडून पळून जावें लागलें. यामुळें देशांत थोडीशी स्वस्थता होतांच चौथ्या एडवर्डनें आपल्या अधम विषयासक्तीची लगाम सैल सोडली, व त्याचा दरबार एक अनीतीचें ठिकाण बनला. नीच कुळांतील एका विधवेवर मोहीत होऊन त्यानें तिच्याशीं लग्न केलें, व तिच्या नातेवाईकांस मोठा मान मरातब देऊन त्यांस उच्चपदास चढविलें.

हें पाहून यॉर्क पक्षाचा मोठा आधारस्तंभ असलेला, व ज्यानें आपल्या यावेळच्या पराक्रमानें "राजा बनविणारा" असें अपणास नांव मिळविलें होतें तो वॉरिकचा अर्ल राजाविरुद्ध उठला व त्यास राजाचा भाऊ क्लेअरन्स देखील सामील झाला. वॉरीकनें कॅलेस जाऊन आपल्या मुलीचें क्लेअरन्सशीं लग्न लाविलें, व तेथून एकदम लंडनास येऊन राजास कैद केलें. पुढें त्याचें काय करावें असा वॉरिक विचार करीत आहे तोंच राजा तुरुंगांतून पळाला. तो मोकळा झाल्यानें वॉरिक व क्लेअरन्स यांस फ्रान्सांत पळून जावें

लागलें. तेथें जाऊन वॉरिक मार्गरेट राणीस सामील झाला व तिचा मुलगा एडवर्ड याशीं आपल्या दुसऱ्या मुलीचें लग्न लावून त्यास गादीवर बसविण्याचें त्यानें तिला कबूल केलें. नंतर मोठें लष्कर घेऊन त्यानें लंडनवर स्वारी केली, राजाचे बहुतेक सरदार नाराज झालेले असल्यानें त्यास मिळाल्यामुळें लढाई केल्याशिवाय चौथ्या एडवर्डास जीव घेऊन हॉलंडास पळून जाणें भाग पडलें. "राज बनविणाऱ्या"नें तुरुंगांतून काढून सहाव्या हेन्रीस परत गादीवर बसविलें ( इ. स. १४७० ), व ठरल्याप्रमाणें राज्यकारभार स्वतः तो व क्लॅअरन्स चालवूं लागले. दोन तीन महिन्यानंतर ( इ. स. १४७१ ) त्यांनीं पार्लमेंट बोलावून ही व्यवस्था मंजूर करून घेतली.

परंतु ह्या गोष्टीस थोडे दिवस झाले नाहींत तोंच पुष्कळ लष्कर घेऊन एडवर्ड पुन्हा इंग्लंडांत आला. क्लॅअरन्स वगैरे कित्येक यॉर्क पक्षाचे लोक परत त्यास मिळाले, कारण आपल्याच घरांत फूट पाडून आपण घरच गमावून बसलों असें आतां त्यांस वाटूं लागलें. या युद्धांत वॉरिक निकरानें लढला तरी लॅंकॅस्टर पक्षाच्या सर्व अशा अस्त पावल्या इतक्यांत मार्गरेट मागून येऊन पोंहचली, तिनें दुसरी लढाई दिली, परंतु तींत तिचे सर्व लोक मारले गेले, आणि तिचा मुलगा लढाईंत पडला असावा किंवा पकडला जाऊन नंतर लगेच त्यास कोणी मारून टाकला असावा. मार्गरेटाला तिचा भाऊ फ्रान्सचा राजा यानें पैसे देऊन सोडविलें; व गरीब

बिचाऱ्या सहाव्या हेन्रीस पुन्हा तुरुंगांत जावें लागलें व तेथें तो पुष्कळ दिवसांनीं बहुतकरून अपघातानें मेला.

आतां एड्वर्ड निर्भय झाला. त्याबरोबरच त्याचा कसाई-पणा वाढला. विरुद्धपक्षांतील लोकांपैकीं जो सांपडेल त्यास कांहीं देखील न बोलूं देतां त्यानें मारून टाकलें. कोणाचा जरा शक आला कीं त्याचीं भरलीं ह्मणून समजावें. अशावेळीं तो मनुष्य आपल्या पक्षाचा कीं दुसऱ्या याचाही तो विचार करीत नसे. तो अगदीं बेपर्वा व घातकी बनला. स्वतःचा भाऊ क्लेअरन्स यास देखील त्यानें अपराधाशिवाय दारूच्या पिपांत बुडवून मारून टाकलें असें सांगतात. ( इ. स. १४७८ ). अशा रीतीनें लोक हैराण झाले होते इतक्यांत तो आपोआपच मेला, आणि लोकांनीं आनंदानें त्याच्या मुलाच्या नावानें द्वाही फिरविली (इ.स.१४८३).

**पांचवा एड्वर्ड.**—हे बिचारें तेरा वर्षांचें मूल गादीवर आलें तें मरण्यासाठींच. त्याचा काका रिचर्ड यास राजरक्षक बनविलें होतें, तोच त्याचा भक्षक ठरला. त्यानें या बाळराजाच्या आईस कैद केलें, व मामास फांशीं दिला. नंतर तो स्वतः राजा होण्याचा तजविजीस लागला. लॉर्ड हेस्टिंग्ज नांवाचा त्याचा मित्र या अन्यायांत सामील झाला नाहीं, व ह्मणून तो माझा जीव घेण्यास जादू करतो असा त्याच्यावर आरोप ठेवून त्यानें त्यास मारविलें. नंतर त्याच्या पक्षांतील लोकांनीं एड्वर्ड राजानें लग्न करण्यापूर्वीं दुसऱ्या एका स्त्रीस तिच्या बरोबर लग्न

करण्याचें वचन दिलें होतें, यामुळें त्याचें लग्न धर्म कायद्याप्रमाणें रद्द असून त्या लग्नाचे हे मुलगे वारस होण्यास नालायक होते असें सांगून, तसेंच चौथा एडवर्ड व क्लॅअरन्स हे दोघेही आपल्या बापाच्या पोटचे नसून रिचर्डच त्याचा खरा मुलगा होता असें निमित्त पुढें करून सबंद पार्लमेंटच्या तर्फेनें रिचर्डास राजा होण्याची विनंती केली, व त्यानें ती नाहीं ह्मणतां ह्मणतां मान्य केली. ( इ. स. १४८३ ).

असें सांगतात कीं गादीवर बसल्यानंतर लवकरच त्यानें किल्ल्यांत मारेकरी पाठवून त्या बिचाऱ्या दोघां बाळकांस निजले असतां मारवून गुपचूप तेथेंच पुरून टाकविलें.

**रिचर्ड तिसरा.**—वरील दुष्ट कृत्यामुळें लोक त्यास राक्षस समजूं लागले. यॉर्क पक्षांत तर दोन मोठे तड पडले. लँकॅस्टर पक्षाचे लोक फ्रान्समध्यें राहून लाग पहातच होते, व आतां त्यांनीं लगेच आपला सरदार रिचमंडचा अर्ल हेन्री याचें चौथ्या एडवर्डच्या मुलीबरोबर लग्न ठरवितांच अर्धा यॉर्कपक्ष लगेच त्यांच्या पक्षांत येईल कीं काय हें ठरविण्याच्या तजविजींत ते होते. असें सांगतात कीं, हें ऐकून रिचर्डनें आपल्या बायकोस वीष घालून ठार मारलें, व आपण त्या मुलीबरोबर लग्न करण्याची खटपट केली. परंतु आपल्या भावांचा खून करणाऱ्या मनुष्याबरोबर लग्न करण्यास ती राजकन्या कशी कबूल होईल ? तिचें लग्न रिचमंडबरोबरच झालें. लँकॅस्टर पक्ष जोरांत आला, दुसरे

कित्येक सरदार देखील उलटले व इ. स. १४८३ तच त्यांनीं पुन्हा उठावणी केली. परंतु त्यावेळीं कांहीं साधलें नाहीं. दुसऱ्या वेळीं मात्र त्यांनीं फार जोराचा हल्ला केला, रिचर्ड तोंड देण्यास गेला व बोस्वर्थफील्डजवळ मोठ्या पराक्रमानें लढला, परंतु त्याच्या लष्करांत फितुरी झाल्यामुळें त्याचा पराजय झाला, व तो लढतां लढतां रणांत पडला.

रिचर्ड राजा शरीरानें कुबडा व ठेंगणा, व स्वभावानें दुष्ट होता असें ह्मणतात. तो बुद्धीमान् होता खरा, गादीवर बसल्या-नंतर त्यानें शहाणपणानें राज्य चालविलें. त्याची कारकीर्द फारच लहान, फक्त दोनच वर्षांची बंद फितुरीनें भरलेली होती, तरीपण व्यापारवृद्धीचे त्यानें कित्येक चांगले कायदे केले, व सरकारी कायदे छापून प्रसिद्ध करण्याची पद्धत त्यावेळेपासूनच पडली. तो पुष्कळ अंशीं अवरंगजेबासारखा होता, परंतु तो देशकाळ असा नव्हता कीं तेथें असल्या माणसाचें हिंदुस्थानसारखें फावेल. त्याचे कसे हाल झाले तें आपण वर पाहिलेंच.

## प्रकरण १२ वें.

### ट्यूडर वंशाचे राजे.

#### हेन्री ७ वा.

**राज्यावर हक्कः**—लँकेस्टरचा मूळ ड्यूक जॉन ऑफ गँट याच्या उपपत्नीपासून जी उत्पत्ति झाली ती दुसरा रिचर्ड

व पोप यांनीं सशास्त्र ठरविली होती, परंतु त्यांत एवढाच अपवाद ठेविला होता कीं तिच्यापैकीं कोणाचा राज्यावर हक्क नाहीं. त्या उत्पत्तीपैकीं त्याची जी प्रपौत्री ती सातव्या हेन्रीची आई होय. आणि पांचव्या हेन्रीच्या विधवा स्त्रीस पुनर्विवाहापासून पुत्र झाला होता तो त्याचा बाप होय. अशा रीतीनें दोन्हीं बाजूंनीं त्याचा इंग्लंडच्या गादीवर हक्क होता, परंतु त्यांत अडथळे होतेच. तरी पण लँकॅस्टरच्या कुळांत दुसरें कोणी जिवंत राहिलें नव्हतें, ह्मणून त्या लोकांनीं त्यास एकमतानें आपला राजा मानिला. यॉर्क कुलांत देखील चौथ्या एडवर्डच्या मुलीशिवाय दुसरें कोणी जिवंत नव्हतें, व तिच्याबरोबर तर हेन्रीचें लग्न झालें होतें. त्यामुळें त्या पक्षांतील लोकांनीं देखील त्यास खुषीनें राजा कबुल केलें.

**गुलाबाच्या लढाईचा परिणामः**-हेन्रीचें सर्वांनीं खुषीनें स्वागत केलें, त्याचे कारण एक हें होतें कीं गुलाबाच्या लढाईनें लोक हैराण होऊन गेले होते. या लढाईनें इतका नाश केला होता कीं, यावेळी शोक न करणारीं अशीं इंग्लंडांत थोडीच घरें असतील. सरदार वर्गाचा तर या लढाईनें समूळ नाश केला होता. फक्त राजवंशी लोकांचाच विचार केला तर या तीस वर्षांच्या लढाईत ९० एक जण मारले गेले असावेत, व तालुकदार किती मेले त्याचें प्रमाणच नाहीं. पुष्कळ सरदारांच्या घरांस कुलुपें लावावीं लागलीं. या भयंकर लढाईचा एक मोठा परिणाम हा झाला कीं, अद्यापपर्यंत जो सरदार वर्ग बलवान् व मदोन्मत्त

होता तो आतां अगदीं नरम झाला, व डोक्यांतून तालुकदारीचें वारें काढून टाकून ते साधारण रयतेप्रमाणें वागूं लागले. या कारणामुळें प्रथम तर राजे निरंकुश झाले खरे व प्रजेस पुष्कळ पराधीनता सोसावी लागली, परंतु मागाहून पुष्कळ फायदा झाला; कारण तालुकदारांची मध्यस्थी निघून गेल्यामुळें अतां सर्व प्रजेस प्रत्यक्ष राजाबरोबर खबरदारीनें वागणें भाग पडलें. व त्यांत दिवसेंदिवस सरावून ती इतकी बळवान् झाली कीं, शेवटीं राज्याची श्रेष्ठ सत्ता हाउस ऑफ कॉमन्सच्या हातीं आली. परंतु अर्थातच पहिलीं शंभर एक वर्षेंपर्यंत पार्लमेंट नाहीं सारखेंच होतें, व ट्यूडर वंशाच्या राजांनीं जी सत्ता भोगली तशी पूर्वीं किंवा नंतर इंग्लंडचा कोणताही राजा भोगूं शकला नाहीं.

**राजाचा जुलूम व मरणः**-सातव्या हेन्रीनें आपला अंमल बसविण्यास जुलूम करण्यांत कांहीं मागें पुढें पाहिलें नाहीं. यॉर्क पक्षाचे निकंदनच करावयाचें त्यानें मांडलें होतें. आपल्या जुन्या दोस्तांपैकीं कोणचाही नुसता वहीम आला कीं त्यास तो ठार मारवी. त्यामुळें देशांत बंड फितुरी पुष्कळ झाली. त्यांतील दोन बंडें बरींच जबरदस्त होतीं; कारण त्यांत दोन तोतया हक्कदारांस लोकांनीं पुढें केलें होतें. परंतु हेन्री कांहीं कमी नव्हता. त्यानें शहाणपणानें व मेहेनतीनें तीं दोन्हीं बंडें मोडलीं, व नंतर लोकांची आपणावर प्रीति बसेल अशा रीतीनें तो वागूं लागला, तरी पण तो पैशाचा अतीशय लोभी होता, व मरेपर्यंत त्यासाठीं

त्यानें फार त्रास दिला. इ. स. १५०९ त तो मरण पावला, तेव्हां त्याच्या खजिन्यांत जितका पैसा सांपडला तितका कोणत्याही इंग्लंडच्या राजानें जमविला नव्हता. त्याच्या कारकीर्दींत वजनें व मापें सबंद देशांत सारखीं झालीं, हें एक त्यानें मोठें देशोपयोगी काम केलें. अजून देखील इंग्लंडांत बहुतेक तींच चाललीं आहेत.

**सोळावें शतकः**—यूरोपास हल्लींच्या सुधारणेप्रत आणून पोंचविणारें व त्यास जगतांतील एक अगदीं बदलेला देश करून टाकणारें प्रसिद्ध सोळावें शतक आतां सुरू झालें. यूरोपचा मध्यकाळ संपून आतां अर्वाचीन काळास सुरवात झाली. सोळावें शतक यूरोपच्या इतिहासांत फार महत्वाचें आहे. यूरोपच्या सुधारणेनें हल्लींचें वळण या वेळेपासून घेतलें. पंधराव्या शतकानें या प्रतापी वेळची पूर्वीं पासून तयारी चालविली होती. सुधारणेचें मूळ जी छापण्याची कला ती गटनबर्ग नांवाच्या पुरुषानें जर्मनींत काढली. व ती इंग्लंडांत उइल्यम कॅक्स्टन यानें इ. स. १४७४ सालांत आणली. शंभर एक वर्षांपासून प्राचीन विद्येचा अभ्यास वाढूं लागला होता, व छापखान्याच्या मदतीनें तो वायुवेगानें पुढें सरसावला. आतां लिहिणें वाचणें उच्च वर्गांत सर्वसाधारण झालें, व कित्येक तर खरोखर महापंडित बनूं लागले. आजपर्यंत सरस्वती धर्मालयांत भिऊन लपून बसली होती ती आतां बाहेर पडली, व संसार तेजोमय झाला. आतां लोक आपल्याशींच विचार करण्यास शिकले, व प्रसंगीं धर्मगुरूंचा देखील हात धरतील इतके विद्वान्

झाले. काय सांगितलें आहे असें न विचारतां खरें काय आहे याचा लोक तपास करूं लागले. जुनें ह्मणूनच चांगलें हा विचार नाहींसा झाला, व नव्या बाजूस मनाची अभिरुची धावली. या वृत्तीस उत्तेजन देण्याजोग्या सांसारिक गोष्टी यावेळीं पुष्कळ बनून आल्या. बंदुकीच्या दारूचा शोध लागल्यामुळें प्राचीन युद्धकला निरुपयोगी ठरल्या, व नव्याच तऱ्हेचे धडाके ऐकूं येऊं लागले. यामुळें तालुकदारी घोडेस्वारांपेक्षां प्रजाकीय पायदळ रणक्षेत्रांत जास्त बळवान् ठरलें, व तालुकदारांच्या सत्तेस, तसेंच त्यांच्या प्रेमशौर्यभक्तीच्या भावनेस उतरती कळा लागली. शिवाय होकायंत्राचा शोध लागल्यामुळें समुद्रप्रवास वाढला. फिरंगी लोकांनीं केप ऑफ गुडहोपच्या मार्गानें हिंदुस्थानांत येण्याचा नवा रस्ता शोधून काढला, व त्यामुळें व्यापाराचे नवेच मार्ग उघडले. कोलंबसानें "नवीन महाद्वीप" शोधल्यापासून तर नवीच भूमी, नवेच लोक, नवी वनस्पती, नवीं जनावरें वगैरे सगळेंच नवें नवें यूरोपच्या लोकांस दिसूं लागलें. नव्यानें स्पेनास निराळेंच बनविलें. तेथें सोन्याचे ढीगचे ढीग येत असलेले पाहून सर्व यूरोपचे लोक साहसी बनले. यासमयीं यूरोपच्या वृत्ती ताज्या रक्ताच्या तरुणासारख्या उसळणाऱ्या व आनंदी झाल्या असून जणूं काय जीर्णोद्धार होऊन त्यानें नवा जन्मच घेतला असावा असें वाटे. आतां यूरोपच्या डोळ्यासमोरचा भूतकाळचा पडदा झळकूं लागला.

# प्रकरण १३ वें.

## ट्यूडर वंश.

### हेन्री आठवा.

**आठवा हेन्रीः**—हेन्री हा स्वार्थी राजा होता. गादीवर बसला त्यावेळीं तो भरज्वानींत असून, सुंदर, ऐटबाज व चतुर होता. गादीवर बसतांच बापाचा मोठा खजिना उधळण्यास त्यानें सुरवात करून नाचरंग व तमाशांनीं त्यानें इंग्लंडचा दरबार व्यापून टाकला. प्रथम त्यानें दयाळूपणा चांगला दाखविला. सातव्या हेन्रीनें ज्या बिचाऱ्यांस लुटलें होतें त्यांस त्यानें त्यांची मालमत्ता परत दिली, व ज्या दुष्ट कारभाऱ्यांच्या हातून असले जुलुम घडले होते त्यांस पकडून आणवून फांशीं दिलें. त्यामुळें या नव्या राजास पाहून रयत अगदीं खूष होऊन गेली. त्याच्यांत हट्ट, मिजास, आपसत्तीपणा, कठोरता वगैरे जे मोठे दुर्गुण होते ते मागाहून प्रकट झाले.

फ्रान्सबरोबर लढाई करण्याचा विचार उतावळ्या हेन्रीनें लगेच केला, आणि इंग्रज लोक कीर्तीचे सदा भुकेले असल्यानें त्यानें मागितले तितके पैसे लोकांनीं त्यास दिले. या लढाईत त्यानें विशेष पराक्रम केला असेल असें कांहीं वाटत नाहीं, पण त्याचा

थाटमाट व भपका फार होता. ही लढाई अडखळत अडखळत व हळू हळू वीस एक वर्षे चालली, पण तिच्यामुळें फायदा फक्त इतकाच झाला कीं, यापुढें यूरोपच्या राज्यकारभारांत इंग्लंडचें मत घेतलें जाऊं लागलें. यावेळीं स्पेनचें राज्य महाबळवान् झाल्यामुळें त्याची व फ्रान्सची पुष्कळ चढाओढ लागून राहिली होती. इतक्यांत जर्मनीची बादशाही खाली पडली व त्यासाठीं या दोन्ही देशांचे राजे उमेदवार झाले. स्वाभाविकपणेंच दरेकाच्या मनांत असें होतें की हेन्री आपल्या बाजूस आल्यास बरें. अशा वेळीं ओढून ताणून आपली किंमत वाढविण्यांत हेन्री खूब प्रवीण होता.

**सहा राण्याः**—या राजानें एका मागून एक अशा सहा राण्या केल्या व त्यांपैकीं कित्येकांस मारूनच टाकलें, ही या कारकीर्दीच्या हकीगतींत महानिंद्य परंतु ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. सातव्या हेन्रीनें स्पेनची राजकन्या कॅथेराईन हिच्याशीं आपल्या वडील मुलाचें लग्न केलें होतें, परंतु दैवयोगानें लग्नानंतर तो लवकरच मरण पावला. त्यामुळें तिचा पुनर्विवाह त्यानें आपला दुसरा मुलगा हेन्री याजबरोबर करण्याचें ठरविलें ही योजना राजपुत्रास पसंत पडली नाहीं. कारण ख्रिस्ती धर्माच्या लोकांत मेहुणी अगर भावजईबरोबर लग्न करण्यास मोठा प्रतिबंध आहे. परंतु हेन्रीनें आपलें वजन खर्च करून पोपची खास परवानगी मिळविली, व मग राजपुत्रानें हरकत घेतली नाहीं. गादीवर बसल्यानंतर देखील

आठव्या हेन्रीनें या स्त्रीबरोबर १८ वर्षेपर्यंत आनंदानें संसार चालविला. पण त्यानंतर राणीच्या सखीजनांत ॲनबोलीन नांवाची एक सुंदर तरुणबाई होती, तिला पाहून लंपट हेन्रीचें मन चळलें. तिला वश करण्यासाठीं त्यानें पुष्कळ युक्त्या केल्या, परंतु त्यास त्यांत यश आलें नाहीं. तेव्हां शेवटीं तिच्याबरोबर लग्न करण्याची त्यानें मसलत केली. परंतु ख्रिस्ती धर्माप्रमाणें एक बायको हयात असतां दुसरी करतां येत नाहीं त्यामुळें या निर्दय नवऱ्यानें स्वतःच्या जुन्या पतिभक्त राणीस काडी मोडून दूर करण्याचा निश्चय केला, आणि त्यासाठीं ढोंग करून पोपास तो विनवूं लागला कीं हें धर्माविरुद्ध लग्न माझ्या आत्म्यास फार दुःख देणारें झालें आहे. व मला गादीस वारस मुलगा पाहिजे तो होत नाहीं, त्यावरून ईश्वर पण असल्या लग्नाबद्दल नापसंती दर्शवितो असें वाटतें. यासाठीं तें लग्न रद्द करावें. पोपास मोठा विचार पडला. कारण एकतर ती मोठी अन्यायाची गोष्ट होती; दुसरें मागच्या पोपनेंच या लग्नास सूट दिली होती; व सर्वांत मोठी अडचण ही होती कीं तसें केल्यास स्पेनचा राजा, जो जर्मनीचा बादशहा झाला होता तो, कॅथेराईनचा भाचा असल्यानें त्याच्याबरोबर लढाईचा प्रसंग यावयाचा. म्हणून त्यानें ही गोष्ट लांबणीवर ढकलून ढकलून उडवून देण्याचा विचार केला. त्यामुळें तो कामातुर राजा फारच उतावळा झाला, व त्यानें परभारें यूरोपांतील बहुतेक

शास्त्र्यांचा अभिप्राय आपल्या लाभांत लिहून मागविला व खानगी रीतीनें त्या स्त्रीबरोबर लग्न केलें; आणि माझ्या देशांत धर्माचा उपरी मींच आहें, असा पार्लमेंटद्वारा कायदा करून इंग्लंडच्या धर्मगुरूंच्या सभेंत क्रॅन्मर नांवाच्या नव्याच त्या कामासाठीं नेमलेल्या एका धर्माध्यक्षाच्या मुखानें असा ठराव करविला की, राजाचें कॅथेराईन बरोबरचें लग्न मूळपासूनच धर्मविरुद्ध आहे. पार्लमेंटानें हा ठराव देखील मंजूर केला, व या राणीपासून राजास मेरी या नांवाची मुलगी झाली होती तिला हक्कदार वारस गणूं नये असेंही ठरविलें.

ज्या नव्या राणीसाठीं हा सर्व तंटा उपस्थित झाला होता, तिचे ह्या कामांध पुरुषानें थोड्या वेळांत त्या पेक्षांही खूब हाल केले. तिच्यावर व्यभिचाराचा आळ आणून तिला मारून टाकली, व तिच्या ज्या एका सखीवर तो मोहीत झाला होता तिच्याशी त्यानें त्याच दिवशीं लग्न केलें. या राणीच्या पोटीं एक मुलगी झाली होती, तिचें नांव इलिझाबेथ. तिला देखील त्यानें हक्कदार गणूं नये असें ठरविलें.

तिसरी राणी जेन सिमूर मुलगा होतांच एक वर्षांत मरण पावली. हा मुलगा, पुढें सहावा एडवर्ड या नांवानें प्रसिद्धीस आला. हेन्रीनें चौथी राणी केल्याबरोबरच तिचा त्याग केला, कारण चितार्‍यानें जसें तिचे चित्र रंगविलें होतें तितकी ती स्वरूवान् दिसली नाहीं. पांचवी राणी मूळपासूनच व्यभिचारिणी आहे

असें शाबीत झाल्यानें त्यानें तिचा शिरच्छेद करविला. शहाव्या वेळेस त्यानें एका विधवेबरोबर लग्न केलें. ही राणी चतुर असल्यानें तिनें त्याचें मन रिझविलें, आणि तिला मारण्याचा समय येण्यापूर्वीं तो स्वतःच मरून गेल्यामुळें ती वांचली.

**धर्मसुधारणा**:—इंग्लंडांत धर्मसुधारणेचा या राज्यांत मजबूत पाया घातला गेला ही या राज्यांतील खरोखरच जाणण्याजोगी गोष्ट आहे. या बाबतीचा विशेष सविस्तर खुलासा पुढच्या एकत्र प्रकरणांत देण्यांत येईल. ईश्वराची लीला इतकी अगाध आहे कीं मनुष्याच्या दुष्ट आचरणांतून देखील जगतास लाभकारीच फळ मिळतें. हेन्रीनें पोपचा अधिकार काढून टाकला तो तर स्वतःच्या पापी मतलबासाठींच. धर्मसुधारणेच्या तो अगदीं विरुद्ध होता, तरी पण त्याच्याच हातून परमेश्वरानें संदेहाचा कोट फोडून धर्मसुधारणा इंग्लंडांत दाखल करविली.

**राजाचें मृत्युपत्र.**—मेरी व इलिझाबेथ अशास्त्र मुली आहेत असा जो प्रथम ठराव झाला तो मागाहून हेन्रीनेंच पार्लमेंटकडून रद्द करविला; त्यानंतर मरतेवेळीं तो मृत्युपत्र असें करून गेला कीं माझ्या मागें एडवर्डास, तो बिनवारशी मेला तर त्याच्यामागून मेरीस, मेरी बिनवारशी मेल्यास इलिझाबेथला, व ती सुद्धां बिनवारशी मेल्यास फ्रान्सवाली आपली बहीण मेरी हिच्या कोणाही वंशजास इंग्लंडची गादी मिळावी. या बहिणीस इंग्लंडच्या एका

सरदाराबरोबरच्या पुनर्विवाहापासून एक मुलगी झाली होती. तिची लेडी जेन ग्रे या नांवाची एक मुलगी यावेळीं हयात होती. या योजनेंत हेन्रीनें स्कॉटलंडच्या राजाबरोबर लग्न झालेल्या आपल्या मार्गरेट नांवाच्या मोठ्या बहिणीच्या वंशास बाजूस ठेविलें, परंतु तो वंशच मागाहून इंग्लंडच्या गादीवर आला. यामुळें त्याविषयीं कांहीं हकीगत या ठिकाणीं दिल्यास बरें. तिचें स्कॉटलंडचा राजा चौथा जेम्स याजबरोबर लग्न झालें होतें, व त्यापासून जो मुलगा झाला तो पुढें पांचवा जेम्स या नांवानें प्रसिद्धीस आला, व त्याच्यामागून मेरी नांवाची मुलगी झाली ती " स्कॉट लोकांची राणी " या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे. या राणीचे दुसरें लग्न लॉर्ड डार्नली नामक एका सरदाराबरोबर झालें. तो मार्गरेटच्या पुनर्विवाहापासून झालेल्या मुलीचा मुलगा होता. या लग्नापासून जो मुलगा झाला तो इलिझाबेथ नंतर पहिला जेम्स या नावानें इंग्लंडच्या गादीवर आला.

# प्रकरण १४ वें.

## टयूडर वंश.

### सहावा एडवर्ड व मेरी.

**सहावा एडवर्डः**—इ. स. १५४७ त आठवा हेन्री मेला, तेव्हां हा राजपुत्र पुरता दहा वर्षांचा देखील नव्हता. यामुळें सर्व कारभार त्याचा मामा ड्यूक ऑफ समरसेट यानें चालविला. तो सुधारक असल्यानें क्रॅन्मर वगैरे नव्या पंडितांची सल्ला घेऊन त्यानें इंग्लंडांत धर्मोद्धार करण्याचें काम जोरानें चालविलें, व याच राज्यांत तें काम बहुतेक पार पडलें असें ह्मटलें तरी चालेल. तरी पण त्याची वर्तणूक अविचारी व आपसत्ती होती. त्यामुळें लोकांची मनें नाराज होऊन जिकडे तिकडे बंडें होऊं लागलीं. राजमंडळांत देखील बेबनाव झाला, व त्यामुळें शेवटीं समरसेटास राजिनामा देणें भाग पडलें. मागाहून त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप येऊन तो मारलाही गेला.

बालराजा शहाणा, व मोठा ईश्वरभक्त होता; आणि तो मोठा झाला ह्मणजे चांगला राजा निघेल अशी लोकांस आशा होती. पण इतक्यांत त्यास देवी आल्या व त्यांतच क्षय रोग होऊन तो सोळा वर्षें पुरीं होण्यापूर्वींच मरण पावला. इ. स. १५५३.

यावेळीं मुख्य कारभारी नॉर्थंबर्लंडचा ड्यूक होता, त्याच्या मुलाचें लग्न लेडी जेन ग्रेशीं झालेलें होतें. त्यामुळें त्यानें मृत्युशय्येवर असलेल्या राजास वेडें वांकडें समजाऊन त्याच्याकडून लेख करून घेतला कीं आपल्यामागून गादी त्या बाईस मिळावी.

**मेरी.**—लेडी जेन ग्रे, सुधारक, सुशिक्षीत, व शांत स्वभावी होती. तिची इच्छा नसतां नॉर्थंबर्लंडनें एकदम तिच्या नांवाचीं द्वाही फिरविली, व त्या नवरा बायकोस राज्याभिषेक करण्याची तो तयारी करूं लागला. परंतु हा अन्याय पाहून लोक मेरीच्या पक्षास धांवले. नॉर्थंबर्लंड लष्कर घेऊन त्याचा समाचार घेण्यास गेला, पण तेंच लष्कर फुटून हक्कदार राणीस मिळालें. व तो आपल्या साथीदारांसह पकडला गेला. मेरीनें मुख्य बंडखोरास फांशीची शिक्षा दिली, परंतु लेडी जेन ग्रे व तिचा नवरा यांजवर दया करून त्यांस कैदेंतच ठेविलें. परंतु मागाहून त्या बाईच्या नांवानें बंडे होऊं लागलीं, तेव्हां तिनें त्या दोघांसही देहान्त शिक्षा केली. ( इ. स. १५५४ ).

**धर्मसुधारणा:**—या राणीनें सुधारणेस मुळांतून काढून टाकण्याची खूब खटपट केली. गेल्या राज्यांत पोपविरुद्ध जे जे कायदे झाले होते ते सर्व रद्द केले, इंग्लंडास परत पोपास शरण नेलें, व सुधारकांवर इतका जुलूम केला कीं " खुनी मेरी " हेंच तिचें नांव इतिहासांत राहिलें.

**राणीचें लग्न व मरण:**—पुराणमतवाद्यांनीं आपला पक्ष बळवान करण्यासाठीं राणीस स्पेन व जर्मनीचा राजपुत्र फिलिप याजबरोबर लग्न करणची सल्ला दिली, कारण त्यावेळीं तो राजा पुराणमतवाद्यांचा मोठा स्तंभ होता. त्यावेळीं यूरोपांत सर्व ठिकाणीं सुधारकांवर भयंकर जुलुम होत होता, परंतु स्पेनच्या राज्यांत जो जुलुम होत होता तो न भूतो न भविष्यति असा होता. अशा राजाच्या मुलाबरोबर लग्न होणार असल्याची गोष्ट ऐकून इतर लोकांनीं बरीच हरकत घेतली. परंतु शेवटीं राणीनें आपलेंच ह्मणणें खरें केलें. त्यामुळें पुष्कळ बंडें वगैरे झालीं. हें लग्न करून राणी स्वतःही सुखी झाली नाहीं. फिलिपनें राज्य लोभानेंच तिच्याशीं लग्न केलें होतें. परंतु मागाहून त्यांचें प्रेम एकमेकांवर बसण्याजोगी स्थितीच नव्हती. राणी ३९ वर्षांची पोक्त बायको व तिचा नवरा २८ वर्षांच्या भरज्वानींत होता. शिवाय फिलिपचा स्वभाव मिजासी व बेपर्वा होता. तसेंच प्रेमपाशांनीं वश करून घेण्याइतका एकही गूण मेरींत नव्हता. त्यामुळें इंग्लंडांत थोडे महिने राहून तो आपल्या देशांत निघून गेला. मग तो पुष्कळदां परत आला, पण तो केवळ आपल्या स्वार्थासाठींच त्यानें येऊन एकदां असा हट्ट धेतला कीं आमची फ्रान्सवरोबर लढाई चालत आहे यासाठीं इंग्लंडनेंही तसेंच केलें पाहिजे. पार्लमेन्टनें स्पष्ट नकार सांगितला, परंतु मेरीनें त्याच्या सांगण्याप्रमाणें केलें. या लढाईंत एकवेळ इंग्लंडनें मोठा जय मिळविला. परंतु शेवटीं फ्रान्स-

मधील इंग्लंडच्या ताब्यांत असलेलें एकच शहर जें कॅले तें देखील गेलें. त्यामुळें सर्व इंग्रजांस फार दुःख झालें. मेरी तर असें सुद्धां ह्मणाली कीं मी जेव्हां मरेन तेव्हां माझ्या हृदयावर कॅले शहराचें नांव कोरलेलें दृष्टीस पडेल. तिचा मरणकाळ कांहीं फार दूर नव्हता. जन्मापासून दुःखी असलेल्या मेरीच्या मनास या गोष्टीचा इतका धक्का बसला कीं, तिची प्रकृती बिघडूं लागली, व त्यावेळीं चालत असलेल्या सांथीच्या तापाच्या सपाट्यांत सांपडून तिनें इ. स. १५४८ त ४३ व्या वर्षी आपला देह सोडला.

---

## प्रकरण १५ वें.

### टयूडर वंश.

### इलिझाबेथ.

**स्वभाव व राजनीतिः**—ही राणी गादीवर बसली तेव्हां तेव्हां २५ वर्षांची होती, व ७० वर्षांची होईपर्यंत तिनें राज्य केलें. या लांबलचक कारकीर्दींत इंग्लंडच्या उन्नतीचा पाया रोंवला गेला. इंग्लंडांत पुष्कळ मोठमोठे राजे होऊन गेले, परंतु राजनीतींत या राणीशीं बरोबरी करील असा क्वचितच कोणी असेल. उत्तमोत्तम पुरुषांपेक्षां सुद्धां ही स्त्री जास्त बुद्धिवान्, दृढनिश्चयी व धैर्यवान् होती. ती बापासारखीच रागीट होती, परंतु प्रसंग पाहूनच ती चिडे.

खुनी मेरीच्या वेळीं तिला फार दुःख भोगावें लागलें होतें. त्यामुळें अनुभवानें राग आपल्या ताब्यांत कसा ठेवावा हें ती बरोबर शिकली होती. कोणत्याही राजाचें शहणपण तो कसले कारभारी पसंत करतो त्यावरून दिसुन येतें. या राणीनें मूळपासूनच शहाणे हुशार, अनुभवी व राजहितेच्छु कारभारी ठेविले व ते मरेतोंपर्यंत त्यांस प्रेमानें पाळलें.

हा समय चहूंकडे लढाईचा होता, व इलिझाबेथचा त्या सर्वांत हात होता, तरी पण ती अशी सावधगिरीनें वागली कीं इंग्लंडांचा मान सर्व ठिकाणीं वाढला, व तिची इच्छा पार पडली. तिला हाकच मोठ्या लढाईत भाग घ्यावा लागला होता. फ्रान्स बरोबर तह करण्याची संधी आली तव्हां ती कॅले शहरासाठीं भांडण्यास थांबली नाहीं. फ्लँडर्सच्या लोकांस तिनें मदत केली खरी परंतु त्यांनीं तिला राज्य देऊं केलें तरी तिनें तें घेतलें नाहीं. स्कॉटलंडांत तिनें मोठा भडका उडविला होता परंतु ती स्वतः वहुधा लांबच राहत असे. तिचें लक्ष्य स्वतःच्या राज्याचा चांगला बंदोबस्त करण्याकडे होतें, व त्या कामांत ती धैर्य, सावधगरी व शाहाणपणानें वागत होती. ती कुमारीच राहिली त्याचें एक कारण सुद्धां हें होतें कीं, परराज्याबरोबर लग्नसंबंध केल्यानें इंग्लंडचें स्वातंत्र्य पाहिजे तसें राखतां येत नाहीं.

धर्मोद्धाराचें काम तिनें पक्क्या पायावर व संपूर्ण केलें. इंग्लंडच्या धर्मसमाजाची जी व्यवस्था या राज्यांत झाली ती बहुत

करून आजपर्यंत इंग्लंडांत चालत आहे. यापुढें तो देश उघड व निःशंक पणें प्रॉटेस्टन्ट होऊन गेला, व दुसऱ्या देशाच्या ज्या ज्या लढाईंत इलिझाबेथनें भाग घेतला तो सर्व या धर्मसुधारणेच्या मदतीसाठींच होय.

धर्मसुधारणा झाली खरी, परंतु धार्मिक स्वातंत्र्य मात्र बिलकुल झालें नाहीं गेल्या राज्यांत ज्याप्रमाणें धर्मसुधारकांवर जुलुम झाला होता त्यच प्रमाणें आतां सुधारणेविरुद्ध असलेल्या लोकांवर होऊं लागला. धर्माच्या नांवावर इलिझाबेथच्या कारकीर्दीत मेरीच्यापेक्षां काहीं कमी खून झाले नाहींत.

**स्कॉटसूची राणी मेरीः**—हिचा इंग्लंडच्या राज्यावर किती हक्क होता त्याविषयीं आपण पूर्वीं सांगितलेंच आहे. तिचें फ्रान्सच्या राजाबरोबर लग्न झालें.असल्यानें त्या राजानें इंग्लंडची राजाचिन्हे धारण करावयास सुरुवात केली. हें ऐकून इलिझाबेथला फार राग आला, परंतु सुदैवानें तो राजा लवकरच मरून गेला, व मेरी आपच्या बापाच्या मुलुखांत जाऊन राज्य करूं लागली. स्कॉटलंडचे सर्व लोक प्रॉटेस्टन्ट झाले होते, व शिवाय पुढाऱ्यांस लांच देऊन इलिझाबेथनें फितूर करून ठविलें होतें. त्यामुळें या कॅथॉलिक मताच्या राणीबरोबर त्यांचें बनलें नाहीं. शिवाय तिची वर्तणूक इतकी खराब होती कीं शेवटीं मोठें बंड झालें, व तिला राज्य सोडून इंग्लंडास पळून जाणें भाग पडलें. (इ. स. १५६८). इलिझाबेथनें बाहेरुन पुष्कळ ममता दाखविली, परंतु तिला फ्रान्सांत जाऊं न देतां इंग्लंडांत नजरकैदेंतल्या सारखी ठेविली.

हें काम अन्यायाचें व विश्वासघाताचें होतें, व शेवटीं याही पेक्षां भयंकर काम इलिझाबेथच्या हातून झालें इंग्लंडांत रोमन कॅथॉलिक वगैरे पुष्कळ लोक बंड फितुरी करीतच होते, त्यांस आतां आयतेंच फावलें. मेरीच्या नांवावर आतां पुष्कळ मसलती होऊं लागल्या. एक बंड थंड केलें तर लगेच दुसरें उभें राही; त्यामुळें इलिझाबेथ घाबरून गेली. फ्रान्सांत जाण्यास मेरीस आतां सोडावें कसें, व ती कैदेंत जिवंत असेंपर्यंत इंग्लंडांतील बंडे मिटण्याची काय आशा, अशा विचारांत ती पडली. हें पाहून तिच्या मंत्र्यानीं या अभागी परदेशी राणीचा नायनाट करण्याचा करण्याचा विचार केला. तिच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेविला, तिची पुष्कळ दिवस तपासणी चालविली, आणि फ्रान्सच्या राजाची विनंति व स्कॉटलंडचा राजा जेम्स यानें आपल्या आईस बचाविण्यासाठीं धमकीयुक्त पुष्कळ विनंति केली तरी तिकडे लक्ष्य न देतां या चांडाळ चौकडीनें तिला देहान्त शिक्षा देण्याचा हुकूम करविला. या हुकुमावर सही करतेवेळीं इलिझाबेथनें पुष्कळ टाळाटाळ, अपमारु व दुःख दर्शविलें; व सही केल्यावर देखील तो कागद परत मागविण्यासाठीं तिनें माणूस पाठविला, परंतु तो पोंचण्यापूर्वीच मेरीचा वध होऊन गेला होता. ( इ. स. १५८७ ),. हें ऐकून ती खरोखरच पुष्कळ रडली. तिनें मंत्र्यासही धमकाविलें व ज्यानें सही करून घेतली होती त्यास पुष्कळ दंडही केला. हें सर्व इलिझाबेथचें ढोंग होतें, व तिनें होऊनच स्वतःच्या

आतेच्या पौत्रीचा प्राण घेवविला असें कित्येक इतिहासकार ह्मणतात. कसेंही असो, पण तिच्या कपाळास काळी टिकली लागली खरी. तिला परदेशी राणीवर राजद्रोहाचा आरोप ठेवण्याचा कांहींही अधिकार नव्हता. कैदेंत न ठेवतां मूळांतच तिला फ्रान्समध्यें जाऊं दिली असती, तर मागून तिसा असा त्रास झाला नसता.

**स्पेनचें अजिंक्य आरमार:**—यावेळीं नेदर्लंडांत स्पेनचें राज्य होतें, तेथें धर्माच्या नांवावर बंडें करून लोक स्वतंत्र झाले. या बंडांत कांहीं इंग्रजांनीं गुपचूप आणि मागाहून राणीनें देखील उघड रीतीनें माणसांची व पैशांची पुष्कळ मदत केली होती. शिवाय इंग्रजी खलाशी लोक अमेरिकेंतील स्पेनच्या संस्थानांस चांच्याप्रमाणें लुटूं लागले होते. रोमन कॅथॉलिक लोक सर्व ठिकाणीं असें मानीत होते कीं इंग्लंडच्या गादीवर खरा हक्क मेरीचाच होता. ह्या सर्व गोष्टींचा सूड उगविण्यासाठीं आतां स्पेनच्या राजानें इंग्लंडच काबीज करण्याची मसलत केली. त्यानें असा देखील विचार केला कीं प्रॉटेस्टंट मताच्या या स्तंभास मोडून टाकलें तर दुसऱ्याचा समाचार घेण्यास वेळ लागणार नाहीं. यावेळीं स्पेनचें राज्य यूरोपांत सर्वांत जास्त शक्तिमान होतें आणि त्यानें आपलें सर्व बळ खर्चून इंग्लंडवर स्वारी करण्याची तयारी केली. जगांत पूर्वीं कधींहीं बनविलीं नसतील अशीं मोठमोठीं लढाऊ जहाजें त्यानें बांधलीं, आणि त्यांत वीस हजार अनुभवी व शूर

शिपाई भरले. या आरमाराचें " अजिंक्य आरमार " असें नांव पाडलें व धर्मकृत्याचें मोठें अवडंबर करून इ. स. १५५८ त त्यास लिस्बनहून रवाना केलें. बेत असा होता कीं, हें अजिंक्य आरमार या बाजूनें इंग्लंडच्या खाडींत जाऊन पोंचलें कीं, नेदर्लंडकडे जें तीस हजार लष्कर गोळा केलें होतें तें घेऊन पार्मा नांवाच्या सर्व यूरोपखंडांत प्रसिद्ध असलेल्या सेनापतीनें त्यास येऊन मिळावें. या शूर सेनापतीस या स्वारीचें नायकत्व दिलें. या स्वारीची बातमी ऐकून इंग्लंडचे लोक प्रथम तर घाबरून गेले, परंतु मागाहून त्यांनीं एकजुटीनें बचावाची तयारी करण्यास सुरुवात केली. यावेळीं इंग्लंडचें आरमार लहान होतें, परंतु सगळ्या व्यापाऱ्यांनीं आपली जहाजें आतां सरकारच्या स्वाधीन केलीं. श्रीमंत लोकांनीं न मागतां पाहिजे तितके पैसे दिले, व सर्व लोक देशरक्षणासाठीं हत्यार घेऊन उठले. रोमन कॅथॉलिक लोक जरी या राणीच्या जुलुमानें हैराण झाले होते, तरी पण या प्रसंगीं तर परदेशी लोकांस मारून टाका अशीच ओरड करीत त्यांत तनमनधनानें सामील झाले. अशी जेथें खरी देशभक्ति असते तेथें परमेश्वर कृपादृष्टीनें पाहिल्याशिवाय रहात नाहीं. लिस्बनहून जें आरमार निघालें होतें, त्यास मुहूर्तच तुफानाचा झाला, व त्यामुळें फार नुकसान झालें. त्याची डागडुजी करण्यास एका बंदरांत दीड महिना लागला. तरी पण अजून तें आरमार भयंकर होतें. तें इंग्लिश खाडींत

शिरलें, तेव्हां त्याच्यामुळें सात मैल समुद्र धनुष्याकृतीप्रमाणें झांकला गेला. इंग्रजी आरमाराचा उपरी ॲडमिरल हॉवर्ड हा आपस्य तयारींतच होता. या मोठया राक्षसी सैन्यापुढें टिकाव लागेल असें नसल्यानें त्यानें त्यास इंग्लंडच्या खाडींत येऊं दीलें, व मागाहून धांवपळीची लढाई चालविली. अशा तऱ्हेच्या लढाईंत स्पॅनिअर्डांचीं मोठीं जहाजें पार्मानें अगोदर सांगितल्याप्रमाणें उलट नुकसानकारक झालीं. तीं जहाजें जलद फिरत नसत, व तीं स्थीर उभी राहीपर्यंत विरुद्ध पक्षाचे तोफेचे गोळे बिनचूक एकामागून एक येऊन त्यांचा नाश करीत, तेव्हां यांचे गोळे इंग्रजी जहाजाच्या डोक्यावरून कुठल्या कुठें जाऊन षडत; आणि असें होऊं नये ह्मणून ते जहाज फिरवीत, इतक्यांत इंग्रजांची जहाजें पळून दूर जात. सारांश, इंग्रजांचीं जहाजें लहान असल्यानें समुद्रांत माशासारखीं खेळत, शत्रूस खूप हैराण करीत, व इतक्यांत एखादें जहाज एकटें दिसलें कीं पटकन त्यास पकडीत. अशा रीतीनें दुःख पावून अजिंक्य आरमार कॅलेच्या खाडीपर्यंत हटलें. पार्मा येऊन मिळे पर्यंत त्यानें तेथेंच थांबण्याचा विचार केला. पण पार्मास येण्यासाठीं मूळपासूनच होड्यांचा चांगला बंदोबस्त नव्हता, तरीही त्यानें येण्याची खटपट केली, पण इंग्रजांशीं मित्रत्वानें असणाऱ्या हॉलंडचीं जहाजें त्यास येऊं देत नव्हतीं.

कॅलेच्या बंदरांत अशारीतीनें वाट पहात स्पॅनिअर्ड आरमार उभें असतां हॉवर्डनें रात्रीं अचानक आतषबाजी भरलेलीं सहा जहाजें

पेटवून त्या बाजूस दवडविलीं. या युक्तीनें शत्रूचीं कित्येक जहाजें पेटलीं, व त्यामुळें घाबरून सर्वांनीं नांगर काढून पळण्यास सुरवात केली. इतक्यांत पूर्वेकडील वारा सुटल्यामुळें तीं जहाजें त्या बाजूस वळलीं. त्यामुळें मोठा हाहाःकार उडाला. कित्येक जहाजें एकमेकांवर आपटून फुटलीं, कित्येक किनाऱ्यास लागलीं, कित्येकांचा पाठलाग करून इंग्रजांनीं नाश केला, व बाकीचीं घाईघाईनें जर्मन समुद्रांत पळून गेलीं. तेथून ग्रेटब्रीटनास प्रदक्षिणा घालून स्पेनला जाण्याचा त्यांनीं विचार केला. परंतु स्कॉटलंडच्या उत्तरेपर्यंत जातांच असें तुफान झालें कीं बहुतेक जहाजें फुटून गेलीं. उरलेलीं जहाजें स्पेनला पोंचलीं तेव्हां या अजिंक्य आरमाराचा तिसरा हिस्सा देखील सुखरूप परत आलेला दिसला नाहीं. या जयाच्या बातमीनें इंग्लडांत सगळीकडे आनंदी आनंद झाला. राणीनें मोठया देवळांत जाऊन ईश्वराचें जाहीर स्तवन केलें. या गोष्टीच्या स्मरणार्थ राणीनें एक चांद तयार करविला व त्यात इतकेंच लिहिलें कीं " इश्वरानें वारा सोडला व शत्रूचा नाश झाला. " यावरून तुह्मी पहाल कीं, इलिझाबेथ इतकी स्थीर बुद्धीची होती, कीं एवढ्या मोठ्या जयानें देखील चढून न जातां तिनें सर्व यश ईश्वरासच दिलें.

---

# प्रकरण १६ वें.

## पंधराव्या व सोळाव्या शतकांतील इंग्लंडची उन्नति.

या काळची मुख्य महत्वाची गोष्ट म्हटली ह्मणजे धर्म सुधारणा होय. तिच्याविषयीं आपण मधें मधें कांहीं कांहीं सांगितलेंच आहे. आणि पुढें त्याचें निराळ्या प्रकरणांतच वर्णन करण्याचा विचार आहे तरी, या ठिकाणीं इतकें पुन्हा सांगितलें पाहिजे कीं, सोळाव्या शतकाच्या शेवटीं धर्मोद्धारचें काम पुरें झालें होतें व यापुढें इंग्लंड देश पोपच्या जाळ्यांतून जो बाहेर पडला तो यावच्चंद्र दिवाकरौ.

विद्येसंबधीं देखील हा काल इंग्लंडच्या इतिहासांत महत्वाचा आहे. सोळाव्या शतकाच्या शेवटीं शेक्सपिअर नामक कवीनें अशीं नाटकें लिहिलीं कीं त्यांची जगतांत जोडीच नाहीं. पदार्थविज्ञानाचा शोध कशा रीतीनें करावा या बाबतींत सर फ्रॉन्सिस बेकन नांवाच्या एका तत्ववेत्यानें एक असें अनुपम शास्त्र रचलें आहे कीं ज्याच्या प्रतापानें हल्लींचे हे सर्व शोध झाले आहेत. आणि ह्मणून हल्लींच्या सर्व पदार्थविज्ञानांचा त्यास पिता ह्मणतात हें वाजवीच आहे. स्पेन्सर, बेन जॉन्सन, वगैरे दुसरे पुष्कळ उत्तम कवी इलिझाबेथच्या राज्यांत होऊन गेले. या काळचें गद्यलेखन देखील पुष्कळ तेजस्वी होतें. हूकर नांवाच्या

एका धर्मगुरूनें प्रौढ भाषेंत जें गद्य लिहिलें आहे तें आज देखील बरेंच वाखाणलें जात आहे. खरोखर, या काळच्या सर्व ग्रंथकारांचा विचार केला तर त्यांच्या इतकें गांभीर्य त्यानंतरच्या सामान्यतः कोणत्याही काळांत अजूनपर्यंत इंग्लंडांत दिसलें नाहीं.

**कलाकौशल्य.**—हें इंग्लंडांत प्रथम या काळापासूनच वाढूं लागलें. पूर्वीं जहाजें बनवितां येत असत, परंतु तीं या काळापासून सुधारलेल्या तऱ्हेचीं बनूं लागलीं, व इलिझाबेथच्या काळापासून तर इंग्लंडचें नौकाबळ प्रसिद्धीस आलें. याच वेळीं शेतीभाता सुधरली, आणि बटाटे, गाजरें वगैरे अनेक नव्या वस्तूंची लागवड सफळ होऊं लागली. रेशीम विणण्याची कला प्रथम इंग्लंडांत धार्मिक दुःखामुळें फ्लँडर्स मधून पळून आलेल्या कारागिरांनीं इंग्रजांस शिकविली. मोजे विणण्याची कला देखील याचवेळीं शोधून काढण्यांत आली. मोजे बनविण्याचें काम इलिझाबेथच्या राज्यांत निघालें, आणि याच राणीनें प्रथम मोजे घातले. याच राणीसाठीं इंग्लंडांत प्रथम गाडी तयार झाली, आणि रुपये पाडण्याचें यंत्र काढण्यांत आलें.

व्यापार उद्योगास तर यावेळीं कांहीं अजबच वेग अचानक मिळाला होता. पंधराव्या शतकांत कोलंबसानें व वास्कोदिगामानें जे महासागरांचे रस्ते शोधून काढले ते पाहून यूरोपच्या सर्व लोकांस समुद्रमार्गानें व्यापार करण्याची फार हौस आली. इंग्लंडच्या राजांनीं त्या कामांत विशेष मदत केली नाहीं, परंतु लोक

आपण होऊनच स्वतःच्या खर्चानें जहाजें बनवून दुनियेंत चहूंकडे फिरूं लागले. एक उत्तर वधृाच्या बाजूनें हिंदुस्थानचा मार्ग शोधण्यास निघाला, तर दुसऱ्यानें आर्केंजल बंदरांत जाऊन रशियाबरोबरचा व्यापार प्रथम सुरू केला. सर फ्रान्सिस ड्रेकनें तर सबंद पृथ्वीस प्रदाक्षिणा घातली. सर वॉल्टर रॅलेनें उत्तर अमेरिकेच्या भूमीवर कित्येक इंग्रजांस नेऊन तेथें प्रथम वसाहत केली, व त्या मुलुखाचें नांव अपल्या कुमारिका राणीवरून व्हर्जिनिया असें पाडलें. एका महादुष्ट व्यापाराचा देखील पाया सर जॉन हॉकिन्स नामक इंग्रजानें घातला. आफ्रिकेच्या किनाऱ्यावर उतरून त्यानें तेथील वतनदार हबशांस पकडलें, आणि अमेरिकेंत जाऊन तेथील स्पॅनिश संस्थानिकांस त्यांस गुलाम म्हणून विकलें. या काळीं जहाजांतून व्यापार करणारे पुष्कळ इंग्रज लोक समुद्रांतून प्रवास करीत होते त्यांत एक हेतू चांचेपणा करण्याचा देखील होता खरा

यावेळीं अमेरिकेंतून बटाटे व तंबाखू, व चिनचा चहा प्रथम इंग्लंडांत आला.

ईस्ट इंडिया कंपनी हिंदुस्थान व पुर्वेकडील देशांबरोबर व्यापार करण्यास प्रथम स्थापली घेली, ही आपणांस सर्वांत विषेश जाणण्यालायक गोष्ट आहे. यावेळीं सर्व धंदे इजाऱ्यानें चालत असत, त्याप्रमाणें इलिझाबेथनें या कंपनीस हिंदुस्थानबरोबर व्यापार करण्याचा पट्टा इ. स. १६०० त दिला.

वैश्य लोक अशा वैश्य काळांत जोरावर आलेच पाहिजेत, व त्याप्रमाणेंच या शतकांत झालें. वर ज्या विशेष उच वैश्य

कर्मीचें वर्णन केलें तीं तर खरोखर वैश्यांनीं नव्हे, परंतु तीं काळास अनुसरून वैश्यवृत्तींत तल्लीन झालेल्या क्षत्रीयांनींच केलीं होतीं, कारण यावेळीं यूरोपांत जुनी रजपुती ( chivalry ) निघून जाऊन वैश्य बुद्धीचा ऋतु बसला होता. यापुढें प्रेमशौर्य-भक्ति जाऊन लक्ष्मीदेवीची भक्ति जोरांत आली व त्यांतहि इंग्रज लोकांचें साहस व उत्साह हीं निदर्शनास आलीं. त्यांत भाग घेणार प्रथम तर क्षत्रीयच असले पाहिजेत, तरी पण वैश्य लोक यावेळीं फार उन्नतीस पोंचले होते.

तेराव्या शतकांत आपण पाहिलें तेव्हां वैश्य लोक पूर्णपणें शूद्रतेंतच रावत होते; परंतु जसजसें पैशाचें बळ वाढत गेलें तसतसे ते आपली अधम स्थिती समजूं लागले. तालुकदारांच्या जुलुमाशीं टिकाव धरण्यासाठीं ते मूळपासूनच आपापली जात व समाज बांधून राहिले होते. आणि मोठ्या गांवांत तर दरेक समाजा तर्फे एक दोन माणसें एकत्र होऊन महाजन मंडळाची स्थापना करण्याचा रिवाज पडला. समाजाच्या वहिवाटी व हुकुमाप्रमाणें सर्व कारागीर वागत, व त्याप्रमाणें न चालेल त्यास ते जाती बाहेर टाकीत. जसजसे नवे धंदे निघूं लागले, तसतशी अशा समाजांची संख्या वाढत गेली. इ. स. १३७६ त लंडनांत ४५ समाज ह्मणजे ४५ जातीचे निरानिराळे धंदे होते, व त्या सर्वांतर्फे एक महाजन मंडळ होतें. असा एकोपा केल्यानें कारागिरांची सत्ता देखील पैशांबरोबर वाढत चालली. पंधराव्या शतकांत

सर्व यूरोप खंडांत असले समाज ठिकठिकाणीं वाढले, व ते स्वतः-च्या हक्कांसाठीं तालुकदारांबरोबर देखील भांडूं लागले. इंग्लंडांत तर तालुकदार "गुलाबाच्या लढाई" पासून निर्बल झाले होते, व त्यांस या युगाचा धक्का फार लागला. फ्यूडल सिस्टिम बंद पडली व वैश्य लोक स्वतंत्र झाले, इतकेंच नव्हे तर त्यांनीं राज्यांत बरीच सत्ता मिळविली.

मध्यम वर्गाची उत्पत्ती—वैश्य लोकांच्या उच्च भागाबरो-बर नाईट मिसळले गेले, व अशा रीतीनें जो एक वर्ग उत्पन्न झाला तो मध्यम वर्ग या नांवानें ओळखला जाऊं लागला. मोठ-मोठे शेटसावकार, व्यापारी, धंदेवाले व मूळचे नाईट हे सगळे या वर्गांत गणले जातात. या पुढें इंग्लंडांत हाच वर्ग पुढें पडूं लागला. व देशाच्या स्वातंत्र्यासाठीं राजाबरोबर लढण्याचें काम त्याच्याच माथीं आलें, कारण तालुकदार तर आत्मसंरक्षणाच्या स्वाभाविक इच्छेनें केव्हांचे या वैश्य वर्गास वाढत असलेला पाहून राजाच्या पक्षास जाऊन मिळाले होते. या पुढें तुह्मी इंग्लंडच्या इतिहासांत पहाल तर सरदारांची सभा ( हाउस ऑफ लॉर्ड्स् ) राजाच्या पक्षाची व हाऊस ऑफ कॉमन्स ही लोकांच्या स्वा-तंत्र्यासाठीं झटणारी सभा होती असेंच तुह्मांस दिसेल. हें जंगी काम प्रथमच या मध्यम वर्गावर येऊन पडल्यानें, त्यांस तें बरोबर बजावितां आलें नाहीं, व अर्थातच राजाची सत्ता कांहीं काळ-पर्यंत फार वाढली; परंतु सोळाव्या शतकाच्या शेवटीं ते तरबेज

झाले, व पुढें त्यांच्या शरीरांत धर्माग्रहाचें तत्व मिसळल्यानें त्यांनीं कसे पराक्रम केले ते या नंतरच्या इंग्लंडच्या इतिहासांतील दरेक पानांत लिहिलेलें आहे.

राजाचा आपसत्तीपणा या कालांत मर्यादेबाहेर जाण्याच्या बेतांत होता. एका राजाच्या हुकुमानें सर्व देशाचा धर्म बदलून गेला या एकाच गोष्टीवरून राजांची सत्ता किती वाढली होती हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल. पूर्वीपासूनच स्टार चेंबर नांवाची एक न्यायसभा होती खरी, परंतु तिची सत्ता सातव्या हेन्रीनें इतकी वाढविली कीं सर्व जुने कायदेकानू अमलांत असून देखील रयत पराधीन होऊन गेली. त्या न्यायसभेचें काम गुप्तपणें चाले व तिच्या विरुद्ध दाद किंवा फिर्याद चालत नसे. प्रथम ही न्यायसभा राजद्रोह्यांसाठीं होती, परंतु नंतर तिच्या द्वारें राजे मर्जीस येईल त्यास पिडूं लागले. कोणा सावकाराकडे सरकारानें पैसे मागितले व ते त्यानें नाहीं म्हटले कीं लगेच त्याला या सभेंत पकडून आणवून ताळ्यावर आणीत. ट्यूडर काळांत खजिना रिकामा झाला कीं तो भरण्याचा हाच एक सामान्य मार्ग झाला होता; मग इलिझाबेथ सारखी शहाणी राणी असली कीं मानमरातबासह रुपये परत करी, व सातव्या हेन्री सारखा राजा असला कीं त्याचा दुरुपयोग करून सावकारास तुरुंगांत टाकी तें निराळें. या न्यायसभेस देहान्त शिक्षा करण्याचा, व जमीन जप्त करण्याचा अधिकार नव्हता. तरी पण त्यांत कांहीं अर्थ नव्हता,

कारण देहान्त शिक्षेयोग्य काम उघड व कायदेशीर रीतीनें चाले दुसऱ्या न्यायसभेंत, परंतु तिच्यांतील पंचापैकीं सरकारच्या विरुद्ध बोलेल कोण ? जर कोणी बोलला, तर त्यास दुसऱ्या दिवशीं स्टार चेंबरमध्यें खेंचून आणून दंड अगर कैद केलाच. यामुळें पंचांतील वहुतेक लोक सरकारचा रोंख पाहूनच आपला अभिप्राय देत, व म्हणून कोणासही लुटणें व मारून टाकणें सरकारास कठीण पडत नसे. खरोखर ट्यूडर वंशाचे राजे आपल्या देशांतील राजांसारखेच आपसत्ती झाले होते. फरक इतकाच होता कीं त्यांस अशा गोष्टीस खरें खोटें न्यायाचें स्वरूप देणें भाग पडे; तें कांहींच नाहीं तरी थोडेसें बंधन राहिलें होतें खरें. मार म्हणतांच मारून टाकण्यापेक्षां हें निःसंशय अधिक चांगलें. वेळेला साक्षी, पंच किंवा न्यायाधीश सत्यवादी निघाला कीं राजाचा हेतू मनांतच राही, व तसें न झालें तरी न्यायास विलंब लागला कीं आरोपी जरासा बचला कीं पुराच बचला असेंही कित्येक वेळीं होत असे. त्यामुळें हा अंकुश देखील ट्यूडर वंशाच्या राजांस डोळ्यास बांधलेल्या पट्ट्याप्रमाणें वाटे. आणि त्यांतून सुटण्यासाठीं राज्यांत पूर्णपणें शांती असतां कित्येक वर्षेंपर्यंत इलिझाबेथनें लंडनांत लष्करी कायदा चालविला होता.

पार्लमेंट या वेळीं नसल्यासारखेंच झालें होतें. मोठ्या करारनाम्याचें कोणी नांव देखील घेत नव्हता. राजे पार्लमेंटास विचारल्याशिवाय हुकूम काढीत व ते कायद्यांप्रमाणें मानले जात.

तरी पण पार्लमेंटची सत्ता अजीबात गेली नव्हती. अजून देखील पार्लमेंटच्या संमती शिवाय कर घेववत नव्हतेच, व असें होतें ह्मणूनच स्टार चेंबर मार्फत सावकारांस त्रास देण्याची जरूर पडे. तसेंच मागाहून पार्लमेंटनें प्लँटॅजिनेट काळाच्या इतकें नाहीं, तरी बरेंच पाणी इलिझाबेथच्या वेळीं दाखविलें. गादीसाठीं तंटे होऊं नयेत ह्मणून त्यांच्या मनांत असें होतें कीं राणीनें लग्न करावें. परंतु तुम्हांस त्या बाबतींशीं काय करावयाचें आहे असें म्हणून राणीनें त्यांस गुपचुप केलें होतें तरी पण त्यांनीं दोन चार वेळ या बाबतीचा पिच्छा पुरविला, आणि जेव्हां तिनें तिकडे दुर्लक्ष्य केलें, तेव्हां तुमच्या मागून गादी कोणास द्यावी याचा ठराव करा अशी विनंति ते तिला नाइलाजानें वरचेवर करूं लागले. तसेंच राणीनें धर्मासंबंधी कायदा काढला होता त्या विरुद्ध एक वेळ कोणी खूब बोलला, त्यास पार्लमेंटांत बसण्याचा राणीनें मनाई हुकूम केला, त्यावरून सर्व सभासद रागावले व त्यांनीं ठराव केला कीं राजद्रोहाशिवाय सर्व गोष्टींची चर्चा किंवा विनंति करण्याचा आणि राजगादी कोणास द्यावी तेथपर्यंत देखील ठराव करण्याचा अधिकार पार्लमेंटास आहे व त्यांत राजास अटकाव करतांच येणार नाहीं. परंतु ते अशा तऱ्हेची तक्रार करावयास येण्यापूर्वीच इलिझाबेथनें त्या सभासदाबद्दलचा आपला मनाई हुकूम फिरविला आणि त्यास तिनें सभेंत बसूं दिलें. त्याचप्रमाणें एक वेळ जमाबंदी खात्यांत पुष्कळ लबाडी पाहून त्या अमलदारांसंबंधीं पार्लमेंट

कायदा पसार करूं लागले, तेव्हां माझ्या नोकरांस तुम्ही विचारणार कोण असें ह्मणून राणीनें पुष्कळ थयथयाट केला, परंतु ते भ्याले नाहींत, आणि शेवटीं यावेळीं देखील समजून जाऊन. राणीनें सांगितलें कीं तुमच्या ह्मणण्याप्रमाणें मी बंदोबस्त करीन. शिवाय एक वेळ इजारदारांस दिलेल्या सनदा पार्लमेंटनें राणीबरोबर भांडून रद्द करविल्या होत्या. इतकें होतें तरी पार्लमेंट पुष्कळ वेळ बोलूं शकत नसे हें खरें, कारण त्यांच्यांतील पुष्कळजण सरकारचे दबेल व खुशामत करणारे होते. सरकार आपले आश्रित पार्लमेंटच्या निवडणुकींत निवडून यावे ह्मणून आपलें वजन खर्च करी. फक्त एक नव्या प्यूरिटन पंथांतील लोक स्वतंत्र, शूर व सत्यासाठीं मरणारे असे होते. सत्यासाठीं मरणाऱ्या या शूर लोकांनीं यानंतर जो गहजब केला तो पुढें सांगण्यांत येईल.

---

## प्रकरण १७ वें.

### आजपर्यंतची यु॰ोपची धर्मस्थिती.

ख्रिस्ती धर्माची उत्पत्ती इतर धर्माप्रमाणें आशिया खंडांतच झाली असून तो धर्म हल्लीं यूरोप खंडाचें एक विशेष लक्षण झाला आहे. तुर्कस्थानच्या पॅलेस्टाईन प्रांतांत १९२० वर्षांपूर्वीं येशू* ख्रिस्ताचा जन्म बेटले हॅम नांवाच्या एका खेड्यांत झाला. त्या वेळीं तेथें यहुदी धर्म प्रचारांत होता; त्यांत कर्मयोगाचें अवडंबर

माजून ज्ञानभक्ति नाहीं सारखीच झाली होती. येशू ख्रिस्त स्वतः कर्ममार्ग पाळून लोकांस उपदेश करूं लागला कीं, धर्मभक्ति ही एक फार महत्वाची बाबत आहे. तो केवळ बारा वर्षांचा असतांना एक वेळ जेरूसलेम येथील मोठ्या देवळांत जाऊन तेथील आचार्य व शास्त्री वगैरे लोकांबरोबर वादविवाद करून त्यांस त्यानें निरुत्तर केलें. आपलें महात्म्य नाहींसें करणारा हा कोणी महापुरूष उत्पन्न झाला आहे असें त्यांस वाटलें. यानंतर तीस वर्षांचा होई पर्यंत येशू कोठें होता व काय करीत होता तें समजत नाहीं. पुढें जलसांप्रदायक जॉन नांवाचा एक साधु त्यास भेटला, व त्यानें त्यास जॉर्डन नदींत जलदीक्षा दिली; व त्या वेळेपासून येशूनें भक्तिमार्गाची स्थापना करण्यास

---

* याच्या आईचें नांव मारियम ह्मणजे मेरी असें होतें. तिचें यूसफ नांवाच्या एका सुताराबरोबर लग्न झालें होतें, पण असें सांगतात कीं, त्याच्या घरीं जाण्यापूर्वी तिला गर्भ राहिला होता. त्यामुळें त्यानें तिला घरांत घेण्याचें नाकारलें, तेव्हां एका फिरस्त्यानें येऊन त्याचें समाधान केलें कीं तो गर्भ ह्मणजे पवित्र आत्म्याच्या पोटचा मुलगा आहे. ही बातमी ऐकून जूडियाचा राजा हेरड घाबरला. कारण यहुदी लोकांचा त्राता कुमारिकेच्या पोटीं जन्मास येणार असल्याबद्दलचें भविष्य त्यास माहित होतें, व त्यामुळें त्यानें दोन वर्षांच्या आंतील सर्व मुलें आसपासच्या खेड्यांतून हुडकून काढून मारून टाकविलीं. यामुळें येशूचे आईबाप त्यास घेऊन, एका फिरस्त्याच्या सूचनेवरून, कोणी सांगतात कीं, मिसर देशांत पळून गेले, व कोणी सांगतात कीं तिथल्याच गॅलिली प्रांतांत स्वतःचें नॅझरेथ नांवाचें वतन होतें तेथें जाऊन राहिले.

निःशंकपणें सुरुवात केली. या वेळीं त्यानें पुष्कळ चमत्कार करून दाखावले असें ह्मणतात. शुद्ध, निरभिमानी व पूर्ण करुणायुक्त अशी त्याची रहाणी हाच एक मोठा चमत्कार होता. त्याच्या वाणींत असें कांहीं पारमार्थिक सत्य होतें कीं ती जो कोणी ऐके त्याचा आत्मा जागृत होऊन आपणच हुंकार देई. या मुळें त्याचा चांगलाच जम बसूं लागला, व जुने धर्मगुरु भिऊन जाऊन येशू हा धर्माचा उच्छेद करावयास निघाला आहे असें लोकांस सांगूं लागले. पुढें लोकांनीं येशू ख्रिस्तास पकडून व त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यास त्या प्रांतांतील रोमन सुभा पॉन्टिअस पायलेट याजपुढें उभें केलें. पॉन्टिअस यास तो गुन्हा त्याच्यावर शाबीत झालेला वाटला नाहीं, परंतु लोकांस शांत करण्यासाठीं त्यास सुळावर देण्याचा त्यानें हुकूम केला, व तो हुकूम खूब दुष्टपणानें अमलांत आणला. असें सांगतात कीं येशू तिसऱ्या दिवशीं आपल्या थडग्यांतून उठला, व चाळीस दिवस पर्यंत आपल्या भक्तांस वरचेवर दर्शन देऊन त्यानें त्यांस आपला धर्म जगांत फैलावण्याबद्दल उपदेश केला. अशा रीतीनें ३३ वर्षांच्या लहान वयांत येशू ख्रिस्त सुळावर गेला, परंतु त्यानें ज्या धर्माचें बीं पेरलें तें थोड्या वेळांत उगून त्याचा ठिकठिकाणीं प्रसार झाला.

ख्रिस्ती धर्माचा प्रसार तो स्थापणाऱ्याच्या भयंकर मृत्यूचीच वाट पहात होता असें वाटतें. ख्रिस्ताचे चेले, ज्यांत बाराजण मुख्य होते, ते देशोदेशीं फिरूं लागले. रोमनें जगांतील

बहुतेक सर्व राज्यांचें जें ऐक्य करून टाकलें होतें, तें या ख्रिस्ती धर्मप्रसारकांस फार उपयोगी पडलें. यावेळीं पाश्चिमात्य लोकांच्या धर्मसमजुती या नास्तिक पंडितांच्या उपदेशानें इतक्या संशयग्रस्त झाल्या होत्या कीं, लोकांस आत्म्याच्या शांतीसाठीं कोणत्याही भक्तिमार्गाची खरोखरच जरूर होती, त्यामुळें या नव्या उपदेशकांनीं जें कांहीं सांगितलें तें लोकांनीं मोठ्या आनंदानें मान्य केलें व पूर्वापार धर्म सोडून लोकांचे थवेच्याथवे या नव्या पंथास येऊन मिळूं लागले. येशू ख्रिस्तास मरून ४० वर्षें झालीं नाहींत तोंच त्याचा धर्म तुर्कस्तान, ग्रीस, इताली, मिसर वगैरे अनेक देशांत पूर्णपणें स्थापन झाला. इतकी गोष्ट खरी कीं अजून हा धर्म नीच वर्णांतच होता; सुशिक्षित व उच्च वर्णांतील लोक त्याची टर करीत. जेव्हां तो धर्म रोममध्यें जोरावूं लागला, तेव्हां पॉल व पिटर नांवाच्या येशूच्या दोघां मोठ्या अनुयायांस तेथील अधिकाऱ्यांनीं एकदम देहान्त शिक्षा केली. ( इ. स. ६८ ). परंतु नंतर सुशिक्षित लोक देखील त्या धर्मांत सामील होऊं लागले, व रोमन बादशहानेंच जलसंस्कार करून घेतला. यावेळेपासून ख्रिस्ती धर्म हा राजधर्म झाला, आणि नंतर कांहीं वर्षांनीं आपण हल्लीं बघत आहोंत त्याप्रमाणें तो सबंद यूरोप खंडांत एक सामान्य धर्म बनला. आशिया व आफ्रिका खंडांत त्याचा प्रसार मूळपासूनच फार कमी प्रमाणांत होता, व तोही सातव्या शतकांत उदयास आलेल्या महंमदी धर्मानें बहुतेक नष्ट केला.

**रोमचा आचार्यः**—येशू ख्रिस्तानें कोणासही आचार्यपद दिलें नव्हतें, व त्याच्या बारा शिष्यांपैकीं कोणीही त्याबद्दल तक्रार केली नाहीं. ते जेथें जात तेथें धर्मसमाजच स्थापन करीत. ते समाज सारख्याच दर्जाचे गणले जात, परंतु ज्या समाजांचें नेतृत्व येशूच्या शिष्यांच्या हातीं असे, त्यांस दुसरे समाज मान देत, आणि एखाद्या बाबतींत तंटा उपस्थित झाल्यास त्यांचें मत विचारलें जाई. यामुळें हळुहळु जेरुसलेम, अँटिओक, रोम, व सिकांड्रिया येथील धर्मसमाज सर्वांत मोठे मानले जाऊं लागले, आणि त्यांत रोम तर जगाची राजधानी असल्यानें तेथील धर्मगुरु सर्वांत श्रेष्ठ मानला गेला. त्यामुळें त्याचा लोभ वाढला, व तो आपणास श्रेष्ठ ह्मणविण्याऐवजीं सर्वांचा उपरी ह्मणवूं लागला. हें ह्मणणें ग्रीस-कडच्या धर्मगुरूंस रुचलें नाहीं. त्यांच्या समाजास अथवा पंथास "पूर्वेकडील" पंथ असें नांव पडलें. रशिया, तुर्कस्थान वगैरे देशांतील ख्रिस्ती लोक आज देखील या पूर्वेकडील पंथाचे आहेत. पश्चिमेकडील सर्व समाज तर या पुढें रोमच्या धर्मगुरूस जगद्गुरु ह्मणूं लागले. यासच नंतर पोप ह्मणण्याचा प्रघात पडला.

**पोपास राजवैभवाची प्राप्तीः**—यावेळीं यूरोपांत गाढ-अज्ञानांधकार असल्यामुळें या धर्माचार्याची सत्ता बरीच वाढली. रूमशामची बादशाही अगदीं निकृष्ट स्थितीस येऊन पोंचलेली पाहून या जगद्गुरूनें त्याचा इतालींतील कित्येक भाग आपल्या हस्तगत करून घेतला. फ्रान्समध्यें पेपिन नामक एक बळवान् हुजऱ्या

राजगादी बळकावून बसला होता. त्यानें लोकांस खूष ठेवण्यासाठीं आपणास राज्याभिषेक करण्याची पोपास विनंति केली. ती विनंति मान्य करून पोपनें जगास दर्शविलें कीं, पोप मर्जीस येईल त्यास राज्य देऊं शकतो व मर्जीस येईल त्याचें घेऊं शकतो. या उपकाराच्या बदल्यांत पेपिन यानें लॉंबर्ड लोकांनीं ग्रीक पादशाहीचा जो मुलुख बळकाविला होता तो जिंकून पोपास नजर केला. अशा रीतीनें धर्मश्री बरोबर राज्यश्री देखील रोमच्या गादीस प्राप्त झाली. त्यामुळें त्यास गर्व झाल्यास त्यांत आश्चर्य कसलें? यापुढें रोम हें धर्माऐवजीं महा अधर्माचें स्थळ झालें. राजवैभव मिळतांच धर्माध्यक्षाच्या अंगीं दुर्व्यसनांचा संचार झाला, आणि जगतांत रोमची फजिती होऊं लागली. या वेळीं कोणा दोन कुलटांनीं सर्व लोकांस असें भारलें होतें कीं त्यांच्या मर्जीस येईल त्यास ही धर्माध्यक्षाची गादी मिळे. याच वेळीं, असें सांगतात कीं, एका व्यभिचारिणी स्त्रीस स्त्रैण धर्माधिकाऱ्यांनीं पोपच्या गादीवर बसविलें, परंतु एका समारंभांत जाते वेळीं ती प्रसूत झाल्यानें लोकांत तिची पुरी फजिती झाली.

**पोपची सार्वभौमसत्ता**—रोमच्या धर्माधिकाऱ्यांचे असे ढंग पाहून जर्मनीचा बादशहा मध्यें पडला, व त्यानें पोपची नेमणूक आपल्या हातीं घेतली. पण त्याचा परिणाम उलट झाला; कारण आतां पोपास बादशहाची ऊब मिळतांच तो धर्माच्या नांवावर इतर देशांच्या राजांस फार त्रास देऊं लागला, आणि त्याचें

महत्व राजकारणांत सचंद यूरोपांत वाढलें. इतक्यांत हील्डब्रँड नांवाचा एक महत्त्वाकांक्षी व अपूर्व बुद्धीचा पोप होऊन गेला. त्यानें सार्वभौम सत्ता आपल्या हातीं घेण्याची मोठी मसलत केली. कोणाही पाद्र्यानें लग्न करूं नये, असा कायदा करून ज्यांनीं लग्नें केलीं होतीं त्यांच्या बायकांस त्यानें हांकून लाविलें. यामुळें धर्मगुरूंत अनीतीचें बीं पेरलें गेलें. परंतु त्याबरोबरच हील्डब्रँड याचा हेतूही सफल झाला. पाद्री लोकांस आतां घरदार नाहींसें झाल्यामुळें धर्मसमाजासच ते आपलें घरदार समजूं लागले, आणि त्याच्या उत्कर्षासाठीं ते तनमनधनानें प्रयत्न करूं लागले. दुसरें काम हील्डब्रँडनें केलें तें हें कीं आतांपर्यंत देशोदेशींचे राजे पाद्र्यांची नेमणूक स्वतः करीत, ती सत्ता युक्तिप्रयुक्तीनें त्यानें आपल्या हातांत घेतली. नंतर, पाद्र्यांचा न्याय राजास करतां येऊं नये असें त्यानें ठरविलें. अशा रीतीनें धर्म खात्याची सर्व व्यवस्था त्यांनीं आपल्या हातांत घेतल्या नंतर पोप वाटेल त्यास धर्माबाहेर काढूं लागले, आणि त्यामुळें सर्व देशांचे राजे व रंक त्यांचे ताबेदार बनले. सदाचाराचा बोध करणाऱ्या सच्छील येशू ख्रिस्ताचा धर्मसमाज, जो प्रथम ऐक्य भावनेनें स्थापन झाला होता, त्यांत आतां अशा रीतीनें एक माणूस निरंकुश आचार्य, मदोन्मत्त धनी, व राजाचा राजा झाला.

पोपच्या या भयंकर सत्तेंत जें बाकी होतें तें इ. स. १२५१ त पुरें झालें. त्या वर्षीं धर्मसमीक्षणे ( Inquisition ) चा प्रघात

पडला. अनास्थिक ह्मणजे पोपनें सांगितलेला धर्म न मानणाऱ्या लोकांची बातमी काढून त्यांस मनास येईल त्याप्रमाणें जाळून टाकण्याचा अधिकार असणारें तें एक भयंकर खातें होतें व त्याचें सर्व सूत्र पोपच्या हातीं होतें. हें पाहून मोठमोठे धर्माधिकारी आश्चर्यचकित झाले. अमीर उमराव व राजांस देखील धाक बसला आणि लोक तर त्याचें नांव ऐकूनच थरथर कापूं लागले. आतां पोपच्या धर्मांत अमूक गोष्ट खोटी आहे असें बोलण्याची कोणाची ताकत होती ? पोप ह्मणेल तो धर्म हें पुष्कळ दिवसांपासून मानलें जात होतेंच, त्यांत आतां तर पोपची अदोषता हा कॅथॉलिक पंथाचा मोठ्यांत मोठा सिद्धांत ठरून गेला.

असल्या प्रपंचरूप आचार्यांच्या काळांत धर्मवेडाचें प्राबल्य काय विचारावयाचें ? भ्रमाचें जाळें वाढविण्यांतच ते आपणास कृतकृत्य मानूं लागले. 'धन हरतील, पण राग हरणार नाहींत' अशा तऱ्हेच्या या यूरोपच्या गुरूंनीं, लोकांस यावेळीं अंतःशुद्धि विसरवून केवळ बाह्य धर्माचीच चट लावून दिली होती. बाह्य कर्मांत देखील सुनीतीच्या करणीपेक्षां जड करणीचें महात्म्य फार वाढवून ठेविलें. पाठ, पुजा, व्रतें, उपास, जाग्रण, यात्रा, पातकोच्चारण ( confession ), प्रायश्चित, देहदमन वगैरे हजारों जड कर्मे यावेळीं यूरोपांत मुक्तीची मोठीं साधनें मानलीं जात होतीं. ख्रिस्ती धर्मांत अद्वैत भक्ति सांगितली असतां मरियम मातेची व अनेक

मेलेल्या* साधुसंतांची प्रार्थना करणें, नवस करणें, व आपल्या थडग्याजवळ जत्रा भरविणें हें चांगलें असा या धर्माचार्यांनीं सर्वांस उपदेश केला होता.

मूर्तिपूजा देखील देवळांत मोठ्या थाटानें होत असे. स्मारकभक्ति म्हणजे येशू ख्रिस्त किंवा दुसऱ्या साधुसंताच्या शरीरशेषाची भक्तिभावानें जतन करणें हें सर्वांस शहाणपणाचें वाटे. ही भक्ति म्हणजे त्या वेळीं दगलबाजीनें संपत्ती मिळविण्याचें एक साधन झालें होतें. या धंद्याची मोठी वखार पोपच्या घरीं असे. हें अमक्या संताचें हाड आहे, हें अमूक धर्मोपदेशकाचें नख किंवा केंस आहे, आणि हा तर खुद्द येशू ख्रिस्ताच्या दाढीचा केंस आहे, किंवा हें खुद्द सुळाचें लांकूड आहे असें सांगून लुच्चे लोक लाखो रुपये लुटून घेत. पोपास याहूनही मोठें कमाईचें साधन ह्मणजे पापाची क्षमापत्रें होतीं. अनंत जीवांच्या अनंत पापपुंजांस एका क्षणांत भस्म करून टाकणारें जें येशू ख्रिस्ताचें पुण्यभांडार, तें तर ईश्वरानें पिटरच्या ( रोमच्या ) गादीच्या स्वाधीन करून ठेविलें आहे असें सांगून हे आचार्य प्रायश्चिताचे पैसे घेत,

* ईश्वर किंवा येशू ख्रिस्ताची तर कोणी प्रार्थनाच करीत नसे व प्रत्येकजण ह्मणे कीं कोणत्याही संताच्या वशिल्याशिवाय आपलें कोण ऐकणार ? साहायकाशिवाय ईश्वराचें स्मरण केल्यास कदाचित् तो चिडेल, असें मानून आपल्या इष्ट संतांस प्रसन्न केल्यानंतरच त्याचें नामस्मरण प्रत्येकजण करी, आणि पुष्कळ वेळ तो त्यास विसरूनही जाई; कारण हें संसारी सुख देणारे तर ते साधुसंतच होते अशी प्रत्येकाची समजूत असे.

व पापत्रस्त लोकांस मुक्तीचीं खात्रीपत्रकें लिहून देत. प्रथम तर शंभर शंभर वर्षांनीं रोममध्यें महायात्रा भरत असे, त्यावेळीं क्षमापत्रें देण्यांत येत असत, पण नंतर तर पन्नास, मग तेहतीस व नंतर पंचवीस पंचवीस वर्षांनीं ती यात्रा भरूं लागली; व शेवटीं तर हे दयाळू गुरुमहाराज क्षमापत्रांचे गाडेच्या गाडे भरून गांवोगांव लोकांच्या घरीं पाठवूं लागले, व तीं झपाट्यानें खपवितील असे जबरदस्त दलाल सुद्धां ते ठेवूं लागले. पापक्षमेची किंमत समजण्यासाठीं आपल्या जकात खात्याप्रमाणें त्यांनीं एक पत्रकही प्रगट केलें होतें; त्यांत चोरीची इतकी, खुनाची इतकी, व्यभिचाराची इतकी, बाळहत्येची इतकी, वगैरे दरेक पापाची किंमत सविस्तर लिहून दाखविली होती. मेलेल्या पूर्वजांस अगर नातेवाईकांस पापमुक्त करविणें असल्यास तें पण ईश्वराचा हा दलाल करून देण्यास तयार होता. पैसे मात्र दिले पाहिजेत. सोळाव्या शतकांत तर, पुढें होणाऱ्या पापांबद्दल देखील आगाऊ एकदम माफी मिळूं लागली. अनीतीच्या उत्तेजनास आतां या धर्मगुरूंकडून कांहीं तरी बाकी होतें काय?

धर्मगुरूंची नीति यावेळीं कशी होऊन गेली असेल त्याचा अंदाज वरील हकीकतीवरून तुह्मीं केलाच असेल. ते पूर्णपणें विषयी बनून गेले होते. खेड्यांतले पाद्री पिठ्यांत जात, छाकटे बनत, जुगार खेळत, मारामारी करीत, लोकांचीं घरें फोडीत,

व प्रसंगीं खूनही करीत. ते उघड रीतीनें बाहेरख्यालीपणा करीत, व तशांत मुलें झाल्यास तीं ते घरांत बाळगीत. ही गोष्ट वरिष्ठ धर्माधिकाऱ्यांस माहीत होती. परंतु ते लांच खाऊन तिकडे दुर्लक्ष्य करीत. बोलण्याचें त्यांच्या मनांत आलें तरी तें कोणच्या तोंडानें बोलूं शकतील? कारण त्यांचें आचरण त्या लोकांपेक्षांही नीच होतें. या धर्मगुरूंच्या वर्गांत थोडींच चांगलीं माणसें असतील. साधू लोकांच्या आश्रमांत विविध कुकर्में होत, व चांगल्या स्त्रिया तेथें पाय ठेवण्यास देखील भीत. जोगीणींच्या मठांत देखील अशीच बदफैलीची घाण येत असे.

रोम तर सगळ्या दुराचाराचें आगर झालें होतें व पोप त्याचा मालक होता. रोमच्या साधूंच्या मानानें पाहिलें तर दुसऱ्या देशांचे पाद्री खरोखरच धर्मशील होते. या वेळीं रोमच्या जत्रेस जो कोणी येई त्यास हें धर्माचें कीं अधर्माचें धाम आहे असा विचार पडे. पोप सहावा शिकंदर इतका दुराचारी होता कीं त्यानें वेश्येच्या मुलीबरोबर उघड वाईट व्यवहार ठेवला होता; इतकेंच नव्हे तर स्वतःच्या पोटची मुलगी ल्युक्रेशिया हिच्याशीं त्याचा वाईट व्यवहार असल्याबद्दल त्याच्यावर आळ आला होता. त्याचा मुलगा सीझर बॉर्जा यास दुसऱ्या बदचालींबरोबरच लूट* करणें, खून करणें व वीष देणें वगैरे गोष्टी ह्मणजे केवळ खेळ

* यावेळीं धर्माधिकारी तरवारी घेत, लष्कर राखीत व लढाई किंवा लुटीचाही धंदा करीत.

झाला होता. संध्याकाळ झाली कीं कोणाच्यानेंही घराबाहेर पडवत नसे. खुनापेक्षां विषानें पुष्कळांचा नाश होत होता. वीष देणें ही एक यावेळीं इतालींत घरोघर कलाच मानली जात होती. हल्लींचे डाक्टर देखील पूर्णपणें जाणत नसतील असलीं तात्कालीक परिणामाचीं व गंधस्वादरहीत विषें ते लोक तयार करूं लागले होते. या पोपचा जीव देखील स्वतःनें बनविलेल्या विषापासूनच गेला. कोणा एका प्रतिपक्षाच्या धर्माधिकाऱ्यास मारून टाकण्यासाठीं त्यानें स्वयंपाकांत विष टाकवून आपल्या घरीं त्यास जेवावयास बोलाविलें. परंतु त्यानें तर प्रथमच सावध होऊन स्वैपाक्यास फोडून ठेविला होता. त्यामुळें तें विषारी जेवण पोपच्याच ताटांत आलें व तें खातांच तो लगेच मेला. हा पोप, त्याचा मुलगा व ती मुलगी या तिघांची रीतभात, खेळ व खानगी चालचलणूक इतक्या निर्लज्जपणाची होती कीं तिचें वर्णन करतेवेळीं कोणाचीही लेखणी लाजून फिकी पडल्याशिवाय रहाणार नाहीं.

**लोकांची अनास्था.**—अशी जेथें धर्मगुरूंची रहाणी तेथें लोकांची आस्था कशी राहील ? गुरूंची सर्व ठिकाणीं फजीती पाहून धर्मशील माणसांस फार लाज व दुःख वाटे, आणि कट्टया भाविकांचा भाव देखील कमी होऊं लागला. पण करावें काय हा त्यांस मोठा विचार पडला. जर काहीं बोलूं लागलें तर ते ह्मणत कीं, अनास्थिकांमुळें धर्माची जास्त खराबी होते, कारण युनानी

विद्येचा अभ्यास वाढल्यानंतर सुशिक्षित वर्गांत अनास्था फार मोठ्या प्रमाणांत होती. इतालींत तर पोपपर्यंत मोठमोठे धर्माधिकारी पुरे नास्तिक होऊन गेले होते. दुसऱ्या ठिकाणीं पुष्कळ सुशिक्षित लोक नास्तिक नव्हते, तरी धर्माच्या बाबती त्यांस अगदीं बेचव वाटून ते स्वच्छंदानें वागत आणि ते संसारांत अगदीं लीन होऊन गेले होते. परंतु साधारण माणसांस देखील नीतीनें वागण्यासाठीं ईश्वराच्या भीतीची जरूर होती, व ह्मणून सर्व भलीं माणसें धर्मसुधारणेची इच्छा करीत होती. शिवाय, आत्म्याच्या लाटा जडवादांत रहात नाहींत; त्या आपोआपच अनाद्यनंताकडे उसळ्या मारतात. ह्मणून कित्येक विद्वान् नास्तिक्य सोडून प्लेटोच्या ब्रह्मज्ञानाकडे जाऊं लागले, व हें लोकोपयोगी आहे असें समजून चांगल्या लोकांनीं त्यांत त्यांस उत्तेजन दिलें. परंतु नुसतें अध्यात्म भक्तियुक्त मनोवृत्तींशिवाय मनुष्यास निर्बल करतें व ह्मणून लोकांवर त्याचा कांहींसुद्धां परिणाम झाला नाहीं. धर्माचा उद्धार धर्ममय भक्तांच्या ओरडीनेंच होतो, व तो कसा झाला हें आपण आतां पाहूं.

---

# प्रकरण १८ वें.

## धर्मोद्धार.

**पूर्वेकडील धर्मोद्धारक.**—सत्पुरुषांस असत्य आवडत नाहीं. ढोंग व अवडंबर पाहून त्यांस किळस येते व त्या पद्धतीनें ते विषयासक्तीचें पोषण झालेलें पाहिल्यास चिडून तशा मनुष्यांचा नाश करून लोकांस परत सत्यमार्गाकडे वळवितात. असले दोन-चार महापुरुष सुदैवानें सोळाव्या शतकांत उत्पन्न झाले. त्यापूर्वी पुष्कळ साधूंनीं बरेच दिवसांपासून धर्मसुधारणेविषयीं ओरड करण्यास सुरुवात केली होती. त्यांत विक्लिफास पहिलें स्थान दिलें पाहिजे. चौदाव्या शतकांत त्यानें उघडपणें इंग्लंडांत पोपच्या सांप्रदायाबद्दल तिरस्कार दर्शविला होता, परंतु तो स्वतः स्वभावानें शांत असल्यानें व त्या वेळची परिस्थिति प्रतिकूळ असल्यानें त्यास बरोबर फावलें नाहीं. तथापि कित्येक लोक त्याचे शिष्य झाले व त्यांचा एक निराळा पंथ निघाला. या लोकांस इतिहासांत लोलर्ड असें ह्मणतात. राजांनीं त्यांच्यावर पुष्कळ जुलुम केला तरी ते असत्यापुढें नमले नाहींत. अशी समजूत आहे कीं, यांच्यापैकीं कित्येक जण जर्मनींत पळून गेले, व त्यांच्या संसर्गानें तेथें धर्मसुधारणेचें बीं प्रथम पेरलें गेलें.

**हस.**—पंधराव्या शतकांत बोहिमियांत जॉन हस नामक एक जोरदार सुधारक साधू निघाला. त्यानें पोपचें प्राबल्य मोडून

टाकून त्या प्रांतांत पुष्कळ शिष्य केले. या प्रबोधकास दुष्टांनीं जाळून टाकलें, व त्याच्या शिष्यांवर भयंकर जुलुम गुदरले; तरी त्यांची संख्या वाढतच गेली.

याशिवाय ठिकठिकाणीं सर्व देशांत धर्मशील माणसें ओरड करीत, व मरतां मरतां देखील चालू अधर्माबद्दल तिरस्कार दाखवीत. धर्म सुधारणा जवळच होती. तिचे नगारे वाजूं लागले होते. मार्टिन ल्यूथर जन्मला, व घटका भरून गेली.

**मार्टिन ल्यूथरः**—ल्यूथर जातीनें एका गरीब खाण खोदणाऱ्याचा मुलगा असून त्यानें विद्याभ्यास करून शास्त्री (Doctor) पद मिळविलें होतें, परंतु त्यास वैराग्य उत्पन्न झाल्यानें तो ऑगस्टाईन मठाचा बुवा होऊन राहिला. विटेंबर्गच्या पाठशाळेचा तो त्यावेळीं एक प्रसिद्ध शिक्षक होता. तो स्वभावानें गंभीर, सत्यानिष्ठ व निश्चयी होता. इ. स. १५१० त त्यास मठाधिकाऱ्यानें कांहीं कामासाठीं रोम येथें पाठविलें. तेथील भ्रष्टाचार पाहून त्याचें मन विटलें, व त्या वेळेपासूनच यूरोपच्या धर्मोद्धाराचें बीं त्याच्या मनांत पेरलें गेलें. परत रोमहून आला तेव्हां ईश्वरानें प्रसंग पण तसाच आणला. पाठशाळेंत त्यास सॅक्सनीच्या इलेक्टरा (ठाकुरा) नें धर्मशास्त्रांत बायबल शिकविण्याचा हुकूम केला. त्याचा तर त्यानें फार दिवस खास अभ्यासच केला होता, व म्हणून त्यानें अशीं उत्तम व नवीन तऱ्हेचीं व्याख्यानें देण्यास सुरुवात केली कीं, तीं ऐकण्यास दूरदूरचे विद्वान् देखील धांवून येऊं लागले. अजून प्रचलित

धर्मविरुद्ध तो कांहीं बोलत नव्हता, व त्याचे विचारही त्या मार्गास वळले नव्हते. तरी पण बायबलांत असेल तोच धर्म, हा जो प्रॉटेस्टंट पंथाचा सिद्धांत तो अतांपासूनच त्याच्या तोंडून बाहेर पडूं लागला.

इ. स. १५१७ त नवीन क्षमापत्रांची अडत जर्मनींत आली. या अडतीचा दलाल साधू असा हलकटपणा करूं लागला कीं तें ल्यूथरच्यानें पहावलें नाहीं. त्यानें स्वतःच्या सहीनें एक असा जाहीरनामा काढला कीं, क्षमापत्रानें पापांचा नाश होत नाहीं, व या बाबतींत कोणास वाद करावयाचा असल्यास मी तयार आहें. तो जाहीरनामा ९५ कलमांचा असून शास्त्रार्थानें पूर्ण भरलेला होता. विरुद्ध पक्षाच्या साधूंनीं त्यास उत्तरादाखल जाहीरनामा काढला. पण: शिव्याशिवाय त्यांत दुसरें कांहीं क्वचितच होतें. त्यामुळें ल्यूथरच्या शिष्यांस चीड येऊन त्यांनीं तो जाहीरनामा जाळून टाकला. सबंद देशांत ओरड झाली, व ल्यूथरचे ९५ शास्त्रार्थ सर्व ठिकाणीं फैलावले. पुष्कळ महिन्यानंतर एकच शास्त्री त्याच्याबरोबर वाद करण्यास आला, त्यास त्यानें जिंकतांच त्याची कीर्ति वाढली. यावेळीं त्यानें प्रॉटेस्टंट पंथाचा दुसरा एक सिद्धांत बाहेर आणला कीं, आत्म्याचें कल्याण क्रियासाध्य नव्हे, पण श्रद्धासाध्य आहे. गोष्ट वाढत चालली, व पोप दहावा लिओ, जो अद्यापपर्यंत या बाबतीस साधारण भांडण समजत होता, त्यानें ल्यूथरास जबाब देण्यासाठीं दरबारांत येण्याविषयीं

हुकुम पाठविला. सॅक्सनीच्या इलेक्टरानें मध्यें पडून असें ठरवून घेतलें कीं, त्याचा न्याय जर्मनींतच व्हावा. त्याप्रमाणें ऑक्सबर्ग येथें एका मोठ्या धर्माधिकाऱ्यासमोर त्यास नेण्यांत आलें. तेथें वादविवाद झाला. त्या प्रसंगीं " पोप ह्मणेल तोच धर्म " हें मत त्यानें नाकारलें, आणि तो विशेष असेंही बोलला कीं सेंटपीटर (येशू ख्रिस्ताचा मुख्य चेला जो रोमच्या गादीचा मूळ पुरुष समजतात तो) पण कित्येक वेळ चुकत असे. याचा परिणाम असा झाला कीं ल्यूथरास पळून जाणें भाग पडलें व त्यास हद्दपार करण्याविषयीं सॅक्सनीच्या इलेक्टरावर सक्ती होऊं लागली, परंतु त्यानें त्याची परवा केली नाहीं.

शक्तीचा कांहीं उपयोग झाला नाहीं तेव्हां पोप युक्ती करूं लागला. ल्यूथरला गौरवानें एक पत्र पाठवून त्यानें त्याच्याशीं बोलणें चालू केलें. या युक्तींत त्यास कदाचित् यश आलें असतें, परंतु कित्येक धर्मवेड्या शास्त्र्यांनीं वादविवाद करून ल्यूथरास चिडविलें, व त्यामुळें त्यानें प्रचलित धर्माविरुद्ध उघडपणें ग्रंथ लिहिले. पोपनें सभा बोलावून ल्यूथरचीं ४१ मतें शोधून काढून तीं धर्मद्रोहीं ठरविलीं, त्याचे ग्रंथ जाळून टाकविले, व दोन महिन्यांच्या आंत त्यानें स्वतः हजर होऊन आपले शब्द परत न घेतले तर त्यास धर्माबाहेर टाकण्यांत येईल, असा हुकुम फरमाविला. हें ऐकून ल्यूथर जास्त चिडला. तो हुकुम व त्याबरोबर पोपच्या सत्तेचे प्रतिपादक ग्रंथ घेऊन तो गांवाबाहेर गेला, सर्व

लोकांस त्यानें तेथें जमविलें, व तेथें त्यावर गवत ठेवून सर्वांसमक्ष त्यांचें भस्म करून टाकलें. ( ता. १० डिसेंबर १५२० ). यावेळीं त्याचें वय ३७ वर्षांचें होतें.

यानंतर जोरदार भाषेंत त्यानें पोपविरुद्ध ग्रंथ लिहून एकामागून एक प्रसिद्ध करण्याची सुरवात केली. जर्मनीच्या बादशहानें पुष्कळ मांडलिकांच्या अनुमोदनानें त्यास धर्मद्रोही ठरविलें, परंतु सॅक्सनीच्या इलेक्टरनें त्यास काळजीपूर्वक एका एकांत किल्ल्यांत लपवून ठेविलें. तेथून त्यानें पातकोच्चारण, ब्रह्मचर्य-प्रतिज्ञा, मृतार्थ प्रार्थना वगैरे रोमच्या अनेक सांप्रदायांविरुद्ध जोरदार लेख प्रसिद्ध केले. त्याचा परिणाम सॅक्सनींत फार झाला. शेंकडो साधू मठ सोडून गृहस्थाश्रमांत परत आले, कित्येकांनीं प्रभुभोजनाची क्रिया सोडून दिली, व एका शिष्यानें तर विटेंबर्गच्या सगळ्या देवळांत जाऊन मूर्ति फोडून टाकल्या; व बायबलशिवाय सर्व ग्रंथ जाळून टाकण्याच्या तो विचारांत होता. निढळाच्या घामानें मिळविलेलें अन्न खावें, या आज्ञेस अनुसरून कित्येक कुलीन लोक शेतांत मजुरीस जाऊं लागले. हें पाहून ल्यूथर परत आला, व त्यानें त्या लोकांस मर्यादेंत ठेविलें.

आतां ल्यूथर जर्मनीच्या धर्मसुधारणेचा मुख्य झाला व त्यानें ‘ नवीन स्थापने ’ ( New Testament ) चें भाषांतर केलें, व अनेक पुस्तकें लिहिलीं. साधूचा वेष सोडून देऊन त्यानें एका जोगिणीबरोबर लग्न केलें. उत्तर जर्मनींतील पुष्कळ ठाकूर त्याच्या

पंथांत सामील झाले. त्यांनीं आपल्या राज्यांतून साधू व जोगिणींचे मठ काढून टाकले, आणि त्यांची मिळकत व गांवहक्क जप्त केले. जर्मनीच्या राजमंडळांत या धर्मसुधारणेविरुद्ध ठराव होत होता, परंतु या ठाकुरांनीं त्यास हरकत (Protest) घेतली, आणि तेव्हांपासून सर्व धर्मोद्धारक "प्रॉटेस्टंट" म्हणजे हरकत घेणारे या नांवानें ओळखले जाऊं लागले. इ. स. १५३० त जर्मनीच्या बादशहानें या प्रॉटेस्टंट मताच्या लोकांस आपले सिद्धांत लिहून दिले, आणि कित्येक अटींवर त्याप्रमाणें वागण्याची त्यांस राजमंडळानें सूट दिली. तथापि जास्त सुरक्षीतपणासाठीं ल्यूथरपंथी ठाकुरांनीं राजकीय ऐक्य केलें, व तेव्हांपासून धर्मसुधारणा जर्मनींत कायम झाली.

यापुढें ल्यूथरनें आपल्या पंथास व्यवस्थीत रूप देण्यांत आपलें उरलेलें आयुष्य खर्च केलें. त्यानें इ. स. १५४६ त ६३ व्या वर्षीं आपला देह सोडला. त्यावेळीं जर्मनीशिवाय यूरोपच्या दुसऱ्या देखील कित्येक देशांत धर्मसुधारणा स्थापन झाला होती, कित्येक ठिकाणीं तिची तयारी चालली होती, आणि सर्व ठिकाणीं तिची ओरड ऐकून लोकांचीं मनें चंचल होऊं लागलीं होती.

स्वित्झरलँडमधील धर्मसुधारणा देखील क्षमापत्रामुळेंच आणि बहुतेक त्याच सुमारास सुरू झाली होती. तिचा नायक देखील झ्विंगली नामक धर्मगुरूच होता. इतर धर्माधिकाऱ्यांनीं त्याच्या कृत्यास हरकत घेतली, परंतु त्यांचें कांहीं चाललें नाहीं, आणि

तेथील प्रजासत्ताक राजसभेनें ती सुधारणा मंजूर केली. स्वित्झर्लंडचा धर्मोद्धार ल्यूथरनें केला त्यापेक्षां देखील जास्त निर्मळ व संपूर्ण होता; पण तेथील आचार्यांनीं शहाणपणा व नरमपणा वापरल्यानें तो शांतपणानें झाला व तो होऊन जाईपर्यंत पोपला पुरती बातमी देखील लागली नाहीं.

ल्यूथरच्या व या सांप्रदायांत कित्येक मतभेद होता. तो काढून टाकण्यासाठीं दोन्ही पक्षवाले जमले, परंतु ल्यूथरच्या हट्टामुळें त्याप्रमाणें कांहीं झालें नाहीं, आणि उलटा दोघांत थोडासा वैरभावच उत्पन्न झाला.

मागाहून कॅल्विन नांवाचा एक ज्ञानी पुरुष पुढें आला, त्यानें जिनीवा येथें कांहीं पोटभेद काढला, व नंतर पुढें तोच पंथ स्वित्झर्लंडांत जास्त बलवान् झाला. हा पंथ नॉक्स नांवाच्या धर्मनिष्ठ पुरुषानें स्कॉटलंडांत दाखल केला, व अजून तो तेथें चालत आहे.

# प्रकरण १९ वें.

## इंग्लंडांत धर्मोद्धार.

**दोन पक्षः—**इंग्लंडचे सुशिक्षित लोक देखील धर्माच्या बाबतींकडे साश्चर्य पहात राहिले होते. धर्मांत सुधारणेची जरूर आहे, याविषयीं सर्व एकमत होते परंतु ती किती व कशी या बद्दल दोन पक्ष होते. एका पक्षाची इच्छा अशी होती कीं, धर्माचें ऐक्य तोडल्याशिवाय एकमतानें सुधारणा करावी, व तसें होण्याची थोडीशी आशाही होती; कारण त्यावेळचा पोप दहावा लिओ जात्या विद्वान असून त्या पक्षांतील कित्येकांचा मित्र होता. दुसरा पक्ष तरुण मंडळीचा असून त्यांचा विचार तें ऐक्य मोडण्याचा होता; आणि जर्मनीच्या सुधारणेची गोष्ट जसजशी त्यांच्या कानीं येऊं लागली तसतशी त्यांस जास्त उत्कंठा लागूं लागली. शेवटीं त्यांनीं एक गुप्त संस्था स्थापून ल्यूथरचें मत इंग्लंडांत फैलावण्याची पुष्कळ खटपट केली. परंतु राजसत्ता त्यांच्या विरुद्ध होती, आणि ते ल्यूथर इतके निश्चयी नसल्यानें त्यांचें कांहीं फावलें नाहीं, परंतु सुदैवानें एका गोष्टीची त्यांस फार मदत झाली.

आठवा हेन्री हा विद्वानांचा चहाता असून स्वतःही विद्वान् होता. सुधारणा करण्याची त्याची देखील इच्छा होती, परंतु ती धर्माचें ऐक्य राखून. त्यामुळें जेव्हां ल्यूथरनें सप्तसंस्काराचें

खंडण केलें, तेव्हां त्यानें स्वतः प्रत्युत्तर छापविलें. ( इ. स. १५२१ ). व म्हणून पोपनें खूष होऊन त्यास " धर्म रक्षक " ( Defender of the Faith ) असा किताब दिला. तो किताब अजूनही इंग्लंडचे प्रॉटेस्टंट राजे अभिमानानें धारण करतात.

हेन्रीनें इ. स. १५३० त जेव्हां कॅथेराइन राणीस सोडून देण्याचा हट्ट धरला होता, त्यावेळीं टॉमस क्रॉमवेल हा त्याचा कारभारी होता. तो मोठा व्यवहारदक्ष होता. तो व क्रॅन्मर नांवाचा एक सुधारक तरुण शास्त्री या दोघांनीं राजास सांगितलें कीं, पोपची सत्ता झुगारून द्याल तरच तुमचा हेतु साधेल. त्यावरून हेन्रीनें ( इ. स. १५३१–३३ ) इंग्लंडांत धर्माचें आधिपत्य राजाचेच हातीं राहील असे कायदे पार्लमेंटकडून करविले. राजाचा हेतु धर्मपद्धति फिरविण्याचा मुळींच नव्हता, परंतु शेवटीं क्रॉम्वेलनें त्याच्याकडून तें सर्व करवून घेतलें. पोपनें चिडून हेन्रीचें नवें लग्न खोटें ठरवून त्यास धर्माबाहेर ठेविलें, तेव्हां आपल्या देशांतील सर्व पाद्र्यांचें बरें वाईट करण्याची सत्ता आपल्या हातीं घेण्याची आतां जरूर आहे असें क्रॉम्वेलनें राजाच्या मनांत भरविलें. राजानें त्यास धर्मखात्याचा प्रतिनिधि नेमिलें. तो अधिकार मिळतांच क्रॉम्वेलनें असा हुकुम केला कीं, आम्ही ज्यांस सनदा देऊं त्यांनींच धर्माची व्याख्यानें द्यावीं. अशा रीतीनें सर्व पाद्र्यांचीं तोंडें त्यानें बंद करून टाकलीं, इतकेंच नव्हे तर तो सांगेल त्या मताचीं व तऱ्हेचीं व्याख्यानें ( Sermons ) देणें त्यानें त्यांस

भाग पाडलें. विशेष प्रसंगीं विषयाचे मुद्दे देखील तो लिहून पाठवी. शिवाय राजाचें धर्माधिपत्य जो नाकारील त्यास मारून टाकण्याचा त्यानें सपाटा लाविला. भीती बसविण्यासाठीं त्यानें मोठमोठ्यांसच प्रथम पकडलें. एक दोन राजवंशांतील माणसांस देखील त्यानें मारून टाकलें. पोपच्या पक्षांतील माणसांस लगेच पकडतां यावें ह्मणून त्यानें असा कायदा करविला कीं, राजास नव्या लग्नापासून जी मुलगी झाली आहे ती त्याची खरी वारस आहे. हा कायदा स्वीकारतेवेळीं लोकांपासून अशी शपथ घेण्यांत येत होती कीं, राजाचें हें नवें लग्न सशास्त्र आहे, व पूर्वीचें कॅथेराईन बरोबरचें लग्न धर्मविरुद्ध होतें. अशी शपथ घेण्याचें नाकारल्यामुळें कित्येक सत्यवाद्यांस मरावें लागलें. त्यांत सर टॉमस मूरचें नांव प्रसिद्ध आहे. तो त्यावेळच्या यूरोपांतल्या उत्तमोत्तम पंडितांपैकीं एक होता; आणि त्याचे कित्येक विचार त्या युगाच्या इतके पुढें होते कीं ते दोनशें वर्षेंपर्यंत विद्वानांस देखील समजले नाहींत. या हत्त्येमुळें सर्व यूरोपभर ओरड झाली, व पोपनें हेन्रीस पदभ्रष्ट करण्याचा हुकुम काढला. पोपच्या ह्मणण्याप्रमाणें कोणी इंग्लंडवर हल्ला करण्याचें धाडस करील असा हा काळ नव्हता. यावेळीं देशांत असंतोष, खटपट व फंदफितुर हीं फार वाढलीं होतीं. त्यामुळें क्रॉम्वेलनें परत असें सुचविलें कीं, जर्मनीच्या प्रॉटेस्टंटांबरोबर आतां तह केल्याशिवाय सुटका नाहीं; व निदान पोपला चिडविण्यासाठीं तरी कित्येक सुधारणाही केल्याच पाहिजेत.

यावरून राजानें मठांची रीतभात तपासण्यासाठीं पंच नेमले (इ. स. १५३५); त्यांनीं अत्यंत तिरस्कारार्ह असा एक अहवाल लगेच प्रगट केला. त्यावर ताबडतोब असा हुकुम देण्यांत आला कीं, दोनशें पौंडांच्या आंतील उत्पन्नवाले सर्व मठ बंद पाडावे, व त्यांची मिळकत सरकारांत जप्त करावी. यामुळें दहा लाख रुपये रोख व सालिना सव्वा तीन लाखाच्या जहागिरी राजाच्या हातीं आल्या. तीन एक वर्षानंतर मोठे मठ देखील बंद पाडले. यावेळीं राजाचा त्रास इतका वाढला होता कीं, कित्येक मठवाले बिचारे आपण होऊन अर्ज करूं लागले कीं, आमचे मठ बंद करा. त्यांच्या जहागिरींतून कित्येक जहागिरी त्यानें पाठशाळांस दिल्या, आणि बाकीच्या बहुतेक आपल्या सरदारांस वांटून दिल्या, यामुळें राज्यास वास्तवीक कायमचें नुकसान झालें. परंतु त्याचमुळें पोपविरुद्ध एक जबरदस्त सरदार-वर्गही उठला (इ. स. १५३६–१५३९).

याच तीन वर्षांत जत्रा बंद पाडल्या. व्रत उत्सवाचे दिवस कमी केले, मूर्तीपूजा व साधुसंतांच्या शेषभागांची फजिती* करून ते रिवाज बंद पाडले, व बेकेटचें थडगें खोदून टाकविलें सप्तसंस्कारांतील तीनच कायम ठेविले, मुक्ति श्रद्धासाध्य मानली

* एक मूर्ती डोकें व डोळे हालवी, तिला सभेंत खेंचून आणून तिची दोरीची चौकट सर्वांसमक्ष उघडविली. मरियमच्या मूर्ती नग्न करून गाडे भरून लंडनांत पाठवीत व तेथें त्या सर्व जाहीर रितीनें जाळुन टाकीत.

आणि मृतार्थ प्रार्थना वगैरे अनेक कर्मे रद्द केलीं. "धर्माचे सिद्धांत" हेन्रीनें आपल्या हातानें लिहून काढले, व तोच इंग्लंडचा धर्म असें सर्वांनीं मानावें असा कायदा केला. बायबलचें टिन्डेलकृत भाषांतर, जें त्यानें प्रथम निषिद्ध मानलें होतें त्यांत सुधारणा करवून तें आतां प्रसिद्ध केलें, व तें वाचण्याची सर्वांस सूट दिली. अशा रीतीनें क्रॉम्वेलच्या प्रधानगिरींत (इ. स. १५३० ते १५४०) महत्वाची धर्मसुधारणा सबंद इंग्लंडांत दाखल होऊन गेली. एवढें मात्र खरें कीं, ती फक्त जबरदस्तीनें व पुष्कळ लोकांच्या मनाविरुद्ध दाखल करण्यांत आली. प्रॉटेस्टंट पंथाचा हल्लींचा मुख्य सिद्धांत कीं, "आपल्या बुद्धीस आवडेल तो धर्म मानण्याचा प्रत्येकास पूर्ण हक्क आहे" हा त्यावेळीं जर्मनीच्या धर्मोद्धारकांत देखील बरोबरसा नव्हता, आणि पुष्कळ वेळ रोमन कॅथॉलिकांप्रमाणें ते देखील आपण दिलेलें मत आपल्या मना विरुद्ध असल्याचें कबूल करीत.

यामुळें तरुण सुधारकांचें चांगलेंच फावलें. गंभीर धर्मक्रिया चालत असेल तेथें तरुण लोक घुसून बायबलचीं* वाक्यें बडबडत, कित्येक मुली देवळांत नवीन प्रार्थनापद्धती आणून वाचण्याचें ढोंग करूं लागल्या. कित्येक जणींनीं धर्माधिकाऱ्यांच्या कचेरीवर टोळींबंद जाऊन ती तोडून टाकली. प्रभुभोजनाच्या क्रियेंत एक

* ब्राह्मणांच्या सभेंत येऊन कोणी नीच वर्णाचा मनुष्य गायत्री मंत्र ह्मणे व त्यावेळेस जसें वाटे तसेंच या वेळच्या आस्तिकांस वाटे.

वेळ एका पाद्र्यानें प्रभुमूर्ति उंच केली, तेव्हां एकानें उठून आपला कुत्राच उंच केला. बायबलचा अर्थ प्रत्येक जण वाटेल तसा करी. त्याबद्दलचे वादविवाद व भांडणें हीं दरेक आळींतून गाजून राहिलीं होतीं. कित्येकांनीं राजानें काढलेल्या 'धर्मसिद्धांतां'वर चर्चा सुरू केली, आणि प्रभुभोजनास हास्यास्पद करण्यासाठीं त्याबद्दल गाणीं व प्रहसनें केलीं. शेवटीं कित्येक तरुण पाद्र्यांनीं कायद्याचें बंधन तोडून, तसेंच लोक लज्जा सोडून, भराभर आपलीं लग्नें करून घेतलीं.

हें सर्व पाहून जुन्या लोकांचीं अंतःकरणें प्रक्षुब्ध होऊन गेलीं, व धर्मगुरू तर अगदीं दिङ्मूढच होऊन गेले. परंतु ज्या हेन्रीस क्रॉम्वेलनें आतांपर्यंत खूब चढवून आपल्या ताब्यांत ठेविलें होतें, त्यास हें पाहून राग आला, आणि त्यानें "सहा कलमां"चा कायदा केला (इ. स. १५३९). त्यांत पाद्र्यांचें ब्रह्मचर्यव्रत, खानगी प्रभुभोजनाची क्रिया आणि पातकोच्चारण हीं कायम ठेविलीं, व त्याविरुद्ध जो कोणी बोलील किंवा करील त्यास मोठी शिक्षा ठरविली. त्यामुळें आतां तर रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट या दोघांचा मृत्यू आला. दोघांसही जाळून टाकण्यास ठिकठिकाणी चिता पेटत राहिल्या. हा प्रकार हेन्रीच्या कारकिर्दीच्या अखेरपर्यंत चालला.

सहाव्या एडवर्डच्या वेळीं जे दोन राजरक्षक झाले त्या दोघांनीं क्रॅन्मरच्या सांगण्याप्रमाणें पुष्कळ सुधारणा अमलांत

आणिली. लोलर्ड लोकांविरुद्ध जे जे कायदे पूर्वी झाले होते ते व मागच्या राजाचीं सहा कलमें वगैरे धर्मसुधारणेस नडणारे सर्व प्रघात त्यांनीं रद्द केले. धर्मखात्याच्या बाकी राहिलेल्या सर्व जहागिरी जप्त केल्या व त्या विद्याखात्यास देण्याचें ठरविलें, परंतु त्यांतील बऱ्याच शिफारशी माणसांस देऊन त्यांस सरदार बनविलें. देवस्थानांतून मूर्ती काढून टाकण्यासाठीं पंच नेमले. उपासनाविधींत इंग्रजी भाषा वापरण्याचा हुकूम केला; ( आतांपर्यंत लॅटिन भाषा वापरली जात होती ); राजाचें धर्माधिपत्य न मानेल त्यास शिक्षा होऊं लागली; शंकायुक्त रिवाज न पाळण्याविषयीं दवंडी पिटविली; बायबल वाचण्याची निरंकुश सूट दिली; सार्वजानिक प्रार्थनापद्धति प्रगट केली; ( ही थोड्याशा फेरफारासह अजून इंग्लंडांत चालत आहे ), आणि पाद्र्यांस लग्न करण्याची कायद्यानें मोकळीक दिली. बारा धर्मबोध छापविले, आणि त्याप्रमाणें प्रबोधनें करण्यास सर्वांस ताकीत दिली. तसेंच कित्येक ल्यूथरचे व कॅल्व्हिनचे सिद्धांत स्वीकारले, जर्मनीहून प्रॉटेस्टंट वक्ते बोलाविले; आणि सारांश, यापुढें इंग्लंडांतील समाजानें धर्मसुधारणेचें निर्मळ रूप धारण केलें " धर्माचीं बेचाळीस कलमें " तयार केलीं.त्यांतल्याच ३९ कलमांवर हल्लींचा इंग्लंडचा धर्मसमाज उभा आहे.

या लोकांनीं देखील हेन्री प्रमाणेंच आपला पंथ चालविण्यासाठीं जबरदस्ती व जुलम वापरला होता. त्यांचें देखील धर्माच्या

ऐक्यास उत्तेजन होतें, आणि "धर्मऐक्य" कायदा त्यांनीं दोनदां पसार केला होता; जो त्यांचें मत मानीत नसे त्यास ते तावडतोब तुरुंगांत टाकीत. ॲनाबॅप्टिस्ट नांवाच्या एका प्रॉटेस्टंट पंथांतील मनुष्यास व नास्तिक आणि अनास्थिकांसही ते पूर्ववत् जाळून टाकीत.

**मेरी.**—ही राणी पूर्णपणें रोमन कॅथॉलिक होती. गादीवर बसतांच तिनें आपल्या धर्मांतील लोकांस तुरुंगांतून सोडविलें, आणि मागील राज्यांत जे जे धर्मसुधारणेचे कायदे झाले होते ते रद्द करून आपल्या बापानें बांधलेला उपासनाविधि चालविण्याचा तिनें हुकुम केला. यामुळें प्रजा बरीच खूष झाली, कारण त्यांस यापेक्षां अधिक सुधारणा नको होती. परंतु असल्या धर्मयुद्धाच्या काळांत असल्या धर्मवेड्या राणीच्यानें एवढेंच करून रहावलें नाहीं. पोपबरोबर पत्रव्यवहार सुरू करून तिनें इ. स. १५५४ त इंग्लंडचा धर्मसमाज परत पोपच्या पायीं लीन केला. ही गोष्ट पार्लमेंटच्या मंजुरीनें तिनें केली होती. मठाच्या जहागिरी परत देण्याचा कायदा पसार करण्यास सांगितलें तेव्हां तें पार्लमेंटनें आग्रहपूर्वक नाकारलें, कारण तसें करण्यांत त्यांच्यापैकींच कित्येकांच्या घरांवर गदा येणार होती. यावरून असें वाटतें कीं, क्रॉम्वेलनें मठाच्या जहागिरी देऊन कित्येकांस सरदार बनविलें, त्यामुळें एक फायदा तर हा झाला कीं, निदान स्वार्थासाठीं ते नेहमीं सुधारणेच्या पक्षास चिकटून राहूं लागले.

नंतर राणीनें दुसऱ्या पंथांतील लोकांवर जुलुम करण्यास सुरवात केली, व त्यामुळेंच इतिहासांत तिचें " खुनी मेरी " असें नांव पडलें आहे. तिच्यावेळीं एकंदर २८४ माणसांस भस्म करून टाकण्यांत आलें होतें, व त्यांत स्त्रीहत्या कीं बाळहत्या याबद्दल जरा सुद्धां विचार केला नव्हता. मागच्या दोन कारकीर्दींत उदयास आलेला व इंग्लंडच्या हल्लींच्या धर्मसुधारणेचा मूळ पुरुष क्रॅन्मर, व लॅटिमर हे दोघे यावेळीं मारले गेले व त्यामुळें प्रॉटेस्टंट पंथाचे लोक फार चिडले.

**इलिझाबेथ**–ही राणी स्वभावतः धर्माविषयीं बेपर्वा होती, परंतु ती लोकांच्या कलाप्रमाणें त्या बाबतींत वागली. तिनें पाहिलें कीं, आतां इंग्लंडचे पुष्कळ लोक पोपास मान देतीलसें वाटत नाहीं, व म्हणून गादीवर बसतांच 'धर्माधिपत्या' चा कायदा तिनें पुन्हा मंजूर केला, आणि मेरीनें जें जें अमलांत आणलें होतें तें सर्व रद्द केलें. नंतर पुढें राज्यांत जसजशी राज्यव्यवस्था होऊं लागली तसतशी राज्यव्यवस्था ती धर्माच्या बाबतींत आपल्या राज्यांत राखूं लागली. परंतु प्रसंग असा होता कीं, परराज्याच्या संबंधांत इंग्लंडास प्रॉटेस्टंट होण्यांतच फायदा होता, व लोकांचें वळण देखील दिवसेंदिवस त्या बाजूसच वाढत चाललें होतें. त्यामुळें विशेष धरपकड न करितां, खबरदारीनें धर्मबोधकांच्या कामावर गुपचुप चांगल्या प्रॉटेस्टंट विद्वानांसच ती नेमूं लागली. ही युक्ती कालांतरानें पुष्कळांस प्रॉटेस्टंट पंथांत आणण्याच्या कामीं फार सफळ झाली. तिनें फ्लँडर्स व फ्रान्समधील प्रॉटेस्टंटांस चांगली मदत केली, आणि त्यावेळे-

पासून इंग्लंड हें यूरोपांतील प्रॉटेस्टंट राज्यांचें आश्रयस्थान गणलें जाऊं लागलें. इ. स. १५६१ पासून १५७१ पर्यंत पार्लमेंटनें धर्माचीं ३९ कलमें मुकरर केलीं, आणि तींच अजून इंग्लंडच्या धर्मसमाजास मान्य आहेत. हेन्रीनें प्रथम पोपची सत्ता नाकारली त्यास आतां तेहेतीस वर्षें म्हणजे जवळ जवळ तीन तपें होऊन गेलीं होतीं, आणि त्या दरम्यान पोपच्या मार्गाचा बोध इतक्या कडक रीतीनें बंद ठेविण्यांत आला होता कीं, यावेळीं पुष्कळ लोक आपोआपच प्रॉटेस्टंट मताचे होऊं लागले. कित्येक तर त्याही पलीकडे गेले होते. अशा लोकांस राजसत्तेनें ठरविलेली पद्धत परवडत नव्हती, आणि त्यांनीं त्याविरुद्ध वागण्यास सुरुवात केली होती. हे लोक प्यूरिटन् या नांवानें ओळखले जाऊं लागले. त्यांच्याविषयीं पुढें पुष्कळ सांगावयाचें असल्यानें आतां येथें कांहीं लिहीत नाहीं. या लोकांस दाबांत ठेविण्यासाठीं या राणीच्या कारकीर्दीच्या शेवटच्या भागांत "धर्मऐक्या"च्या कायद्याच्या आधारें पुष्कळ धुमाकूळ माजला होता. कित्येकांनीं असा आंकडा काढला आहे कीं, खुनी मेरीच्या हातून मेले त्याच्यापेक्षां देखील जास्त प्रॉटेस्टंटांचे जीव या कारकीर्दींत गेले. अशा वेळीं रोमन कॅथॉलिकांवर किती जुलुम झाला असेल तें सांगावयासच नको. स्कॉट लोकांची राणी मेरी हिच्या नांवानें जेव्हांपासून बंडें उठूं लागलीं होतीं, तेव्हांपासूनच इलिझाबेथ त्या लोकांस एक भयंकर काळ होऊन बसली होती.